
नवनाथ
बाळकृष्ण
तांडेल
सागरकन्या

सागरकन्या

नवनाथ बाळकृष्ण तांडेल

ई साहित्य प्रतिष्ठान

सागरकन्या (कादंबरी)

लेखक: नवनाथ बाळकृष्ण तांडेल

पिंपळ परिसर, मु. पो. -सातपाटी, ता. जि. पालघर.

पिन. ४०१४०५.

महाराष्ट्र.

भ्रमणध्वनी:८०८७८१०१८०.

ईमेल: navnathtandel19@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत

400604

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २० नोव्हेंबर २०२५

©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत

'सागरकन्या' ही माझी पहिलीच कादंबरी. मांगेली कोळी भाषेत लिहिलेली. शालेय जीवनापासून वाचन-लेखन करण्याचा आवड निर्माण झाली. शाळेच्या निबंध स्पर्धेत भाग घेऊन विविध विषयांवर निबंध लिहू लागलो. पुढे मुंबईतील विविध वाचनालयातर्फे घेण्यात येणाऱ्या कथा स्पर्धेत भाग घेत राहिलो. कधी उत्तेजनार्थ तर कधी तृतीय क्रमांक मिळत गेला. त्यातून लेखनाची प्रेरणा मिळत गेली. एका बाजूला वाचन सुरू होते तर दुसऱ्या बाजूला जे सुचत होते ते कागदावर उतरवत गेलो. महाविद्यालयीन काळ अत्यंत खडतर गेल्याने लेखनावर लक्ष देता आले नाही.

त्यानंतर डहाणू स्थित अनुताई वाघ यांचे शिष्य श्री. दिलीप पाटीलसर यांच्याशी परिचय झाला. त्यांच्या 'अपंग मित्र' या मासिकात लेख आणि कथा लिहू लागलो. डहाणूचेच पत्रकार श्री. प्रविण दवणेजी आपल्या 'आजचा तटरक्षक' दिवाळी अंकात माझे साहित्य छापू लागले. त्यातून उत्साह वाढला आणि अनेक नियतकालिकातून माझे साहित्य छापून येऊ लागले. मुलूंड येथील संपादक श्री. अमोल सरतांडेल यांचे 'दर्यावर्दी' मासिक, माहीम, मुंबई येथील श्री. पंढरीनाथ तामोरे यांचे 'दर्याचा राजा' मासिक, जूहू येथील श्री. किरण राऊत यांचे 'चालना' मासिक, वसई येथील श्री. अरूण घायवट यांचे 'तुषार'दिवाळी अंक, विरार येथील श्री. उमाकांत वाघ यांचे 'साहित्य संघम' दिवाळी अंक तसेच 'आपला वार्ताहर'

वर्तमानपत्र यांत आणि महाराष्ट्रातील इतर प्रासंगिक नियतकालिकात माझे लेख, कथा, कविता, नाट्य प्रसिद्ध होत राहिले. या सर्व मासिकाच्या संपादकांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. लेखनात सुधारणा होत राहिली.

'सागरकन्या' २००३ साली लिहिली होती. त्यात आवश्यक ती सुधारणा करून आताची आवृत्ती तयार झाली आहे. याचबरोबर सध्या विज्ञान विषयावर 'सायन्स फिक्शन' लिहित आहे. ई-टि. व्ही. मराठीवर 'कॉमेडी एक्सप्रेस' हा कार्यक्रम यायचा. त्याकरिता छोट्या छोट्या हास्य नाटिका लिहिल्या होत्या. त्या तेथे स्वीकारल्या गेल्या नाहीत मात्र 'तुषार' दिवाळी अंकाने त्या छापल्या. बक्षीस देऊन त्यांचा गौरवही केला. आजचा तटरक्षकचे संपादक श्री. प्रविण दवणेजी यांच्या प्रेरणेने 'वास्तव' हा चारोळी संग्रह २०१३ साली प्रसिद्ध झाला. त्यांतर साहित्य आणखी दर्जेदार व्हावे म्हणून प्रयत्न करीत राहिलो.

वाचन म्हटले तर सर्वच साहित्यिकांचे साहित्य वाचत राहिलो. मनोरंजन आणि ज्ञानार्जन हा त्यामागचा उद्देश होता आणि आहे. ययाती, पानीपत, मृत्यूंजय, हिंदू, राजा शिवछत्रपती, महानायक, शहेनशाह अशा नावाजलेल्या कादंबऱ्या वाचून त्यातील साहित्य छटा जाणून घेतल्या. अर्थात, माझ्या कोणत्याही साहित्यावर इतर साहित्यिक लेखनाचा प्रभाव मात्र नाही. आसपास वावरणाऱ्या माणसांचा, त्यांचा स्वभाव, व्यवहार, समाजाचा रहाटगाडगा, थोडी कल्पना याचा प्रभाव मात्र नक्कीच आहे. तो असायलाच हवा. त्याशिवाय साहित्य ते काय? तसेच समता, बंधुता, मानवता, सचोटी, न्याय, सत्य, अहिंसा, शुद्ध भक्तीभाव या मानवी मूल्यांचा प्रभाव माझ्या लेखनावर जास्त आहे.

आगामी काळात अनेक साहित्यिक प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे. त्यात मला जी महाराष्ट्रभरातून अनेक मान्यवराची विविध पत्रे आली आहेत, त्यांचा

संग्रह छापायचा आहे. तसेच मी दोन्ही पायांनी दिव्यांग असूनही एकट्याने किंवा इतरांच्या संगतीत दूरदूरचा जो प्रवास केला आहे, ते प्रवासवर्णन प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. त्यापुढे जाऊन शालेय जीवनाच्या आठवणी लिहिण्याचा विचार आहे. विविध नियतकालिकात जे लेख प्रसिद्ध झालेत तेही प्रसिद्ध करू इच्छितो. आधुनिक विक्रम-वेताळच्या कथाही लिहायला घेतल्या आहेत. थोडक्यात, लेखन भरपूर आहे. आता जसे सुचत जाईल तसे ते कागदावर उतरत जाईल. एक मात्र खरे की या साहित्य निर्मितीतून निखळ आनंद मिळत राहिला आहे. पुढेही मिळत राहिल आणि जीवन जगण्यास प्रोत्साहन देत राहिल याची खात्री आहे.

लेखक:

श्री. नवनाथ बाळकृष्ण तांडेल

पिंपळ परिसर, मु. पो. -सातपाटी, ता. जि. पालघर.

पिन. ४०१४०५.

महाराष्ट्र.

भ्रमणध्वनी:८०८७८१०१८०.

ईमेल: navnathtandel19@gmail. com

.... अर्पण पत्रिका.... .....

हजारो, शेकडो वर्षांपासून विश्वभरात सागरकिनारी वस्ती करून दर्या-सागरावर राज्य करणाऱ्या तमाम कोळी बांधवांना समर्पित.

सागरकन्या

(१)

पार्वती काकीन पटकन भांडी आवरली. खरकटा तुकून बाहेर नेऊन टाकिली. पंढरीहाठी धानकांजी टोपाबुडा ढाकून ठेविला. माजर धानकांजी खाऊन जान त्याहाठी त्यावर वलोटो ठेविलो. खोपटीया बाहेर येऊन ती कोलबट ओखलव्या लागली.

पात्याराशीस मावरा आलता. सात-सात पाटी बोंबील -मांदेरा होता. सटरफटर पण बरास होता. बोंबील मिंजे काय! यो बोठो!! पटकन हातीन येव्या हरको. तवडोस तेलपुली. पटकन निहऱ्या हरको. मांदेऱ्याहीपण बोठी जात होती. करदी, हुकट, माकल्या ना कोलबट पण बरास होता. संद्रा पार्वती काकीही पोयरी. बारा वर्साहा वय. निजारीनशान उठून ती मावरा निवड्याला तवढ्या पहाटेस गेलती. दोगाहीन बत्तीया. उजेडान हकाल पावत मावरा निवडीला. त्यांशा जोडीला पंढरीपण होता. त्यान निवडलेला बोंबील वनारीवरती लाव्याला हातबोट लावीला.

पार्वती काकी जाम सोकी बाय. रेंदा तिला बिलकूल खपव्याहा नय. पात्याराशीस उठून मंगदारा-पुडदारा खराटा मारव्याही. आंग धुविला का दारापुडा कणा टाकव्याही. तुरशीला तांब्योभर पाणी घालव्याही. देवापुडा बत्ती करव्याही. उदबत्ती करव्याही. मंगे सुलीवर शाय ठेवून रोट्या भुजव्याला बहव्याही. यो तिया हकालपरसा रोजसास काम. हातीन पैशे हला तरूस शाय ना रोट्या मिरव्याहा. नाय ता हाय आपला क्रिष्णार्पण. वरती रोजसा सात-सात पाटी मावरा लाव्याहा. दिहभरान पाठ टेकव्याला तिला मिरव्या नय. देवाला बत्ती सुकेन पण काम सुकत नय होता.

आथापण हकालपावत तिन संद्रा ना पंढरीला जोडीला घिऊन मावरा निवडून हुकत घातला. बाकी मावरा टोपलीन ढाकून ठेवीला. सपलाय करून सबन काम केला. संद्रा ना पंढरीला तयार करून शालीन पाठवीला. तिही दोगी पोरा जाम गुणी. शालीन पण जात होती ना आयला मावरा निवड्याला मदतपण करव्याही. ती अभ्यासान पण हुशार होती. दोगांशी उजळणी तोंडपाठ होती. गणिता पटापट होडव्याहा ते. संद्रा तिसरीन होती. पंढरी पासवीन होता. पागधरे मास्तरांशी पंढरीवर जाम मर्जी होती. ते पार्वती काकीला हांगव्याहा " बाय वाटेन ते होवो. पंढरीला सातवी नंगन शिकव. सातवी पास झालो ता मास्तर होन तो. संद्राला पण शिकव. बरा नवरा मिरेन तिला. मंगे तुया सुखाया दीह येतीन. तुही नाता यांशापेक्षा जाम शिकतीन. तुया घरान सरस्वती ना लक्ष्युमी दोगी वास करतीन. पोराला मावऱ्याहा धंद्याला लावू नाका. कवडा पण खपा. व्यापारी ना दलालांशी गुलामीस करतीन. माहा ए शब्द लक्षान ठेव."

पार्वती काकीला पागधरे मास्तरसा शब्द एक हारका आठवीत रेव्याहा. तिया मनाला समाधान वाटव्याहा.

पार्वती काकीला पंढरीला बोटीन धाडव्याही इच्छास नय होती. या बाबत पार्वती काकी ना तिही नंदय जनी यांशामनी हमेशा कैजो होव्याहो. जनी बोलव्याही "पंढरीला कवडाक शिकविता? बोटीन सडव. तुह्या भावल्याही पोरा कवडाक फुकटसा मावऱ्याही भाग देतीन?"

तिया हजीक्या बोलण्याला पार्वती काकी पटकन शिडव्याही."बरी गा बोलता बाय. माया पोर शिकता ता तुया डोरा क्याला भारी होतान माया पोर मास्तर होन. माही नाता बोठी हापीसर होतीन. ए तुला बगवणार नाय वाटता. पोटदुखी कडशी ती."

“बाय मी तुया वाईट बगी नय. खरा तेस हांगता. तुह्या भावल्याही पोरा तटा दर्या -सागरान खपतान. तुमाना मावऱ्याहा फुकटसा भाग देतान. बिशारा कायपण बोलत नाय. फुकटसा घेव्याला तुला बरा दिखता का?” जनी हये बोललली का पार्वती काकी दात ओठ खात बाजूला होव्याही. जनी व्याप देव्याठीस येता ए पार्वती काकी समजून होती. परत तीया बरबर कैजो करून लोकांना आपलास तोंड दिखव्याहा. बगून ती चूप रेव्याही.

पंढरीया शिक्षण थांबव्याहा कुणी ईषय काडलो का तिला पशीताप होव्याहो. दोनस ता वरीस हात. एकदा का पंढरी मास्तर झालो का उपाशी रेऊन पेज पिऊन दिह काडव्याला नय लागव्याहा. ए पार्वती काकी जाणून होती. मच्छीमारी धंद्यान मावरा ता हुक्काराया होता. पण हातीन पैसो नय. मेहनत कोऱ्यांशी ना मजा दलालांशी हये गत. या मनशान निगतीन नय निगतीन. त्यापेक्षा शिकून नोकरी केली ता दोन घा तरू सुखाया मिरतीन. कोलीन हवून पार्वती काकीला मावऱ्याहा धंद्याहो वीट आलतो, तो यास कारणाही.

“ ए आया लवकर माना धान वाड. जाम भूक लागलेय.” पंढरीयो आवाज आयकून पार्वती काकी आठवणीशान बाहेर आयली.

"पंढरी तू आयलो ना संद्रा कटा हाय? “

"तिला पाटेल बाईन थांबविलेय. काय तरू काम हाय.”

“ बरा दादा. जा ना घिऊन जेव. टोपाबुडा ढाकून ठेविले बग. माना कोलबट निवडून होडा करून दे.” पार्वती काकी बाहेरशान बोलली थये पंढरी खोपटीन गेलो. लगेस मदीशान त्याहो आवाज आयलो “हट् हट्. ए आया, यो कुत्रो खयनी घुसलो खोपटीन?”

पार्वती काकी होडा थयेस टाकून खोपटीन गेली. कुत्रो गेलो बाहेर. पण पार्वती काकीला जाम बोठो व्याप देऊन गेलो तो. पोरांठी ठेविलता ते धानकांजी सबन खाऊन गेलो तो. पार्वती काकी रिकामी ताटाखनी बगीत रेली.

“आया माना जाम भूक लागले. मी काय खाऊ? संद्रा काय खान?” पंढरीला रडभूखीवर आयला.”आया माना बिजा धान रांद.”

पार्वती काकीन पंढरीया डोख्यावरशान हात फिरविलो. त्याला समजावून हांगितला, "बाजार घालू नाका. घरानशी इज्जत बाहेर काडव्याही नय. घरान आथा काईस नय मिरे. धान नय. गोडातेल नय. सुलीला ना बत्तीला राकेल पण नय मिरे.” बोलता बोलता पार्वती काकीयो गरो हुक्याला लागलो. डोरा गऱ्याला लागला.

“मंगे मी काय खाऊ आथा?”

पंढरीया या प्रश्नाही तिया कारजाला भोका पडली. तिन पटापट ओटीन बगितला. ओटीन एक आणा खोवलेला होता.

"यो आणा घे. बाबूया दुकानान जा. शार बटरा आण.”

पंढरीन कंटारून एक आणा घितला. पाटी-पुस्तकाही पिशवी खुंटीला टांगिली. धावत जाऊन त्यान बाबूया दुकानानशान शार बटरा आणली.

“ माना शाय तरी करून दे.”

“खये शाय करू हाकर-बुक्की पण नय मिरे.” पार्वती काकी जहेथहे बोलली. पंढरी गुश्शान होता. तो बोललो, “अवडा खपून काय उपयोग होता आपला? सात-सात, आठ-आठ पाट्या मावरा येता. तरू खाव्याही - घेव्याही मारामार. आपुन आपली लोका कवा सुखी होतीन?”

पंढरीया या प्रश्नान मच्छीमारांशा जीवनाया जाम बोठा सत्य दडलता. पार्वती काकी अडाणी होती. तरू तिला सबन परस्पती कळव्याही. ती बोलली, "बग दादा, आपली लोका दर्यावर उनातानान, वादर -वाऱ्यान आडवा उतानी खपतान. मावरा आणतान. पण ये व्यापारी ना दलाल बहलेन ना आपल्या राशीन. आपला रगत पियाला. त्यांशा खनशान आपली लोका आगोठीहाठी आंगावर उहना पैशे आणतान. मंगे सिजनला ते मावऱ्याहा भाव पाडून मांगतान. त्याना माईत हाय. पडलेल्या भावान मावरा नाय दिला ता ते जान वाया. दखली मेहनत पाण्यान जाव्याही. त्यापेक्षा दलालांना, व्यापारांना ते हांगतीन त्या भावान मावरा देव्यास लागता. बगून आपली सुधारणा होई नय."

"मंगे आया, आपली लोका एक होऊन सहकारी तत्त्वावरती सोसायट्या केव काडीत नय? तुला माईत हाय का सहकारमनी जाम जोर हाय. गांधीजीन ता सहकार मदीनशान कवडीतरू कामा केली हात. आपली सोसायटी आली ता दलालांसा व्यापार आटपून जान. आपल्यास सोसायटी मनशान मावरा बोठबोठ्या बाजारान जान. देशा-परदेशान जान. नाव होन आपल्या गावाहा. आपुन सुखी होतीन. आपल्या लोखांशा हातान पैशे येतीन. खोपट्या जाऊन तटा बंगला उबी रेतीन. गाड्यागुड्या घेतीन लोका."

पंढरीया हजीका शब्द आयकून पार्वती काकी बाहेरशा निंबरान आशेहा किरण शोधव्या लागली."देवा हयेस कर रे. आमशी लोका सुखी झालीली माना जीत्या जीवान बगून दे."

"आया अवडास नाय. आपल्या सबनानशा बोटी होतीन. एकेका घरशा दोन-दोन तीन-तीन बोटी होतीन."

पार्वती काकीन पंढरीया माथ्यावरशान हात फिरविलो.

“आया आथा मी बटरा खाता. पण हांशी माना ना संद्राला धानकांजी पायजे. दोन दिह झाला पेज पिऊन काडला आपुन.”

“ हांशी तुया बापाला दलालाखनी वीस रुपये उहना मांग्याला पाठविता.”पार्वती काकी बोलली.

“परत दलालाखनी जाव्याहा?”पंढरीला ते पटला नाय.

“काय करव्याहा दादा, ये दलाल ना व्यापारीस आपला देव होऊन बहलेन. हगी होयऱ्यांसा मूतपण कामाला नय येय.”

“ नय आया आपला देव आपला हात- पाय हात. आपली बोट आपली देव हाय. आपलो समुदर आपलो देव हाय.”

“माहो पंढरी जाम हुशार झालो. बोठबोठी वार्ता करव्याहो लागलो.” पार्वती काकी हये बोलली ना पंढरी हालो.

“मी आथा बटरा खाऊन घेता.” अहे बोलून त्यान मूजीनसा पाणी पेल्यान घितला. जाऊन मांदऱ्यावरती फतकल मारून बहलो. त्यान बटर पाण्यान बुडविला. बटर भिजला. मंगे खाला. त्याला पाण्याबरबर बटर खाताना बगून पार्वती काकीया आतड्याला पिळ पडलो. डोळ्यानशान टपटप पाणी टाक्याला लागली ती. दोन दिह पेज पिली. आज धानकांजी मिरला ता कुत्रो खाऊन गेलो.

'देवा काय यो नशीब? ‘पार्वती काकीन लुगड्याहा पदराला डोरा फुहिला. पण पाणी येतूस होता. डोऱ्यानसा पाणी थांबत नय होता.

(२)

रात झालती. संद्रा ना पंढरी जेऊन मांदऱ्यावर निजलता. बाजूलास पार्वती काकी पण पडलती. तिया नवरा सुकऱ्या पागेऱ्याला जाव्याही तयारी करव्या लागला. त्यान पागेरा काढून ठेविला. किरकंडीपण घितली. बत्तीमनी राकेल भरव्या लागलो तो.

"कवड्याहा यो राकेल?"सुकऱ्यान विशारला.

"तीन रूपयाहा."पार्वती काकी बोलली.

"तीन रूपयाहा यो राकेल? जाम महागडो झालो यो बाबू. बाहेरगावानशान येऊन आपल्याला लुबाडतान मेला." सुकऱ्या संतापून बोललो.

" अहून दे. तुमी क्याला व्याप करतान? 'जगाला ते बाबजीला' गरीबाना लुबाडव्याहाटीस काहीकांसा जन्म हता."पार्वती काकी सुकऱ्याला शांत करव्याहाटी बोलली.

अवड्यान दारान तुक्या आयलो. खोपटीन घुसलो.

"सुकऱ्या वावरी दे रा."

त्याला बगून पार्वती काकी ना सुकऱ्या दोगापण शिडला. सुकऱ्यान परदन्याहा ओटीन वावरी होती ती काडून दिली तुक्याला. त्यान सुलीनशा कुडीया पेटत्या कोळशावरती ती पेटवून घितली.

"पागेऱ्या ला साललो का? जाऊ नाका. आज आमोशा हाय. बाहेर रातशापरा भुता निगतान. गिऱ्होपण निगता." तुक्या विडी फुकित बोललो.

"कुणी हांगितला? तुन डोऱ्यान बगीतला का?"सुकऱ्या संतापलो त्यावर.

“हा मंगे. काल राशीश माना दिखलतो तो. मी काय हयेथये माणूस नय मिरे. मी घाबरता का त्याला? आयमाय काडली त्याही. परालो गांडीला पाय लावीत. तू हाय बारीक. तुला नय आयकव्याहो तो. त्याला माया हरकोस माणूस पायजे.”तुक्या सुकऱ्याला घाबरवीत बोललो.

“ गिऱ्हो म्हणजे काय असता?”पंढरीन विशारला.

“बोठो समुद्री भूत अहता तो. माणसाहरकोस दिखता. धोतर निहता. सदरो घालता. डोख्याला फेटो हता. मुशी बगीनता इ बोठीबोठी! दोरी हरकी. भेटलो का आपल्याखनी वावरी मांगता.”

“आथा तुमी बापाखनी मांगितली थये.”संद्रा बोलली.

“हा थयेस. सुरवातीला तो आपल्याला मदत करता. मंगे ए माडा हरको बोठो होता. राक्षसा हरको हता. माणसाला पाण्यान नाय ता शिकलान बुडविता.” ए सबन आयकून घरान घाबरा घाबरा झाला सबनाना.

“तो रेता कटा?”पंढरीन विशारला.

“पाण्यानूस” तुक्या बोललो.

“मंगे दर्यान जातान त्याना केव दिखे नय? तो किनाऱ्यावरतीस केव दिखता?”संद्रान विशारला.

“बाय जाम हुशार हाय तू. बोलण्यान पोपट हाय. तो थये केव ए मानापण माईत नय. सुकऱ्या तू जाऊ नाका. बारकी बारकी पोरा हात तुही.”

तुक्या कल लाऊन गेलो. सुकऱ्या घाबरलो. तो पार्वती काकीला बोललो, “काय गा पार्वती, मी उद्याला जान पागेऱ्याला. आजसा दिह रेवून दे.”

पार्वती काकी शिडली.

“त्या मेल्या तुक्याहा नादाला क्याला लागतान. तो हाय बंडलेलो माणूस. तुमाना घाबरून घरान ठेविन. सोता जान बग पागेऱ्याला. त्याहा मत काय आपुन उपाशी मरव्याहा ना त्यानं कमव्याहा. तुमी जा पागेऱ्याला. मावरा आयला ता दोन पैशे मिरतीन. पोरांसा धानकांजी हुटेन.”

सुकऱ्याला तिहा हांगना पटला.

“बरबर बोलता तू. मी जाता खये तो पागेऱ्याला”हये बोलून सुकऱ्यान खांद्यावर पागेरा टाकिला. किरकंडी कंबरीला बांदून घितली. बत्ती घिऊन तो खोपटिया बाहेर पडलो. तो जाताखोटी पार्वती काकीन दार वडकून घितलो. ती पोरांखनी येऊन पडली.

पंढरी ना संद्रा उठून आयशा बाजूला बहली.

“आया गोष्ट हांग ना.” पंढरी बोललो.

“मी अडानी बाई. माना गोष्ट काय येतीन?”

“ मिंजे? आया तू शाळीन गेलीस नय? “संद्रान विशारला.

"मी बारक्या पोरांशा शाळीन जाताहेत. माया सात बाहा ना दोन भनी. मी सबनान बारकी. माहा भनी फटकल. आगबोट नुसत्या. मी शांत. हसरी. दिख्याला पण सुंदर. बारीकशी. त्यापायी सबन बाहांशी मीस लाडकी. तुमसो कश्नो मामो माना कडीवर तुकून शाळीन घिऊन जाव्याहो. माहाठी झबली पण तोस आणव्याहो. त्याही मायावर जाम माया होती. मंगे तो उंबयला गेलो. सत्याग्रहान भाग घितला. माया शिक्षणाखनी कोणीस लक्ष दिला नय. एक हौस बगून शाळीन जाताहेत. पोरानां शिक्षणाहा महत्त्व नाय होता.”

“आया आमसो कश्नो मामो गांधीजीया बाजूला होतो का सावरकरशा?”पंढरीन विशारला.

पंढरीया हजिका न्यानाहा शब्द आयकून पार्वती काकीला हाव्याला आयला. ती बोलली, “तवडा माना काय माईत नय. पण अवडा माईत हाय का एकदा कश्नो मामो सत्याग्री बरबर कटातरू गेलतो. रातोरात त्याहीन आगगाडीया रस्तो उपटून काडला. इंग्रजांशी नोकरांसा पगार ना बंदूका, दारू घिऊन येव्याही गाडी त्याहीन पाडिलती. तीस सालशी ई गोष्ट. तवा जाम धरपकड झालती. बरासजीन पकडला गेला. कल लावणारा कमी का होता? आथा पण हात. त्यांशा मनशान एकान इंग्रजी शिपायांना कल लाविली. तो रेलो जमीन बक्षीस घिऊन ना गोऱ्यांसो मार खालो क्रांतिकारकांहीन. कश्नो मामो झालो फरार. तो शिपायांशा हातान लागलोस नय.”

अवडा आयकून पंढरी ना संद्रा जाम खुश झाला.

“आया आपला देश कवा स्वतंत्र होन गा?”पंढरीन विशारला.

“कुनजान कवा ते? लवकरुस होन हये वाटता. देव करो ना लवकरूस स्वातंत्र्यमिरो. मंगे आपला जाम कल्याण होन. पण कुनजान स्वातंत्र्य मिरून आपुन सुखी होतीनस याहा काय भरोसा? आपलीस माणसा आपल्याला नडतान.” पार्वती काकीया तोंड मावरला.

“हये केव बोलता आया?”

“आपल्यास माणसाहीण आपल्याला नाडलाय. माहा लगीन झाला तवा तुमसो बोठ्यापू दर्यान बुडून मेलो. त्याहा व्यापाही तुमशी बोठ्याय पण गेली. त्यांशा पोरांना मीन वाडवीला. त्यांशा गांड्या धुविल्या. सेवा साकरी केली. आंगाला मेंढी बहेन त्याहाठी त्याना कामा दाखवीली. मोठा झाला तवा त्यांशी लगीना लाऊन

दिली. तुमाना सांबालता सांबालता त्यांसो संसारपण बगितलो. दोन बाहा ना एक भन. यामनी बोठो रामसंदर बरो हाय. पण कुणी कुणी कान भरला. बायका पलटल्या. बायकांशा नादी लागून ते आपल्या पासून तुटला. आपली कवीही बोट हाय. सागरनौका. ती त्याहीन सालव्याला घितली. आपल्याला इ खोपटी मिरली. ते वेगळा रेव्या लागला."

"ए तुया बाहा जाम सांगला होता. तू बारका हाय तोंगनी बोटीनसा भाग देव्याला मंजूर झालता. पण आथा ते दोगा बायकांसा आयकितान. बोटीनसा तुहा मावऱ्याहा भाग देव्याला का-कू करतान. बापा एकदासा शीक. मास्तर हो. नको यो धंदा. जीवावर उदार होऊन दर्यान जाव्याहा. वादरवाऱ्यान झुंजव्याहा. काय मिरता? 'आंदरो दरता ना कुत्रो पीठ खाता'. आपल्या लोखांहीन शिकले पायजे. या मावऱ्याहा धंद्याहो काय भरोसा? ए गोरा लोक कवा काय करतीन भरोसा नाय. उंबयला काय केला त्याहीन? आपल्या लोकाना हाकलून किनाऱ्यावर राजवाडा बांधिला. तवा अडसापण काय हांगता येय नय. या धंद्याहा भरोशावर रेऊन फायदा नय. आपुन शिकल्या पायजे. नोकऱ्या केल्या पायजे. ते मारवाडी -गुजराती बग. धंद्यान पण ना नोकरीन पण लक्ष देतान. त्याग-सेवाभाव- परोपकार हाय त्यांशाखनी. आपल्यास लोखांशा पोटावर ते लाथ नय मारीत."

पार्वती काकीला काय हांगव्या हाय ए पंढरी ना संद्राला समजला.

"मंगे आया मी नोकरीस करू का? "पंढरीन विशारला.

"माही इच्छा हाय तून नोकरीस करव्याही. मास्तर होव्या. एकदा पैसो आयलो का मंगे सोताही बोट करून धंद्यावरती पण लक्ष देता येन."

पार्वती काकीहा उद्दीश स्पष्ट होता.

“ मी थयेस करीन आया.” पंढरीन वचन दिला.”पण माना कामावर कुण लावीन?”

“ कुण मिंजे? पागधरे मास्तर हाय. तुयो कश्नो मामो हाय. ए लावीतीन तुला कामाला. कश्ना मामाही उंबमनी जाम ओरख हाय. सत्याग्री माणूस तो. या खेपीला आयलो ना, ता तुला कामावर लाव्याहा ईषय काडता त्याखनी.”

पार्वती काकी थोडा येड थांबली. परत ती बोलली, “दोन वरीस हात. मंगे तू मास्तर होन. मंगे मी तुया ना संद्राया लगीन लाऊन देन. माही ओव ना जावय येन. माही बाजू होन. माही ओव मावरा निवड्याला मदत करीन. माना कुणी दम दिला का माहा जावय येन धावत. तो त्याना दम देन. पुनरपी माना कुणी दम देव्या नय.”

“आया तुला कुण दम देता हांग माना?”पंढरी शिडलो.

“कवडाजीन हात. कुणाकुणाया नाव घेव्याहा घरसा - दारसा सबनस हात. तुया बोठ्यापाही पोरा बरी हात. पण बायकांशा पुडा काय सालता त्यांसा? बायकांसा बईल झालेन ते. मीन त्यांशाठी केलेली कसोटी विहरला ते. घरानशीस माणसा बोलतान त्यापायान बारशा लोकांसा फावता. थयेस बीजा. गरीबाला सबन बोलतान दादा. जगाही रितस हाय ती. थोडा पैशे येऊन दे. तू जायपीनशा नोकरीला जाऊन दे बग खये मधूल्यावर माख येतान ते.”

पार्वती काकीया डोऱ्यान पाणी आयला. पंढरी ना संद्रान हाताही ते पाणी फुहिला.

“ तू रडू नाका. नाय ता आमानापण रडव्याला येता.” संद्राला रडव्याला आलता. पार्वती काकीन त्याना ऐंगीन घितला.

(३)

सुकऱ्या खाडीवरती पोसलो. पाणी हुकलता. आमोशा होती बगून सांद नय होतो. सांदण्या जाम होत्या. त्यापायी खाडीवरती बारीकसो उजेड पडलतो. सुकऱ्यान बगीतला. खाडीमनी लांबन लांबन दोन -तीन बत्त्या दिखत होत्या. मिंजे कुणीतरु पागेऱ्याला हात. खाडीया पाणी खळखळ आवाज करीत मगाटी जात होता. त्यामनी मावरा वेखलताना दिखत होता. कुणी होडीन बहून वावरी टाकीत होता. बत्ती अडशी तटा सालत होती. त्यावरनी सुकऱ्यान अंदाज केलो.

थंडो वाय हुटलो. सुकऱ्यान देवाया नाव घितला. तो खाडीन उतरलो. मावऱ्याहा अंदाज घेत तो पुडा जाव्या लागलो. पागेरा अरदा खांद्यावर ना अरदा दोनी हातान पसरुन घितला. त्याला पुडास मावरा उडताना दिखला. त्यान सरकन पागेरो उडविलो. तिहो टोक त्याहा हातान होतो. त्यान दोनी हाताही पागेरा हलूहलू खेचिला. वरशान खिचिल्यापायी पागेऱ्याला बांधलेलो शीसा जमिनीला गहून एकसारखा आला. त्यापायी मावऱ्याला बाहेर पडव्याहो रस्तो बंद झालो. त्यान पागेरा वरती तुकीला. बरास मावरा होता. नावेरा, टोय, हिंगारी, बोय, सरबटा, हाबऱ्या, शिंबोरी यो सबन मावरा दोन-दोन तीन-तीन टापा होती. त्यान सबनाना किरकंडीन टाकिला. मावरा आतमनी टपटप उडव्या लागला.

कसरा साफ करून त्यान परत पागेरा नीट धरलो. या टायमाला एकूस हिंगारी लागली. बिज्या खेपीला दोन बोया. एक-दोन-तीन-शार-पास. एकेक खेप करीत तो खाडीत बरास साललो. आथा तो एका होडीवाल्याखनी पोसलो. सुकऱ्यान वाट दिखव्यापुरता बत्ती नेलती. खाडीन उतरताना ती बिझवून थयेस किनाऱ्यावर

ठेविलती. होडीन बत्ती होती. दोन नाखवा होता. त्याहीन सुकऱ्याला बगून विशारला, ''कोण? सुकऱ्या का?''

'' हा. ना तुमी?''

''मी पांडू ना यो माणिक.'' त्यामनसा एकजीन बोललो.

"मावरा काय बोलता?''सुकऱ्यान विशारला.

"बरास हाय. बारकी पाटी भरत आयले.''पांडू बोललो.

"बरा, मगाशी तुक्या आलतो. लागलो माना घाबरव्याला. हांगता आज आमोशा हाय. गिऱ्हो निगता हांगता. झयेखये आम्ही पयल्यांदास येतान.'' सुकऱ्या बोललो.

''तवास आज जास्ती नाखवा दिखत नय. आपल्याला कटा टाईम रा आमोशा ना पोर्णिमा बग्याला. तू मनान काईस ठेऊ नाका. मनान ठेविला का ते खरा होता. त्या तुक्याहा नादीला लागू नाका. तो सोता ता आयलेय. तो बग जगीखनी हाय.''

माणिकजून दाखविलतो तटा सुकऱ्यान बगितला. काला काला माणसाहरका कुणीतरू दिखत होता.

''काय बंडलेलो माणूस हाय यो? माना हांगता आमोशाला गिऱ्हो निगता. सोता ता आयले.''सुकऱ्या हजप करव्याला लागलो.

'' पोटदुखी मानसा हतान इ. सोतायास पोट भरव्याला पायजे याना. बिजा मरतान ता मरून दे. यांशावरती ईश्वास ठेव्याहा खये?''

दोगाहीन निरोप घितलो. सुकऱ्या तुक्या जया होतो तटा बगीत रेलो. पाणी बदलला. आथा तो बुडव्याला लागलो. सुकऱ्याला ते समजला. तो मगाटी फिरलो. पागेरा पागेरा टाकीत-टाकीत तो परत फिरलो. डोख्यान विशार. लबाड दुनियेहा.

(४)

पंढरी खोब्रान आपल्या मित्राबरबर विटीदांडू खेरत होतो. त्यांसा खेर रंगान आयलो ना तटा वाल्या, रामसंदर इ त्याही बोठ्यापाही पोरा गेली. जोडीला भरत, जगन, राजाराम, यशवंत इ माणसापण होती.

"काय रा पंढरी, कवडाक खेरता? तुला काय संसाराही धास्ती हाय का नय? पंधरा वर्ष झाली तुला."वाल्या शिडून बोललो.

त्याना बगून पंढरीया डोखास फिरला. तो गूपसूप उबी रेलो.

"शाळा होड. बोटीन सड. तुला कवडाक फुकटसा भाग देव्याहा आमी. बोटीन खपतान ना तुला दोन वर्सापासून मावऱ्याहा भाग देतान. बिजा कुन हता ता देता नय." रामसंदर शिडून बोललो.

"मी बोटिन जाव्याहो नय. मी शिकव्या हाय." पंढरी नाक वाकडा करुन खाली मान घालून बोललो.

"शिकून कोणता दिवा लाव्या हाय ते माईत हाय." वाल्या वाकड्या तोंडाही बोललो. पार्वती काकी मावरा देता ना पागधरे मास्तर पास करता. मास्तरशा घरान कामा केली का झाली पोरा पास. शिकून गोऱ्यांशी गुलामी करव्यापेक्षा बोटीन सड. आपली सोताही बोट हाय. बोटीन साहेबा हरका रेव्याहा."

"नय. मी बोटीन येव्यास नय. मी शिकेन."

“खये नय येव्या तेस बगिता मी.” वाल्यान दम दिलो. पंढरीया अंगाला कापरो भरलो. डोऱ्यान पाणी आयला. राजारामला त्याही दया आयली. तो बोललो, “जाऊन दे रा. शिकून दे त्याला. दोनूस वर्साही ता गोष्ट हाय. मंगे येन तो बोटीन.”

“ नाय दादा. एकदा का तो मास्तर झालो ना ता मंगे काय येता बोटीन. तोंगनी आपल्याना त्याला फुकटसा भाग देव्याहा लागेन.” वाल्या बोललो.

“ ते मंगे बगू. सला अडसा. खेलून दे त्याला.”भरत सबनाना घिऊन निगालो.”उलट यो शिकलो ता बरास फायदा होन तुमाना. आथा ब्रिटिश लोका जातीन. देश स्वतंतर होन. तवा मच्छीमारांठी बरास काय काय मिरेन हये आयकिले मीन.”

“ हा. इंजिनशा बोटी येतीन हये बातमी हाय. तवा पंढरीया शिक्षणाहा फायदा होन तुमाना. शिक्षण वाया नय जाय. शिकून दे त्याला.”यशवंत बोललो.

पंढरी त्याना एकहरको बगीत रेलो. आपल्या नशीबान काय हाय याहा विशार करव्याहो लागलो. दूरशा बोटी त्याला बगवत नय होत्या.

‘ हे समुदरा, माना अवड्या लवकर बोटीन नाका बोलवू. शिकून दे माना.’

समुदरान त्याही प्रार्थना मानली नय हये त्याला वाटला. मास्तर का नाखवा? शिक्षण का मच्छीमारी? शाळा का बोट? नक्की काय नशीबान हाय ए त्याला समजत नय होता.

(५)

राशी जेऊन झाला ना पडव्याही खोटी बस का बोटी आयल्या. संद्रा ना पंढरी नीजारीन होता. पार्वती काकी दार वडकून एकटीस पाटी घिऊन मावरा लाव्याला बंदरावरती गेली. बंदरपट्टी राकेलशा बत्तीया उजेडान लखलखून निगलती. खलाही बोटीनसा मावरा काडून पाट्यान भरून भागवाल्याखनी नेऊन देत होता. पाट्या वावताना खलायांशा पावलांसा धपधप आवाज येत होता. पाट्याहा ओझ्याही बडका करकर वाजत होता. बोटिनशा गमताहा वास बंदरावर पसरून गेलता. अवडा का, एखादो भट-बामण हतो ता तटास बकाबका ओकला हता. भाजीपाल्याही गाबोरी सबन बाहेर काडली हती. बत्तीया उजेडापायी बोटीपण लखलखून गेलत्या. बंदरावर मावरा काडव्याही मावरा निवड्याही ना मावरा लाव्याही एकूस धांदल सालू होती.

पार्वती काकीही वनारी बिज्यानशापेक्षा थोडी दूर ना आड बाजूलास होती. ती ना विठा दोगीपण एकमेखांशा बाजूला बहून मावरा निवड्याला लागल्या. बंदरावर थंडोथंडो वाय हुटलतो. सागराया मोजांसा आवाज कानान येऊन आपटत होता. सांद वरती आभारान आलतो.

“ पार्वती बाय पोराना केव नय आणला मावरा निवड्याला?”विठीन विशारला.

“पोरा निजलेन. हकालशी शाळीन जाव्या लागता. कंटारतान बिशारी. त्यानापण कवडाक तरास देव्याहा. मावरापण कवडाक हाय? तीनूस पाट्या हात. आथा होन.” पार्वती काकी बोलली.

“ना तूहो नवरो कटा गेलो? मावरा निवड्याला बायकूला मदत करव्याहा का नय?” विठीन बोंबील पाटीन टाकीत विशारला.

“ तो काय गा पिऊन निजलाय. आथा काय त्याही जिम्मेदारी खपल्या हरकी हाय. पावशेर घेव्या ना बटाटीवडा खाव्याहा बस इ दोनूस कामा हात त्याला. कवाकवा पागेऱ्या, घोलव्या, वेडी जाता. त्याहा पैशे मानास देता. खोटा क्याला बोलव्याहा” पार्वती काकी नवऱ्याहा गराणा विठीला हांगीत होती तवा तटा कायतरू खडबड झाली. दोगी जाम घाबरल्या.

“शी! थू! कवडी घाबरली मी! काय गा ये?”विठी घाबऱ्या घाबऱ्या बोलली.

“काय नय गा. हुक्की धोंडेरी हात ती. बाजूला कुत्र्यांशी मारामार सालू हाय. त्यांशापायी उडली हतीन.” पार्वती काकीन धीर देऊन हांगितला.

विठीन आखनी जाऊन बगितला तवा तिला बरा वाटला.”बिजा काय नय गिऱ्याहो घाबरा वाटता” विठी बोलली.

“ अटा कटा गा गिऱ्हो येता?” पार्वती काकीला ते पटला नाय.

“अटा कटा मिंजे? तो कटापण येऊ शकता. त्यामनी आपल्या वनाऱ्या टोकाला हात. बिजी माणसा आपल्या पासून लांबन हात. पाणी आखनीस हाय. गिऱ्याला येव्याला वेड नय लागव्या. पटकन कटनी येन हांगता येत नय.”

“जाऊन दे गा. क्याला त्याहा नाव काडता?” पार्वती काकी घाबरली. देवाहा नाव घेव्याला लागली ती.”गुरूदेवा ब्रह्मानंदस्वामी रक्षण कर. रक्षण कर.”

गुरूदेवाहा नाव घितास तिला धीर आयलो. दोगी परत मावरा निवड्याला लागल्या. विठीया तोंडाहो पट्टो परत सालू झालो.

“तुला माईत हाय का, माहा हाऊ ही हाऊ ही होती ना ती पण हयेस मावरा निवड्याला बहलती. एकटीस. गिऱ्हो आयलो ना बत्तीवरती विडी पेटविली ना यो माडा असणो झालो. माहा हाऊ ही हाऊ ता लुगड्यानूस मुतली. पास दिह नंगन ताप उतरलो नय. पान ओवारुन काडला. नारोल फोडलो. औषधपाणी केला. तरू फरक पडलो नय. नशीब बगून ती वासली.”

पार्वती काकीया गुरूदेव ब्रह्मानंद स्वामी या नाव घेव्याहा सालू होता. तीन अजिबात अटातटा बगीतला नाय. चुपचाप मावरा निवड्याला लागली.

“काय गा पार्वते? मी बोलता ता माखनी लक्ष देई नय ती.” विठी शिडली.

“ क्याला लक्ष देऊ? देवाहा का बोलता तू? तुला मेलीला सदा न कदा भुताखेतास दिखतान ती. देवाहा नाव घे. सतगुरुया नाव घे. काय वाईट होव्या नय.”

“तू खरास बोलता बग. नुसती वार्ता करून आपुन आपला रगत आटवून घेतान. देवाहा नांव घितला ता गरजीला तरू येन.”

विठीला पार्वती काकीया बोलना पटला.

“तून कुणाला गा गुरू केलाय?” तिन विशारला.

“ ब्रह्मानंद स्वामी याना. दूर डोंगरान रेतान. गेल्या सरावन मयन्यान प्रभू रामाहा देवळान आलता. तेज काय! तू मनशान. आपली हिंमत नय होय नजर देव्याला. सबनाहीन त्याना गुरू केला ता मी पण केला. बोलता काय भारी! ज्ञानाया एक एक गोष्ट हांगता का आईकीतूस रेव्या हये वाटता. 'गुरू शिवाय मार्ग नाय' बाय येत्या सरावनान मी त्याना जेवण घालीन. माहा पोराना सांगला आशीर्वाद मिरेन.”

“ अगा, पण आपुन मावरा खाणारी माणसा. तो योगी माणूस. आपल्या घरान खये काय जेवितीन?”बोंबील पाटीन भरता भरता विठीन विशारला.

“सदगुरु देवमाणूस हाय. त्याखनी भेदभाव नय. सतगुरु हांगता जया पवित्र मन हाय तटा परमेश्वर हाय. मन पवित्र हला का आंग पवित्र होता. आंग पवित्र झाला का घर पवित्र होता. घरानसा कपडालत्ता, सामानसुमान पवित्र होता. घराया मंगदार - पुडदार पवित्र होता. आख्खा हेजोर पवित्र होता. करता करता गाव ना देश पवित्र होता.”पार्वती काकी बोलली.

“ मन साफ हला का सबन साफ हता बग. कीर्तनीबुवा कीर्तनान हांगतान ना आपल्याला. मी पण त्याना गुरू करीन. कवा येव्या हात ते तुया घरा?” विठीन विशारला.

“सरावन मयन्यान. नागपंचमीला, प्रभू रामाहा देवळान येतान. गुरूपोर्णिमाला ता येतानस येतान. खरास कर तू गुरू त्याना. मनाला सुख-समाधान मिरता. यो संसार मिंजे सागर हाय. खपता खपव्याहो नय. आपुन खपून जातीन. काय सुख हाय या संसारान? अवडा खपून-दपून पोटाला हेक लागे नय. आंगावर उहना पैशे घेव्या लागतान. देवाधर्माहा काय तरू करव्यास. तेस खरा हाय.” पार्वती काकी अध्यात्म समजावीत बोलली.

पार्वती काकीया शब्द न शब्द विठी मन लावून आयकीत होती. तिला पार्वती काकीया बोलना पटला.”खरा हांगता तू. देवाधर्मानूस खरा सुख हाय.”

“सतगुरुहा शरणान खरा सुख हाय.”पार्वती काकी बोलली.”कनशीस शींता वाटे नय. घाबरा वाटे नय. कोणीतरू आपला रक्षण करता हये वाटता.”पार्वती काकी विठीला अध्यात्माहा महत्त्व हांगित होती.

“ मिंजे गिऱ्याहो पण घाबरा वाटे नय. बरबर ना?

“ ता काय”

“ मंगे तवाशी केव घाबरलती?”

“ येता गा कवाकवा घाबरा. जवा आपुन देवाला विहरतान तवा होता घाबऱ्याला.” माणसाहा जीवनान भीतीया खरा कारण पार्वती काकीया तोंडानशाश बाहेर पडला.

“गिऱ्याही बिजी गोष्ट हांगू का?”विठीन विशारला.

“ हांग. मी नय घाबरे. माहा सतगुरू हाय.”

विठी हांग्याल लागली.

“ कनशातरू गावान एक डोखरो होतो. तो रोज राशी पागेऱ्याला जाव्याहो. त्याला मावरा लागव्यास नय. एकदा राशी एक माणूस त्याला बोलव्याला आयलो. तो गिऱ्यो होतो. दोगे पागेऱ्याला जात होता. गिऱ्यो पाण्यान बुडी मारून जाम मावरा काडून देव्याहो लागलो. बस्स! मंगे काय. डोखऱ्याही मजा! गावान झाली बोंबाबोंब. याला एकट्यालास केव अवडा मावरा मिरता?

सौकशी करता समजला का तो गिऱ्यो हाय. डोखऱ्याला सडलो ताप. कुणीतरू समजून हांगितला.’आपुन त्याला धडो शिकवू.’

झाला. ज्या दगडावर गिऱ्यो येऊन बहव्याहो तो दगड तापविलो लोकांहीन. राशी गिऱ्यो येव्याहा टायमावरती दगड साफ केलो. पक्को तापलतो तो. गिऱ्हो त्यावर बहता खोटी डाम लागलो त्याला. ए गांडीला पाय लावून परालो तो. आथा कुणायास समोर येई नय.”

“हये का? . बरो धडो शिकविलो त्याला.” पार्वती काकी बोलली.

“आथा अदीन- मदीन दिखता कुणाला तरू. ज्याही गिरादशा खराब हता त्यालास दिखता तो”.

“ धर्मा बापाला नय का राशी शिकलान गाटून ठेविलतो. बिशारो, कटा राशी संडासला गेलतो. गिऱ्यान धरून शिकलान बुसकारून काडलो त्याला.” पार्वती काकीन जे माईत होता ते हांगितला.

“ जाऊंदे त्याही वार्ता. आपल्या धंद्याहा बोल. अमदा बोंबील बरो हाय. भाव मिरेन” विठी बोंबील हातीन धरून बोलली.

“भाव ता मिरल्यास पायजे. त्याहीस उहना घितलेला पैशे फिटतीन. दोन पैशे गाठीला रेतीन. उरलेल्या निरला, मांदेरी, हुकट, शिरलेला मावरा हायस. रोजसा खर्च हुटेन.” पार्वती काकी करदी टोपलीन भरीत बोलली.

“आपुन सबन बायकाहीन एकी करू. दलालाखनी बोंबलाला भाव वाडवून मागू.” विठीन सुचविला.

“ माहापण तोस विशार हाय. दुपारशी सबनाना हांगू आपुन.”

दोगांशा काम करता करता वार्ता रंगान आयल्या. सांद वरती सडत होतो. बंदरावर मावरा निवडिला जात होता. वनाऱ्या बोंबलाही भरत होत्या. दला करदी मांदेऱ्याही भरून जात होता. रेतीमाती हुकट ना कुट्याही भरत होता. बंदरावर मावऱ्याहा कुजट वास पसरला.

(६)

दुपारशा परा सबनानशा घरान जेव्याहा टाईम. पार्वती काकी जेवण वाड्याह्या तयारीनस होती का दारान विठ्ठलशा घरसो रमेश आयलो. बारको पोर. पासस वरीस वय हतीन.

“मावशे आयजून कांजी मांगितलाय.” त्यान हांगितला.

“ तुही आय कटा हाय? तिन तरू येव्याहा होता. जा तिलास पाठव. नाय ता तुया बोठ्या बाहाला घिऊन ये. घरशी टोपा घिऊन ये. देता कांजी.” ती बोलली.

पार्वती काकीया निरोप घिऊन रमेश घरा परत गेलो. थोड्या रेरान रमेशशी आय बारकी टोपा घिऊन पार्वती काकीया दारान उबी रेली.

“अटा दे टोपा. हये लाजव्याहा नय. मांगव्याहा. हेजोरधर्म क्याला हांगितले.” पार्वती काकीन कालकाह्या हातानशी टोपा घितली.

“ काय हांगू पार्वती बाय. रोजरोज मांगव्याला लाज वाटता. आजपण घरान फोडव्याला काय नय मिरे.” कालका रडव्या तोंडाही बोलली.

“हवून दे. घरानशी इज्जत काडव्याही नय. हेनानशी कीड हेनान रेई नय देव एक पण दिह दूर करीन.” पार्वती काकीया शब्दाही तिला धीर आयलो.

“काय गा केलाय जेव्याला?”तिन विशारला.

“घन्या दिहान वाड्डे ना हेकटाया पाल्याहो शाक केलेय. होडा तरलेन. पोराना जाम आवडता. जास्तीस केलाय.” पार्वती काकीन उत्तर दिला.

“काय हांगू बाय, शार दिह झाला याना बरास नय. त्यापायी बोटीन जाई नय. गेल्या टिपीला वागराला बोट गेलती. मशेरी नाय दिली बगून ए बोटीन गेलास नय. त्यास टिपीला बरास मासा होता. तीन- तीनशे रुपये वाट्याला आलता खलायाना. कपारावर हात दिलो मीन. दोन आण्याही मशेरी जाम महागान पडली. तोस पैसो हतो ता आज पोराना काम पडतो.” कालका थोडा शिडून थोडा रडून हांगित होती.

“हवून दे गा. गेली ती वार्ता. आपल्या नशीबानस नय होता त्याला आपुन तरी काय करतीन. 'गेली ती गंगा ना रेला ते तिरित' हये समजव्याहा. घे ये कांजी. धान पण घे.”

“धान क्याला?”

“माना माईत हाय. कांजी नय ता धान कडसा हतीन. लाजव्याहा नय. आथास माणसा ओरख्याही. मेला ता गेला. सबन जाग्यावरूस रेता.”

कालकाया डोऱ्यान पाणी आयला. तिन पदराही पाणी टिपीला.

“ बाय तू जाम बरी हाय. भूखीही भूक जानता. तानीही तान जाणता. देवा हरकी हाय बग तू "कालका बोलली.

“नाय बाय. आपली बरबरी देवाया बरबर करव्याही नय. सांगला वाग्याला देऊस आपल्याला बुद्धी देता. आपुन पुण्य करीत रेव्याहा. कवा तरू उपयोगी पडता.” पार्वती काकी बोलली.

पार्वती काकीन धान कांजी दिला. ते घिऊन कालका घरा गेली. तिला मदत करुन पार्वती काकीया मनाला समाधान वाटला.’देवाही नि:स्वार्थ खरी भक्ती करून ना अडल्या नडल्याना खरी मदत करून माणसाला खरा सुख मिरता.’

(७)

उधान होता बगून बोटी घरास होत्या. बंदरावरती वनारांशा अगदी टोकाला रेतीमातीही बाठ होती. तटा डोली हिव्याठी हुट्टो-हुट्टोस मांडव टाकिलतो. बोठबोठा बडका उबी करून वरशान नारलिया हावल्या टाकिलत्या. शारी कोपरा खुला. दामू, रामसंदर, वाल्या, भरत, राजाराम, यशवंत, जगू ए सबन डोली हिव्याला बहलता. जहे सूर्य डोंगरावरती आयलो थये ते डोली हिव्याला आलता. भांग पडला का परत कव माऱ्याला जाव्या होता त्याना.

"आपुन पंचमीला कव माऱ्याला जाऊ. खये" दामू बोललो.

"तोंगनी डोल्या हिवून होतीन." भरत डोलीला नाथा मारता मारता बोललो.

"सोवा तयार हात ना? या फेरीला शंभर फूट तरू कव मारू."

"ते काय खाली पडलेन. शंभर फूटापेक्षा जास्त बोठा हात ते." राजाराम बोललो.

सबनाहिन एक नजर खाली टाकिली. तटा बोठीबोठी लाकडा एकमेकाना लोखंडाया पट्ट्या जोडून टाकलेली दिखली.

" बरी मजबूत दिखतान खरी." यशवंतला समाधान झाला.

बंदरावरती थंडो वाय हुटलतो. दर्यावरनी येताहेत तो. बायका हुक्का मावरा घेव्याला बंदरावर पाट्या घिऊन येत होत्या. वनारीवरसो हुकलेलो बोंबील, निरली, मांदेरी, दलावरशी करदी एकेक पाटी भरून घरा घिऊन जात होत्या. त्यामनी रामसंदरशी बायकू रूपा ना वाल्याही बायकू कुसूम या दोगीपण होत्या. त्या पाटी

घिऊन मांडवाखालीस आयल्या. त्याना बगून राजारामजून विशारला, "ओबाय, मावरा घेव्या टाकून अटा केव?"

"याहिन बोलविलता भुजलेला बोंबील, बोंबलाही सटनी ना परकुटा घिऊन. ते घिऊन आयले." रूपा टोपली माथ्यावरशान डेवरुन बोलली. तिन रामसंदरशा हातीन डबो दिलो."घ्या."

" व्वा! न्याहारी वाटता. आमशाहाटी हाय का?"भरताहा तोंडाला पाणी हुटलो.

" हा दादा. सबनाहाटी आणलाय. खा तुमी. आमी येतान." कुसूम त्या पुरषांना बोलली.

दोगी देरानी-भावलनी पाटी घिऊन मावरा काड्याला गेल्या.

"दोगांशी जोडी बरी हाय."राजाराम बोललो.

"हात देवाया कृपेन." वाल्या.

"लगीनाहा कर्ज फिटला का?" यशवंतान विशारला.

"हा फिटता हळूहळू."रामसंदर बोललो.

" कर्ज क्याला काडव्याहा? करव्याहा होता हयेस लगीन. लगीनान लागता काय? नवरा-नवरी, बामन, हारफूला, एक मंगळसूत्र ना देऊल."जगू बोललो.

" हा बाबा पण हारफुलाला, बामनाला, कपड्यालत्त्याला, मंगळसूत्राला पैशे लागतान का नय? ते कटनी येन?

आपल्या बापाह्यो बतेलो उसपले का आपल्याखनी का पैसो हाय? कुणाही मदत पण नाय. कुण करीन मदत? परतेकाला पोट हाय. हातान आणून पानान खाव्या हरकी गत आपली. थोडा कर्ज काड्याला लागतास." वाल्यान परस्पती पटवून दिली.

“कवडा काडीलता कर्ज?” राजारामजून विशारला.

“मीन दोन हजार रुपये ना दादान काय दीड हजार काडीलता. अर्ध्यापेक्षा जास्त फिटलेन आथा. कर्जवाल्यहा कर्ज काडला पण कुणाया पाया नय पडला. सोताया हिमतीवरती लगीन केला.”रामसंदर बोठापण करीत बोललो.

“ओ दादा, आमीपण आमशा हिमतीवरूनस लगीना केली. आयबापावर ना हगीहोयऱ्यावर रूसून नय बहला. ऐपतीपरमान केला. शैवटी कर्ज ते कर्ज हता दादा.” यशवंत बोललो थये रामसंदरसो अभिमान पडलो खाली.

“ते ता खरास. पण बिजा मार्ग पण नाय ना.” वाल्या बोललो.

“आथा बरा दिह येतीन. आथा थोड्यास वर्षान देश स्वतंतर होन. ब्रिटीश गेला का आपलास राज्य. मंगे मावऱ्याला भाव पण मिरेन. इंजिनशा बोटी येतीन. अटा खाडिया काठाला दगडा पडतीन. अजून बरास काय काय हाय. मंगे कर्ज काडव्याला नको.”भरत माहिती हांगित बोललो.

“बरा होन मिंगे. पण हये होव्याला नको, ‘बोटस मावरा खाता' आपला लोक ब्रिटिशाना हाकल्याठी सत्याग्र ना काय काय करतान. उद्या आपलास राज्य आयला ता बिज्या कुणाही गुलामी करव्याला नको. अवडास मागणा हाय.”वाल्या बोललो.

“ ब्रिटिश पण थये काय वाईट नय मिरत. बऱ्यास सोयी केल्यान त्याहीन. शाळा, कालेज, दवाखाना काडलेन. गाड्या सुरू केलेन. तार यंत्र आणलेन. उंबयला सबन कोलीवाड्याही जागा मापून त्याही नोंद करव्याला लाविले. आपली लोका वेडी हात. आपुन ब्रिटिशांसा गुलाम हात त्याहाठी नोंद करवून घेत नय. थयेस. नोंद करवून घेव्याला पैसे नय. बगून ते आपल्यास जाग्याही नोंद करवून घेत नय. देश स्वतंतर होन तवा करू हये बोलतान.” भरत बोललो.

“दादा काय बोलता तू? कुणी आइकिला ता तुला गद्दार हांगतिन. ब्रिटिशांना सांगला हांगता तो.”राजारामजून दम भरलो.

“मी क्याला गद्दार? जे सुगली करून जमिनी घेऊन रेलेन त्याना कुणी गद्दार नय बोलत. मी फक्त ब्रिटीशांहीन जे सांगला केला ते हांगता. मी त्यांशी बाजू घेई नय. थये ता आपुन ब्रिटिशांशा आदीपासून कुणाहा ना कुणाहा गुलाम होतास ! "भरत आपली बाजू मांडीत बोललो.

“तुला जाम माईती हता ती.” दामून विशारला.

“मी उंबयला गेलो का आधी पेपर घिऊन वाशीता. रेडिओ पण आइकिता. थोडा पैशे आयला का रेडिओ आणता बग मी. बरा पडता ते. बातम्या आईक्याला मिरता. पुढाऱ्यांशी भाषणा आईक्याला मिरतान.”भरत हांगित होतो.

“वादरवारा कवा येता त्याही माईती येता का रेडिओ वरती?” दामून विशारला.

“ नय येय. परदेशान येता. आपल्या अटा थये यंत्र भवडिलेन. काही दिवसान वादरवाऱ्याही माईतीपण मिरत जान रेडिओ वरती.” भरत बोललो.

“मिरली ता बरास होन. या वादरवाऱ्याही आपला कवडया तरू बोटी बुडल्या. खलाही मेला. नुकसान होता रा. तुला चाळीस सो वादर आठवता का?” राजारामजून विशारला.

“अये बाप्पा, नाव काडू नाका त्याहा. आंगावर काटा उबी रेतान. हये तुफान आपल्या अटा कवास झालो नय हये हांगतान.”रामसंदर बोललो.

हा आठवता ना! त्या दिवशी गटारी होती. अखाडसो पाणी मिंजे काय! आसरा नय त्याला. रातपासून धो धो लागलतो. हकाल झाली तरू कारोख किट. त्यामनी बोठो उधाण. अटा. खोपटीन मटन हिजे नय ता दर्यान पाणी वाडला. कांदो मुरो कापून जेव्याला बहव्याही खोटी का वायाहो जोर वाडलो. मोजा आयला डोंगराअसना. खोपटीवर आपटला. एका झटक्यान मोडली खोपटी. सुकऱ्या काको

पार्वती काकी, पंढरी, संद्रा, आमी दोगा ए धावतान. मीन धानकांजी ढाकून मारली धाव. रामसंदरजून संद्राला कडीवर घितली. पंढरीहो हात धरलो ना त्यान पण धाव घेतली. किनाऱ्यापासूनशा लांबशा खोपट्या वासल्या. त्यावरीस कवड्या खोपट्या गेल्या. कुणाह्या मोजा आपटून फुटल्या. कुणाह्या कचऱ्या हरक्या उडल्या.''वाल्या आठवण काडीत बोललो.

बारकी पोरा ना बायका घाबऱ्याही कवड्यातरू रडल्या. मी पण थरथर कापीत होतो. आथा जगबुडी झाली का काय हये वाटला. वादरस थये होतो तो. बगीतला का आपल्या या खाडीही वाट खये बदलली ती. जटा बाठ होती तटा खाडी झाली. ना खाडी होती तटा बाठ झाली.'' राजा, राम बोललो.

''नशीब आपला. अवडो बोठो तुफान कवा दर्यान पण बग्याला नय मिरलो. आगोठीया आपुन घरा होता बगून. नाय ता या वादरान आपला आख्खा गाव दर्यान खलास झाला हता. अटा एकपण गोवमाणसा दिखली नहती. मंगे आपल्या पोराहिन ना बायकाहीन काय रा केला हता ?''वाल्यान विशारला.

ए आयकून सबनानशा आंगावर काटा उबी रेला.

'' नको ती आठवण. नाश्ता काड.'' राजाराम विषय बदलव्याही पाना पालटीत बोललो. वाल्यान डबो उघडिलो. परतेका एकेक परकुटा दिला. हुक्क्या बोंबलाही सटनी दिली.

''भुजलेला बोंबील दे.'' यशवंत बोंबील मांगित बोललो.

'' ते साकण्याला रेवून दे.'' वाल्यान ओटीमनशान पावशेरशा दोन बाटल्या काडल्या.

'' ए पण हाय का. सल दे एकेक घोट. 'दुख दर्द की दवा. पावशेर की हवा'. राजाराम बोललो ना सबन हाव्याला लागला.

(८)

'सागर नौका' ला किनारा होडून दोनेक तास झाला. जोडीला 'सीताराम' ना 'जय संतोषी' या बोटी होत्या. आज ते कव माऱ्याला जात होता. तिनीपण बोटीया मगाटी शंभर फूट लांबिहा मेडा घिऊन ते दर्यान जात होता. आगोठी अगोदरस कव मारून ठेविला का मंगे सिजनला डोली माडव्याला सोपा जाता.

"आपली कव अजून थोडा लांबन हाय. आथा पोसतीन." वाल्या बोललो.

दामून हुकान धरिलता. वायाहा जोराही शीड हालून बोट पुडापुडा जात होती.

" ती बग शंभर एक हातीवर आपली कव." राजाराम बोललो तटा सबनानसा लक्ष गेला.

" हा पोसला खरा." सबनाना बरा वाटला.

तिनी बोटी कवीखनी पोसल्या.

" सागर नौक, मेडाला एका जागीवर धरून ठेव्याला मदत करीन.'सीताराम' ना 'जय संतोषी' वाल्या हिन दोन टोकाला उबी रेवून मेडा उबी करव्याला मदत करव्याही." पांडू पलान समजावीत बोललो.

सबनजीन पटकन कामाला लागला. तीन बोटी धरुन वीसेक खलाही हतीन. कुणी जाडा दोड्डा बांधव्याला घितला. कुणी बारका दोड्डा बांधीत होता. शार-शार, पास-पास जीन मिरुन गाठ बाधव्याला गहरलता. असना बोठा मेडा उबी

करव्याहा मिंजे खाव्याहा काम नय मिरे. त्याला हिंमत, ताकद ना डोखा लागता. खलायांसा साथ लागता.

"तांडेल दोड्डा बांधून झाला."यशवंत बोललो.

"झाला. सला. लागा कामाला." वाल्यान सूचना केली.

"एकवीरा आईचा जय असो. दर्या सागरा साथ दे."

सबनाहीन दर्याला हात जोडला. तिनी बोटीवर नारोल फोडला गेला. अक्षता टाकिल्या गेल्या. उदबत्त्या लावल्या गेल्या.'सीताराम' ना 'जय संतोषी' दोड्डा घिऊन सागर नौकेह्या बिज्या बिज्या बाजूला गेल्या. मेडा सागर नौकाला सरल होता. शार-पाच जीन मेडाह्या एका टोकाला खाली उतरला. त्याहीन मेडा खाली पाण्यान दाबून ठेविला. बिज्याहीन डेकवर सडून दोरलीही मेडाह्या पुडसा भाग वरती खेचिला. मेडा वाकडा झाला.'सीताराम' उगवतीला होती. तिन दोड्डा खेच्याला घितला. मेडा उगवती खनशान वरती होत गेलो. मेडाह्या खाली पाण्यान जे खलाही होता त्याहीन दोड्डाला बोठीबोठी दगडा बांधीलती. ते पण मेडाला खाली दाबीत होता. त्यापायी मेडा खाली पाण्यान जात होता.

'सीताराम' दोड्डा खेचित होती.'जय संतोषी' दोड्ड्याला ढील देत होती. सागर नौकेहा खलाही मेडा पाण्यान उबी करव्याला जोर लावीत होता. जरापण सूक झाली ता कुणाहा तरू जीव जाव्याहो घाबरा होता. हातपाय तुटू शकत होता. डोखा फूटू शकत होता. बोटपण पलटी होव्याही शक्यता होती. शंभर फूट जवलपास पास-सहाशे किलो वजनाहा तो मेडा पाण्यान उबी करव्याहा मिंजे साधी गोष्ट नय. पण तिनी बोटीहा खलाही होता जिगरबाज. त्याहीन सालविला डोखा. केली हिंमत. मेडा झालो उबी शिकलान.

पाण्यानशी माणसा बाजूला झाली. तिनी बोटी मिरून दोड्ड्याही मेड्याही उबी ठेविलतो. हालत्या पाण्यापायी तो उबी रेत नय होता. पांडू ना वाल्यान दोनी बोटीना इशारो केलो. तिनी. बोटीह्या खलायाहीन जोर करून मेडाला पाण्यान दाबिलो. मेडा सरसर करीत गेलो पाण्यान. बरबर शिकलान जाऊन बहलो तो. खलायाहीन अजून जोर लाविलो. दाबून दाबून घितला. मेडो शिकटलो शिकलान. मेड्याला दोरल्या बांधलेल्या होत्यास. खलायाहीन त्याला बोठी दगडा बांधून होडली शिकलान. ती पण जाऊन बहली. मेडो अवडो घट बहलो का कवडो वायवादर आयलो, तुफानी मोजा आयला तरु तो पडव्याहो नय.

“सला, एक मेडो उबी रेलो बाबा.” पांडून समाधान मानला.

“बिजा मेडा हात.” राजाराम बोललो..

“लाऊ. पयला न्याहारी खाऊ ए.”वाल्या बोललो .

तिनी बोटी जवलजवल आयल्या. भुजलेला बोंबील ना धान खाला त्याहीन.

“ जाम कष्टाया, कटकटीया ना धोक्याहा काम हाय यो. मावरा मोफतसा नय दादा.” राजाराम बोललो.

"आपल्या कोल्यांसा जीवनस कष्टाहा हाय. जीवन-मरणाहा हाय. जो मरणाला घाबरेन तो मावरा काय मारीन.” पांडू बोंबील सावीत बोललो.

“ बरबर हाय. कोली मिंजे 'दर्याहो राजो'. दर्याहा आंगा-खांद्यावर खेलव्याहा काम त्याहा. या जगान जटाजटा सागर हाय, तटातटा आपल्या हरकीस कोली लोका कष्टाहा, धोक्याहा जीवन जगत हात. मीन एकदा एका पुस्तकान वाशीलता. परदेशान 'कोलंबस' नावाहो तांडेल होतो. तो बोठी बोट घिऊन आपल्या अटा, भारतान येत

होतो. त्याहा डोखा फिरला ना तो गेलो उलटो. पोसलो बिज्यास देशान. तो अटा येतो ता आपल्या पूर्वजांही ना त्याही भेट झालीस हती.” भरत बोललो.

“ मीन आईकिलाय का 'वासूयो मामो' का कून तो तांडेल बोठी बोट घिऊन पयला आपल्या देशान आलतो. तवा या गोऱ्या लोखांना आपल्या देशान येव्याहा मार्ग भेटला.” यशवंत बोललो.

“ तो वासूयो मामो नय ‘ वास्को - द- गामा होतो.” भरत बोललो.

“हनून दे. कुन तरू हाय ना. मंगे बस. ए सबन एकास कुळांसा ‘दर्यावर्दी’. आपला पूर्वज पण पयला राजामहाराजांसा व्यापाराहा माल घिऊन देशा-विदेशान बोटी घिऊन जात होता. आपुन आथा मावरा मारतान.” वाल्या गाहा खात बोललो.

सबनजीन भूजलेल्या बोंबलावर तुटून पडला.

“ आथा मी काय हांगता ते आईका.” पांडू पलान हांगव्या लागलो.”सीताराम ना 'जय संतोषी' या दोगी जवर येऊन मेडा उबी करतीन. सागर नौका मेडा उबी करव्याला ना शिकलान गाटव्याला मदत करीन.”

सबनाना पलान समजला.

'सागर नौका' दूर झाली.’सीताराम' ना 'जय संतोषी' जवर आयल्या. दोगांशा मदीन मेडा होता. आभारान कालाकाला ढग जमा होव्या लागलता. वाय हुटलो. सूर्य मिनटा मिनिटाला ढगामनी लपत जात होता. दर्यान हावली पडत होती. खलाही कामाला लागला.

(९)

रूपा ना कुसूम या दोगी देरानी - भावलनी कामा आटपून दुपारशा टायमाला नारलीया हायेडान एकमेखांशा माथ्यांशा जुवा बगीत बहलत्या. कामापायी दोगी थकलत्या. तवा थंडो वाय हुटलो ना त्यांसा डोरा भारी होव्या लागला.

“ नीज आयले बग. थोडा वेड पाठ टेकिता.” रूपा भावलनीला बोलली.

“ नीज मंगे. पयला माथ्यान बग. जाम खाता. या मावऱ्यापायी नीट माथा धुव्याला मिरलास नय. जुवा निगतान ता बरा वाटता.” कुसूम बोलली.

“ माहापण माथ्यान बग काय.”

“ हा बगीन ना.” कुसूम बोलली.

तवड्यान तटा तुक्याही बायकू सखू आयली. केस हुट्टा. हिंगाऱ्या हरका डोखा. तोंड बगीन ता बारकी पोरा बगून परतीन हये. तोंडान पान सुपारी. लुगडी सोली जुनी पुरानीस. मंगलसूत्राहा नावाला गळ्यान काळा मणी. आयली ना त्यांशा बाजूला फतकल मारून बहली.

“बाय, जेवली का?” रूपान विशारला.

“हा जेविली.” सखू पान सावीत बोलली.

“ जेव्याला काय करीलता?”कुसूमजून विशारला.

“ हुक्को काटो. तेंडली टाकून.” सखू पान थूकीत बोलली. दोगीना ते रेंदा वाटला.

“आज संकषटी नय का?” रूपान विशारला.

“नाय बाबा. आपुन उपास- बिपास काईस करीत नय. उपास करून कटा गा देव पावता. आपली लोका पयल्यान कटा उपास करताहेत. धानकांजी यो आपला आहारूस हाय. देवळान कीर्तनीबुवा येतान. ते हांगतान बगून आपुन उपास करव्याला लागला. अहे उपास करून देव पावता ता पयला या कीर्तनुबुवा ना बामणाना देव पावता. आपल्याला नय. ते ता रोजूस उपास करतान. पावसाळ्यान आपुन अवडी उपाशी रेतान तवा केव नय गा देव पावे?” सखू तत्वज्ञान हांग्याला लागली. कडशाकटा प्रश्न विशारला हये रूपाला झाला. परत ती बोलली, ”देवाया नय गा. पोटाला बदल पायजे का नाका. एक दिह उपास केला ता पोटाला आराम मिरता. आपुन खये गा काम करून कंटारतान. थयेस पोट कंटारता. त्याला मयन्याला एकदा आराम पायजेस.”

“ हं. ए सबन बोलव्याहा गोष्टी हात.”सखून रुपाहा बोलना उडविला.”मी काय हांगता तिन आजूबाजूला बगीतला.”नाय मिंजे वाईट मानून घिऊ नाका. हांगतीन मी तुमाशा घरान आग लाविता. मी तुमशा भल्या करतास हांगता.”

“ हा बोल ना. काय हांगव्याहा हाय?” कुसूमला थोडो थोडो अंदाज आयलो.

“ कुनाला हांगू नाका. तुमशा दोगांसा नवरा बोटीन खपतान ना तुमशा देराला, पंढरीला फुकटसा मावऱ्याहा भाग देतान. ए बरबर नाय. त्याला शाळीनसा काडव्याला लावा. बोटीन सडवा. मावऱ्याहाठी खये कष्ट करव्याहा लागतान ते समजून दे त्याला.” सखू दोगींसा कान भरव्या लागली पण दोगीवर त्याहा परिणाम झालो नय.

“बाय शिकून दे त्याला. बारको हाय तो.” रूपा बोलली.

“काय बोलता? शिकून दे त्याला? तुमाना समजे खये नय? तो शिकलो ना ता बोठ्या जायपिनशा नोकरीला जान.” सखू कल लावीत बोलली.

“जाऊन दे ना. कुणाया तरू बरास बगव्याहा. आमसो देर बोठो झालो ता आमाना आनंदस हाय. गरजीला उपयोग पडेन तो.” कुसूम बोलली.

“कडसा उपयोग पडता तो. या जगान कुण कुणाहा नहता. एकदा तो शिकलो ता बोठ्या नोकरीला जान. त्याही बोठ्याबोठ्या लोखांबरबर ओरख होन. एकदा का उंबयशा गोऱ्या लोखांशी ओरख झाली ता यो तुमशी बोट हडपून घेन. तुमाना हाकलून लाविन. तुमशा काकीह्यो यो डाव हाय. मीन या कानाही तिहा बोलना आईकिलाय.” सखू दोगांशा मनाहा अंदाज घेत बोलली.

दोगींशा मनान थोडी कालवा कालव सुरू झाली. तरूपण पाना पालटीत कुसूम बोलली, "आमशी काकी बरी हाय. तिन आमशा नवऱ्यांना वाढविले. त्यांशी लगीना लाऊन दिली. आमशा बाहांना लगीनाठी पोयऱ्या बगून दिल्या. बरी हाय ती.”

“ओ बाय हाय कटा तू? " सखू नाटक करीत बोलली, "माणसा ओरख्याला शिका. तुमशी पार्वती काकी मधूली माख हाय. तोंडान गोडगोड मध हाय. पण कवा डंख मिरीन पत्तो नाय. सावध रेवा. गोड बोलणारी माणसा पक्की लबाड हतान. गोड खाऊन पोटान किरीम होतान बाबा. समजे केव नय तुमाना? मी हांगता ते खोटा का खरा ते समजेनस तुमाना. नाव पार्वती पण शिकलानशी निवटी हाय ती. हातान येव्या नय तुमशा. बगा पटता का ते. माहा काम होता हांगव्याहा ते मीन ते मीन केला. तुमी आपली माणसा हात बगून. नाय ता आपल्याला कुणाह्या घरान आग लाव्याही सवय नय मिरे. वेड हाय तवास पंढरीला शाळीनशान काडून बोटीन सडवा. तुमसा पण

फायदा ना त्याहापण फायदा. पण एकदा का तो शिकलो ता तुमाना भारी पडेन. सल येता मी. माह्या बोलण्यावर विशार करा.”

सखू उठली. बाजूला पान थूकून गेली. रूपा ना कुसूम या दोगींशा मनान ती वादर उठवून गेली. यो वादर थांबव्याहो खये ए त्या दोगींना समजत नय होता. यो वादर आथा वाट लाऊनस जान हये सोय करून गेली ती सखू.

(१०)

सखू आग लाऊन गेली ती जाम भडकली. आथा पार्वती काकीया घर त्यामनी पेटून भस्म होन हये झाला. रूपा ना कुसूमशा मनान ते बहून गेला. पंढरी शिकलो ता बोठ्या नोकरीला जान. ओरखी करून आपली बोट हडपून घेन. रूपा ना कुसूमला हये झालेला बगवला नहता. त्यांसा कामान लक्ष नय. त्या आपापल्या नवऱ्यांशी वाट बगीत होत्या. हाशापरा बोटी आयल्या. त्या आधी मावरा निवड्याला नय गेल्या. त्याहीन नवरा आयल्या आयल्या गा-हाणी हांगव्याहा सुरुवात केली.

“ तुमी काय करतान हये? आपुन नुसतास जनावरा हरका खपव्याहा का? “रूपा नाक वाकडा करीत वाल्याला बोलली.

वाल्या बोटीनशान थकून आलतो. आयल्या आयल्या रूपाही किटकिट सालू झाली ना त्याहीपण शीर उबी रेली .”काय झाला?”

“काय झाला काय विशारतान ? मी काय हांगता? पंढरीला बोटीन सडवा. आपुन कवडाक त्याला फुकटसा भाग देव्याहा?”रुपा मुद्द्यावर आयली.

“ सखू येऊन गेली का?”वाल्या समजव्या ते समजलो.

“ सखू या काय प्रश्न हाय. आमाना अकली नाय का? आम्ही बिज्यानशा अकलीन जात नाय. जे दिखता तेस हांगता.” रूपा सणसण करीत बोलली.

“ती येऊन गेली हतीन. तवास तून यो विषय काडलो ना. ती सखू घरफोडी हाय. तिन बरीस घरा फोडली हात. तवापण लगीन झाला ना दोन मयन्यानूस तुमी तिया हांगन्यान येऊन वेगल्या पडल्या. तिया काय आईकाव्या?”

“ आमी तिया आईकित नय. आमाना जे पटता ते करतान आमी. त्या घरान मावरापण करव्याहा. घरानशी सबन कामापण करव्याही लागत. बगून वेगल्या पडल्या आमी.” रूपा.

“अटापण तिस कामा करतानस ना.” वाल्या संतापाही बोललो.

“पण अटा सोताहा हाय सबन. हावू-हऱ्याही कटकट नय. नंदय-दिरांसो व्याप नय. तटा खाव्याहो -घेव्याहो ताल नय होतो.”रूपा केस झटकीत बोलली.

“बरा बाय.” वाल्यान हात जोडला.”तुमी बायका कुणाया हातीन येतीन का?”

“आमा बायकाना बोलव्याहा होडा. पयला त्या पंढरीला शाळा होडव्याला हांगा.”

“ अगा तू क्याला त्याहा मगाटी लागता? शिकून दे त्याला.”

“काय शिकून दे. जरा विशार करा. तुमशी पार्वती काकी पंढरीला हांगित होती. त्याला शिकून बोठ्या नोकरीला लाव्याहा. मंगे गोऱ्या लोखांशी ओरख करून आपली बोट हडपव्याही. हये डाव हाय तुमशा पार्वती काकीयो. बोला आथा.” रूपा दम घेत बोलली.

वाल्या घडीभर विशार करव्या लागलो.

“ क्याहा विशार करतान? तो आपल्यावर उलट्या अगोदर आपूनस त्याहावरती उलटू या. बगा, सुधारा आथास. नाय ता बोट जाव्याही आपल्या हातानशी. तो पंढरी नोकरी ना बोट या दोनीनसा पैसो कमवीन. आपुन रेतीन बगीत. बिज्यानशा बोटीन खपव्याला लागेन तुमाना.” रूपा आथा वाल्याहा कान भरव्याला बोलली.

“ हये हाय का? ठीक हाय. मी आथास रामसंदर बरबर जाऊन चर्चा करता. मंगे पंढरीला शाळीनसा काडून टाकिता.” वाल्या बोललो.

“ चर्चा नय. निर्णय घ्या. उद्याशा उद्या त्याला शालीनसो काडलोस पायजे. नाय निगत हतीन ता भाग बंद करा. बिज्या बोटीवाल्यांना पण हांगा. काकीला मावरा हुकव्याला देऊ नका. आपोआप ती तयार होन पंढरीला शाळीनसो काड्याला.”रूपा तणतण करीत बोलली.

वाल्या आंग धुव्याला निगून गेलो.

(११)

पार्वती काकी हुकलेला मावरा घेव्याला बंदरावर गेली. वनाऱ्याहा सबन बांबू बोंबलाही भरलता. बिन ओरखियों माणूस यामनी घुसलो का बाहेर निगव्याहा मुश्किल. चक्रव्यूह हरकास ते. शारी कोपऱ्यान फक्त बोंबीलस बोंबील दिखत होता. खाल पासून वरती पर्यंत. मावऱ्याहा काडव्याहा जो आवाज होताहेत त्यावरशान आसपास कुत्रा ना बिज्या बायका हात ए समजत होता.

पार्वती काकीन करदीही टोपली भरली. आथा ती बोंबील काड्याला लागली. तिला बाजूला जनीया वनाऱ्याखनी काय तरू गडबड जाणवली.”कुण हाय? जनी ता घरान हाय. ये बोंबील कुण काडता?”पार्वती काकीन बगितला. बिजीस कुणीतरू बाई बोंबील काडीत होती. पार्वती काकी बरकली, “सोर, सोर. धावा धावा. बोंबील सोरव्याला लाविले.”

पार्वती काकीया आवाज आयकून आसपासशा वनाऱ्यावरशा बायका धावत आयल्या. बाठावरशा खोपटीनसा पुरुषपण आयला. सबनाहीन त्या बोंबील सोर बाईला धरली.

“ सखू तू ?”सबनाना हजप वाटलो.

“ इ बोंबील सोर हाय.” एका बाईन सखूया कानाखाली दिली.

“ना आपुन एकमेखांना मावरा सोर समजतान.” बिजीनपण सखूया कानाखाली वाजविला.

“मारा इला. कवापासून बोंबील सोरीला जात होता.” तिसरीनपण थोबाडीन दिला.

“ आपुन अटा कष्ट करून मावरा हुकवितान. ना इ बंडलेली सोरी करता.” चौथीनपण थोबाड फोडला सखूया.

जमलेल्या सबन बायकाहीन सखूला मारव्याला सालूस ठेविला. कुणी थोबाडीन मारता. कुणी पाठीन. कुणी शातीवर. सखूया तोंड हुजला मार खाऊन.

“जाऊन दे. होडा तिला.” पार्वती काकीन सबनाना थांबविला.

“ नाय. खये होडव्या इला? इ हयेस सोऱ्या करीत रेन. इला तालुक्याला शिपाया हातीन द्या.” एक बाई बोलली.

“नाका. जाऊन दे. आथा नय करव्याही ती.” पार्वती काकी सबनाना समजावित बोलली.

“खये करव्याही नय? एकदा माणसाला सोरी कराव्याही सवय लागली का मरेन तरू हुटे नय. हजिक्या लोखांना सोरीहा खाल्याशिवाय आंगाला अन लागे नय.” बिजी बोलली.

“हातपाय बांधा इहा. घेऊन सला शिपायाखनी. जाम मारतीन इला. सत्याग्रिना खये मारतान. जाग्यावर हगतान -मुततान हये मारतान. बायका-पुरूष बगीत नय.” एक कोलीण बोलली.

“वेड कुणाखनी हाय तालुक्याला जाव्याला? टांगा-घोड्याहो खर्च आपल्यालास करव्याहो लागेन. परत आख्खा दिह जान तटा. त्यापेक्षा ताकिद देऊन होडा इला. शेवटी आपल्या हरकीस बाईमाणूस हाय.” पार्वती काकी बोलली.

“ ठीक हाय. द्या होडून. पण परत मावरा सोरीला जाता हये दिखला का तुलास पकडतीन. तवा तुला शिपायाहा हातीन देतीन.” बायकाहीन सखूला दम दिलो.

“जाय बाय घरा. परत हये करू नाका.” पार्वती काकी सखूला बोलली.

सखू रागाही थरथर कापीत होती. ती पार्वती काकीला शिडून बोलली, “तुया पायी माना मार खाव्याहो लागलो. मी सोर ठरली. याहो बदलो घेन मी. तुला थयथय नाशाला लावीन मी. रडविन तुला. तुन माना सोर ठरवून बदनाम केला ना. तुलापण मी बदनाम करीन. आख्खा कोळीवाडा थूकेन तुयावरती. आथा तुया नशीबान सुख नय. दुखस दुख येन. बगस तू.”

“ए काय बोलता? अटा ये.” बायका सखूया मगाटी धावल्या. ती पराली. हातीन नय आयली.

“ बग बाय. सोर तो सोर, ना उलटा सावकाराही वार्ता करता. इला शिपायाखनीस दिला पायजे होता.” एक पुरुष बोललो.

“ पार्वती तुला घनी सबनानशी दया. सापाला ना विंचूला दया दाखव्याही नहता. त्याना शेसूनस काडव्या लागता. नाय ता ते कवा दंख मारतीन याहा भरोसा नाय. बगितला ना काय बोलली ती.” एक कोलीन थोडी शिडून थोडी समजूतीन बोलली.

“ तियावर कुण लक्ष देता 'कागल्याह्या शापाही ढोर मरे नय’. आपुन कुणाया वाईट करीत नय, ता आपला वाईट क्याला होन? “पार्वती काकी बोलली.

“बाय यो कलीयुग हाय. अटा यो नियम साले नय. अटा. 'ज्याहा हातान काठी, तोस सावकार हता' दया दाखव्याही पण कुणाला? ज्यांशी लायकी हतीन त्यांनास. थोडी दया आपल्याठी पण ठेव्याही. या युगान पाठीन सुरा भोकणारा जाम मिरतीन.

सावध रेव्या लागता. ज्यावर आपुन दया दाखवितान, तोस फशविता.” बिजो पुरुष बोललो.

“लोकाहीन देवाधिकांना नय होडला फशव्याला. साधुसंतांना नय होडला. आपुन ता साधी माणसा.” एक कोलीण बोलली.

“ या सखू हरकी माणसा घनीवाईट. सापाया विष उतरेन पण यांसा नय.” बिजी कोलीण बोलली.

पार्वती काकी मनामनान ब्रह्मानंद स्वामीहा नाव घेव्या लागली. तिया आंग थरथर काप्याला लागला.

(१२)

शाळा भरली. प्रार्थना झाली ना पोरा वरगान बहली. पासवीह्या वरगान वीसेक पोरा हतीन. पागधरे मास्तर वरगान आयलो.

“ एक साथ जय हिंद.” सबन पोरा उबी रेवून बोलली.

“बसा खाली.” पागधरे मास्तरान सबन पोराना खाली बहडीला. तो सोता खुर्चीन जाऊन बहला.

“ मी आता तुमची हजेरी घेतो.” पागधरे मास्तरान टेबलावरसा बुक उघडून लिव्याला घितला. त्याहीन एकेक करून हजेरी घितली.

“गेल्या काही दिवसांपासून तुमच्या रजा फार पडताहेत.”

“गुरूजी रात्री मावरा येतो. रात्रभर झोप मिळत नाही. सकाळी झोपावे लागते. म्हणून रजा पडते.” एक पोर बोललो.

“बरं ठिक आहे.” मास्तर हातीन खडू घिऊन उबी रेला.”तुमचे सर्वांचे तीस पर्यंतचे पाढे पाठ झालेत ना?”

“ होय गुरूजी.” सबन पोरा एकदम बोलली.

“छान! आता आपण पावकी, अर्धाएकी, पाऊणकी शिकू या.” पागधरे मास्तरान फल्यावर एक काठी काडून त्याहा दोनी बाजूला एक एक टिंब दिला.

“पाव एके पाव.” सबन मास्तरांशा पाठोपाठ बोलली.

“पाव दुणे अर्धा पाव त्रीक पाऊण पाव चोक एक.... ... पाव दाहे अडीच.”

पागधरे मास्तरान पोराखनशान यो पाढो घोकून घितलो.

“वहीत लिहून घ्या. घरी वेळ काढून पाठ करा जसे बाकीचे पाढे पाठ केलेत. याच्यामुळे तुमची व्यवहारी अपूर्णांक आणि दशांश अपूर्णांक यांची गणिते चांगल्या प्रकारे सोडवू शकतील. व्यवहारात हिशोब पटापट करतील.”

“ बरं गुरूजी.”

“ गुरूजी, काल तुम्ही म्हणाला होतात की आज तुम्ही एक मजेशीर कोडं सांगणार आहेत.” एका पोरान आठवण करून दिली.

“अरे हो. बरं सांगतो. पहिले हा पाढा लिहून घ्या बघू.”

पोराहीन फल्यावरसो पाढो लिहून घितलो.

पागधरे मास्तरान फला फुहिला. त्यावर तीन मंदिरांसा चित्र काडला. त्या पुड्यान जमिनीवर बहलेली माणसा काडली.

"तर मुलांनो कोडं नीट ऐका. तुम्हाला खूप मजा येईल. तर कोडं असं आहे. फळ्यावर दाखविल्याप्रमाणे तीन मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिरासमोर एक भिकारी बसलेला आहे. त्या तिन्ही मंदिरांची एक वैशिष्ट्य आहे. कोणीही त्या मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केला की खिशातील चिल्लर रक्कम दुप्पट होते. भाग लक्षात येतो का? "

"होय गुरूजी."

"बरं. तर तेथे एक माणूस आला. त्याच्या खिशात काही चिल्लर होती. त्याने पहिल्या मंदिरात शिरण्यापूर्वी भिकाऱ्याला एक रुपया दिला."

"एवढा? आम्ही तर एक पैसा पण दिला नाही." एक पोर मदीन बोललो.

" हे कोडं आहे. कोड्याला कोड्या सारखेच घ्यायचे असते." मास्तर थोडो आवाज वाडवून बोललो.

"बरं गुरूजी. पुढे सांगा."

" तर भिकाऱ्याला एक रुपया देऊन तो गाभाऱ्यात गेला. तेथे त्याच्या खिशातील चिल्लर दुप्पट झाली. आनंदाच्या भरात त्याने भिकाऱ्याला पुन्हा एक रुपया दिला. इथवर समजलं?"

"होय गुरूजी."

"ठीक आहे. आता तो माणूस दुसऱ्या मंदिरात गेला. तेथेही भिकाऱ्याला एक रुपया दिला. आत शिरताच खिशातील पैसे दुप्पट झाले. बाहेर येऊन त्याने भिकाऱ्याला एक रुपया दिला."

"तिसऱ्या मंदिरात सुद्धा हीच प्रक्रिया झाली असेल ना, गुरूजी?"एका पोरान विशारला.

"होय, अगदी बरोबर. आता प्रश्न असा आहे की जेव्हा तिसऱ्या मंदिरातील भिकाऱ्याला परत एक रुपया दिल्यावर त्या माणसाजवळ काहीही रक्कम शिल्लक राहिली नाही. तर सांगा, तो माणूस आला तेव्हा किती पैसे घेऊन आला होता?

पोरा शांत झाली. घडीभर विशार केलो.

"गुरूजी दोन रुपये."

"नाही. चूक."

"गुरूजी एक रुपया." बिजा बोललो.

" चूक."

पोरा घना विशार करव्याला लागली. कुणालास काय समजे नय.

" पंढरी येते का तुला उत्तर?" मास्तरान विशारला.

"नाही गुरूजी. खूप अवघड कोडं आहे."

" मी सांगू का उत्तर?"

"होय गुरूजी. तुम्हीच सांगा."

" ठीक आहे. तर ऐका. उत्तर ऐकून मजा येईल बघा तुम्हाला. तर या प्रश्नाचे उत्तर आहे - दोन रुपये दहा आणे."

"कसे काय गुरूजी?" पोराहीन विशारला.

" स्पष्टीकरण हवयं तर ऐका. पहिल्या मंदिरात भिकाऱ्याला एक रुपया दिला. किती शिल्लक राहिले? "

"एक रुपया दहा आणे." पोरा बोलली.

"बरोबर. गाभाऱ्यात गेल्यावर ते दुप्पट झाले. म्हणजे ते किती झाले? "

"दोन रुपये वीस आणे." पोराहीन उत्तर दिला.

" बरोबर. हे दोन रुपये वीस आणे म्हणजे सव्वा तीन रुपये होतात."

“ होय गुरूजी.”

“बाहेर आल्यावर भिकाऱ्याला एक रुपया दिला. आता त्याच्याकडे राहिले सव्वा दोन रुपये. त्याने दुसऱ्या मंदिरातील भिकाऱ्याला एक रुपया दिला. राहिले सव्वा रूपये. गाभाऱ्यात गेल्यावर त्याचे दुप्पट अडीच रुपये झाले. बाहेर पडल्यावर पुन्हा भिकाऱ्याला एक रुपया दिला. आता किती राहिले? "

“ दिड रूपया.”

“बरोबर. तिसऱ्या मंदिरात भिकाऱ्याला एक रुपया दिला. शिल्लक राहिले आठ आणे. आत गेल्यावर ते दुप्पट झाले. त्याचे झाले सोळा आणे म्हणजे एक रुपया. तोच शेवटचा रूपया भिकाऱ्याला दिल्यावर त्या माणसाजवळ काहीही शिल्लक राहिले नाही. समजले का? "

“ होय गुरूजी. मस्त आहे कोडं.” पोरा हजप करव्याला लागली.

“ पंढरी समजले का?”

“ होय गुरूजी.”

“या अशा कोड्यांमुळे आपली बुद्धी चालते. समस्येवर उपाय कसा शोधावा ही कला अवगत होते. गणितात कोडे महत्त्वाचे.” पागधरे मास्तर पोरांना गणिताहा महत्त्व हांगित बोललो.

(१३)

पार्वती काकीन पदर कमरीला खोशीला ना साल मांडिली. ती शाळीन जाव्याला निगाली. शाळा बऱ्यास लांबन होती. तिहा पाय पुडा पडत नय होता. वाटीन ती विशार करीतूस जात होती. पागधरे मास्तराना काय हांगव्या? खये हांगव्याहा? मास्तर शिडेन जाम.

हकालशी वेड. वातावरण सांगला होता. लोका हकालशा परा आपापल्या कामान होता. पुरूष लोका कुणी डोली हीवीत होता. कुणी फाटकी जारा हीवीत होता. बायका पाण्याला निगलत्या. बायकाना दूर देवळाह्या बावीवरसा पाणी आणव्याहा लागव्याहा. हांज-हकाल यो पाणी भरव्याहा काम सुकत नय होता. माथ्यावर तीन तपेला खाकीन एक कळशी हये एकेका फेरीन शार-शार तपेली पाणी आणव्याहा लागताहेत बायकाना. गावानशा सबन बावी हांज-हकाल बायकाहीन भरून जाव्याही. बायकांशी दोन जाग्यावरती गर्दी जास्त. एक बंदरावर मावरा लाव्याला ना बिजी बावीवर पाणी भराल्या.

वाटीन जो मिरेन तो तिला "कया साललली? "योस प्रश्न विशारीत होता. ती पण " शाळीन साललली." योस उत्तर देव्याही.

ती मारूतीह्या देवळाखनी आयली. हात जोडला."देवा माह्या पोराहा कल्याण कर. मी त्याहा शाळीनसा नाव काड्याला सालल्ये. माहा पोराहा भविष्य तुया हातान हाय आथा."

तिह्या डोऱ्यान पाणी आयला. थयेस ती पुडा गेली. बऱ्यास लांबण गेल्यावर उगवतीला झाडाझुडपान पंढरीही शाळा होती. ती शाळीन पोसली. पंढरी शाळीसमोर पोराबरबर खेरत होता. पार्वती काकीला बगून तो थयेस परालो. ती आफिसमनी गेली. पागधरे मास्तरान तिला बह्याला खुरशी दिली.

“बोल पार्वती बाय, केव आलती?”

आथा काय बोलव्याहा तिया तोंडानशान आवाजूस निगे नय.

“ काय झाला बाय पंढरी बदल का बोलव्याहा होता? "

तिन 'हा’ केला..

“ ए बग बाय. मीन पयलापण हांगतिलता. त्याहा नाव मी काडून देव्याहो नय. एक वरीस हाय बस. मंगे तो मास्तर होन. तुया दिह पालटतीन. तुला जास्ती कष्ट करव्याहा लागव्यहा नय.” पागधरे मास्तर बोललो.

“मी तरू काय करू दादा? भावल्याही पोरा हात ती आईकितीस नय. पंढरीला शाळीनसा काड नाय ता बोटीनसा भाग देव्याहा नय ते हांगतान.”

“नाका घेऊ भाग. बिज्यानशा बोटीन भाग ठेव. बाजार कर. हये ना थये. उपाशी रेतानस ना तुमी. अजून एक - दोन वरीस कळ काड. मंगे तुयास राज्य.” पागधरे मास्तर समजावीत बोललो.

“दादा तू हांगता ते खरा हाय. पण मी तरू काय करू हांग आथा. भावल्याही पोरा मेली मारतान माह्या पोराला. जया बगीन तया मिरलो का दम देतान.” पार्वती काकी रडबुखीवर आलती.

“आथा काय हांगू त्याना? सोता ता पुडा जात नय. बिजा जातान ता जाऊन देत नय. मिरून दे त्याना. काडता त्यांशी.” पागधरे मास्तर शिडून बोललो.

"नाका रे दादा. तून त्याना अडकिलो ता ते अजून दम देतीन. माना माऱ्याला नय होडीत ते. माह्या पोराला काय होडतीन.” पार्वती काकी जाम घाबरून गेलती.

"बग बाय. परत विशार कर. पंढरीया ना तुया येणाऱ्या नातवांशा भविष्याहा प्रश्न हाय. पंढरीला खंड्या बनव्याहा हाय का, आयुष्यभर अर्धपोटी रेव्या हाय, का जन्मभर त्यान गुलामीस करव्याही का त्यांसा डाव तुला माईत नय. पंढरी शिकलो

ता त्यांशा पुडा जान. मंगे सोताया मच्छीमारीया धंदोपण करीन. पैशेवालो होन. त्याना नको. बगून ते पंढरीया शिक्षण थांबव्याला बगीतान.”

पागधरे मास्तराया ए शब्द आयकून पार्वती काकी विशारान पडली.

“ देव जाणे पंढरीया नशीबान काय ठेवलाय ते.” पार्वती काकीया डोऱ्यान पाणी तरवरत होता.

“ नशीब आपल्या हातान हता बाय. बाबासाहेब आंबेडकरांसा नाव आयकिलाय का? आपल्यापेक्षा खालशा जातीन त्यांसा जन्म झाला. शिकला ते. परिस्थिती शिकव्या हरकी नय होती तरू ते शिकला. लंडनला, परदेशान जाऊन वकील झाला. रोज एकवीस तास अभ्यास करून पास वर्षाह्यो अभ्यास दोन वरीस ना अकरा मयन्यान पुरा केला. आथा सोताह्या जातीया लोखांशाठी झटतान ते. त्यान खालशा जातीया सबन लोखांना संदेश दिलाय 'शिका. संघटित व्हा. संघर्ष करा.’ शिक्षणाहा महत्त्व कवडा हाय ते बगा.”

पार्वती काकी काईस बोलली नय. ती पागधरे मास्तरानशा तोंडाखनी बगीत रेली.

“तुही इच्छा. मी देता दाखला. पण एक हांग. दाखलोस केव पायजे?”

“ त्याना दाखलोस पायजे. त्या शिवाय पंढरीला शाळीनसो काडले ए त्याना खरा नय वाटव्याहा.” पार्वती काकी बोलली.

“पक्का शापटर हात तुही भावल्याही पोरा. आथा ते दाखलो फाडतीन. पंढरी परत शाळीन गेल्यास नय पायजे हये त्यांसो डाव दिखता.”

पार्वती काकी शिंतनान पडली. पागधरे मास्तर शीडलतो. बाहेर पंढरी ए सबन आयकित विशारान उबी होतो. शाळा होडव्या लागेन या विशाराही तो शिंतनान पडलो. डोऱ्यान पाणी आयला.

पागधरे मास्तरान बुक काडला. पंढरीहो दाखलो भऱ्याला घितलो. त्याहा तोंडाहो पट्टो सालूस होतो.”आपली लोका शिकतीन तवास पुडा जातीन ना! या मच्छीमारी धंद्याहो काय भरोसो हाय का? अहना कष्ट करून पोटाला फोड्याला मिरे नय. सबन फायदा व्यापारांशा हकान जाता. ए गोरा लोक पक्का डोखीबाज हात. ते अटनी परत जातीन हये वाटे नय. गेला तरू आपली शाप वाट लाऊन जातीन ते. त्यांशा देशान रेवून अडशा माणसाना विकत घिऊन अडसा सबन कामधंदा ताब्यान घेतीन. नदी, डोंगर, समुदर, जमीन ए सबन गोरा लोक ताब्यान घेतीन. तवा काय करव्याहा? यो देश स्वतंतर झाला तरू जादूही कांडी फिरव्या हरका लगेस सबनानसा कल्याण होन हये पण नय. बोठ्या लोखांसा जास्त फायदो होन. सबनानसा कल्याण होता होता कवड्या पिढ्या जातीन देव जाणे. तवा आपली सोय आपुनस करव्याही.”

पागधरे मास्तरांशा मुखाशान साक्षात भविष्य बोलत होता. अडाणी लोखांहीन शिक्षण घितला तरस त्यांसा कल्याण होन. आपापलो धंदो जोमान करता येन. नाय ता पिढ्यान् पिढ्या ब्रिटीशांशी ना व्यापारांशी गुलामी करव्याही लागेन ए पागधरे मास्तर पार्वती काकी ना पंढरीला माईत झालता. पण नाईलाज. परिस्थितीपुडा कोणाहा काय सालता?

“जे होन ते होन”. पंढरीन मास्तराला ना शाळीला पाया पडला. डोऱ्यानशान पाणी टाकीत टाकीत तो पार्वती काकी बरबर सालव्या लागलो.

दाखलो देताना पागधरे मास्तर बोललो, “वाटल्यास ता परत दाखलो घेऊन ये. मी पंढरीला परत शाळीन घेन.”

पार्वती काकीया मनान तोस विशार सुरू होतो. परत जाऊ का शाळीन ? देऊ का दाखलो परत मास्तराला?

(१४)

पंडरीन बारदानान बिशाना गुटरीला. ते खांद्यावरती तुकून तो खोपटी बाहेर पडलो. त्याहा बरबर पार्वती काकी ना संद्रपण बाहेर पडल्या.

“सल आया , येता मी.” पंढरी बोललो.

“ नीट जा दादा. बोटीन जपून रे. टोकाला उबी रेवू नाका. आज पयलीस खेप हाय. उलटी-बिलटी आयली ता गोली घे. राशी मुत्याला -झाड्याला उठलो ता कुणाला तरू उठव. एकटो उठू नाका.” पार्वती काकी रडवी होऊन पंढरीला समजवीत होती.

पंढरीन पार्वती काकीया पाया पडला. उताराया पाया पडला. संद्रया हाताही गोशी घितली ना जड मनाही बंदरावर गेलो. पार्वती काकी डोऱ्यानसा पाणी टाकीत त्याला बगीत रेली. तिया शितामनाला पील पडलतो.

राशीया वखत. थंडथंड वाय हुटलतो. बोट बंदरान लागलेलीस होती. वाल्या, रामसंदर, राजाराम, यशवंत, भरत, दामू ए सबन पंढरीही वाट बगीत होता.”ये दादा. आमाना वाटला आजपण येता का नय.” वाल्या बोललो.

पंढरीन बोटीला पाया पडला. बोटीवर पाय ठेविला.

"पंढरीला केबिनवरती मदीन घेऊन नीजा.” रामसंदर बोललो.

पंढरी केबिनवर सडलो. बिशाना आंथरीला. त्यावरती फतकल मारून बहलो. खलायाहीन लोयली तुकीली. वाल्यान बोटीया नालीवर जाऊन नारोल फोडलो. कवट्या पाण्यान टाकिल्या. उदबत्ती लाविली.

बोट सालव्याला लागली. बरबर बऱ्यास बोटी हुटल्या.

पंढरी थोडा धास्तावलो. बोटीया शारी कोपरा पारखिला. किनावरशा खोपट्या मगारी पडत सालल्या. बंदरावरशान बोंबील मावऱ्याहा वास येत होता. आजूबाजूला सबन कारोख. नवीन मावरा नय. त्यापायी बंदर रिकामी दिखत होता. शार-पास दिहान बोट दर्यान निगलत्या.

बत्तीही जगी पार करून बोट खाडीमनशान दर्यान खिरली. दामू तांडेल होतो. रातभर बोट सालव्याहा त्याहास काम होता. वाल्या, राजाराम, भरत, यशवंत ना बीजा खलाही केबिनवरती सडला.

" पंढरी नीज आथा. पात्याराशी ऊठ बस." वाल्या बोललो.

"धास्ती करू नाका. आमी हात." राजाराम जून धीर दिलो.

" कोल्याहो पोर तू. दर्याला घाबरव्या नय. दोन दिहान तुला सवय होऊन जान." दामू बोललो.

पंढरी काईस बोललो नय. त्यान आडवा पडून आंगावरशान सादर घितली. वरती आभारान सांदण्या जाम होत्या. पंढरी ते पडल्या पडल्या बगीत रेलो. सप्तर्षी, लालग्रिह, ध्रुवतारा कटा हात ए तो बग्याला लागलो. बाकीहा खलाही बोलता बोलता निजला. पंढरीलापण थोड्या वेरान नीज लागली. बोट पाण्यान हालत होती.

राशी बऱ्यास वखतान दामून सबनाना हाक मारली. खलाही त्या हाकीही उठला. पंढरी थोडा घाबरलो.

“ काय झाला दादा? “

“वरती आभारान बगा. तारा बग. राही हरका पडतान. ते बगा ध्रुवताऱ्या खनशान ताऱ्यांसो गुरफो येता बग.”

सबनानशा माना वरती गेल्या. वरती ध्रुवतारा बाजूशान तारा कचऱ्याहरका वाहून येत होता. एकेका गुरफामनी लाखो तारा. आभाराह्या मदीन आयला का ते गायब होव्याहा. ताऱ्यांसा पाणी पडत हाय हये वाटव्या लागला.

ते बगून पंढरीला बरा वाटला. भूगोलान 'उल्का वर्षाव’ यो धडो होतो. पागधरे मास्तरान तो शिकविलतो. आज त्याला बग्याला मिरला.

“ए दिखला का बरा नय ना दादा" यशवंतजून विशारला.

“हल. ए नय. तो खराटा दिखला का बरा नय. कटातरू वादर धरणीकंप होतास.” दामू बोललो.

पंढरी पडल्या पडल्यास ऊल्का वर्षाव मिंजे ताऱ्यांसा पाऊस बगीत होतो. त्याहा मनाला बरा वाटला. बाकीशाहीन थोडा वेर पडता तारा बगीतला ना मंगे ते निजून गेला. पंढरीला पडता तारा बगता बगता कवा नीज लागली ते समजलास नय. पहाटेस त्याला जाग आयली तवा उल्का वर्षाव बंद झालता.

“दादा, उद्या परत दिखेन का ये?” त्यान दामूला विशालला.

“ काय हांगता येत नय. पण दर्यान हल्यावर आकाशान हमेशा काय न ता काय दिखतास. तारा पडताना ता राहीहरका दिगतान.” दामू बोललो.

“ मंगे मी रोजस बोटीन येत जान. माना यो आभार, आभाऱ्यांशा वस्तू बग्याला जाम आवडता.”

यावर दामू काईस बोललो नय. तो नुसता हालो.

“ सला ऊठा. कव आयली. कामाला लागा.” तांडेल सबनाना पिसाटला. त्याहे बाहा, खलाही ए सबन जाऱ्याखनी गेला. खलाही बोटीया काठाला उबी रेला. वाल्या, राजाराम, यशवंत, भरत खनानशा डोली काडून देव्या लागला.

एकेक करून डोली मांडव्याला लागली. पंढरी डेकवरती बहून डोली मांडव्याहा काम खये सालता ते एक हरका बगीत रेला. खलायांसा हात पटपट डोलीवरती सालत होता. दोड्डा बांधव्याहा, बुड्डी बांधव्याहा इ सबन कामा तो बारीक नजर देऊन बगीत रेला.

“पंढरी बगून घे, डोली खये मांडतान ती. बिज्या खेपीपासून तुलापण काम करव्याहा लागेन.” वाल्या बोललो.

पंढरीन नुसता 'हा' हांगितला.

उगवतीया वखताला सबन डोली मांडून झाल्या. पंढरीन सबन काम बगितला. मंगे सबनाहीन बिनदुधाही शाय पिऊन घितली. दिह माथ्यावरती आयल्या बरबर डोली घेव्याला सुरवात झाली. खलाही जोर घेत होता. डोली बोटीवरयेतहोती. जारान मावरा भरभरून येत होता. ताजाताजा. बोठोबोठो बोंबील, मांदेरी, करदी, वाकट्या, माकल्या, धोंडेरी. बगीता बगीता खना मावऱ्याही भरुन गेली. पंढरी बगीतूस रेला. मावऱ्याहा ढिगान काय तरू वेखलत होता.

"दादा, जीता बोंबील.”तो डरकलो. उडी मारून मावऱ्याखनी गेलो.

दामून एक जीता बोंबील धरून पंढरीया पुडान केलो.”धर यो बोंबील.”

पंढरी पयला घाबरलो. मंगे त्यान हिंमत करून बोंबील हातान घितलो. तो बोंबील पंढरीया हातान वेखलत होतो. शिकट होतो तो. बगून हातानशान निहटून खाली पडलो.

“ दामू दादा. ते सबन जीता बोंबील अटा आण. पटकन तव्यावर टाकिता. पंढरीला देता.” वाल्या बोललो.

दामून सबन जीता बोंबील वाल्यखनी दिला. वाल्यान मोरलीवरती ते शिरूर धुवून घितला. हरद मशोलो मीठ लावून ना सूल पेटवून तव्यावरती टाकिला. बाजूला बिज्या सूलीवरती धान ठेविला.

अटा डोली घेऊन झाल्या. मावरा खण भरून वरती आयला. सबनानशा मनाला समाधान झाला.

“दादा, सल परत.” राजाराम बोललो.

“ हा. घरास जाव्या आथा. अवडा मावरा हाय. थांबून काय करता.” दामून परत जाव्याहा विशार केलो.

सबन खलाही हातपाय धुवून जेव्याला बहला. तरलेल्या बोंबलाहा वास बोटीवरती हये पसरलता का कवा जेविता हये झालता. पंढरीपण त्यांशामनी भहलो.

“पंढरीला जाम बोंबील वाड. ताज्याताज्या बोंबलाया कांजी ते पण बोटीवरशा जेवणान खये लागता बग.” वाल्यान बोंबलाही दोन आडी जास्तीस वाढली पंढरीला.

“ घरानशा जेवणापेक्षा यो जेवण वेगळास वाटता ना पंढरी?”पांडून विशारला.

“हा" पंढरीन मान हालविली. तो मुही तोरपून जेव्याला लागलो.

परतीला लागून तासभर झाले हतीन. सबन खलाही आडवा पडलता. पंढरी गरी घेऊन बहलतो. मगाशी त्याला रावस झुंबलतो. त्याहा लक्ष गरीह्या आसकीवर होता. बोटीन काय सालले याहा त्याला पत्तास नय.

दामून वरती बगीतला. आभार साफ होता. बारका बारका कापसा हरका ढग मदीन येऊन जाव्याहा. तवडास. बाकी साफ. सागर शांत होता. वायस नय होता ता समुदर शांत नय का रेव्याहो.

" वाय साफ पडलाय. बरा नय अवडा शांत समुदर. थोडा तरू वाय पायजेस. नाय ता कयातरू वादर होव्याही आशा हता."दामून अंदाज केलो.

"काय नय होय. ना झाला तरू आपुन क्याला घाबऱ्याहा? हांजीपर्यंत आपुन घरा पोसतीन." वाल्या धीर देत बोललो.

दामू दर्यान नजर टाकिली. दूरदूर नंगन एकपण बोट नय होती.

"आपल्या बरबर बऱ्यास बोटी हुटलत्या. मंगे एकपण बोट दिखे नय ती?"दामून विशारला.

"हतीन आपल्या मागे -पुडा. तू क्याही धास्ती करता दादा?" यशवंत धीर देत बोललो.

खलायांशा वार्ता साललत्या. तोस इंजिनमनी बोठो आवाज झालो. सबनजीन इंजिनखनी धावत गेला. इंजिन बंद पडलता. रामसंदर इंजिनखनी खाली उतरलो.

"काय रा झाला, दादा? "

"बगू ता देन का नय?"रामसंदर संतपलो. त्यान नीट बगीतला.

" पिस्तन तुटला रा"

“मंगे आथा घरा खये जाव्याहा?”वाल्यान प्रश्न केला.

“कोणाही तरू बोट भेटेनस ना. तिला बांदून जाऊ घरा.” दामू बोललो.

“ इंजिन ना फिंजिन. ती आपली जुनी हिडाही बोट होती, तिस बरी होती. डिजेलशी कटकट नय. आवाजाही कटकट नय. वासाहो तरास नय. सालता आरामान.”वाल्या इंजिनवर शिडलो.

“जुना ते सोना हांगतान ते नुसतास नय. आपुन इंजिनशा भरोशावर रेल्या नय पायजे होता. हिड आणल्या पायजे होती.” राजाराम हांगव्या लागलो.

“ ना कटा बांधीता हिड? तुया गांडीला?”वाल्या शिडलो.

“ तुमी शिडाशिड करू नाका. भेटेन कोणतीतरू बोट.” रामसंदरजून सबनाना गप केला. पंढरी बाहांशा तोंडाखनी बगीत रेलो.

हकालशी हांज होव्याला आयली पण बिजी बोट काय मिरलीस नय. वायापायान 'सागरनौका' दर्यान खोलखोल जाव्या लागली. रात जहेथहे काडली. हकालशी थोडा धीर आयलो. जेव्याहा खाव्याहा ना निजव्याहा नीज नय लागली तरू. खलायाना बिजा कामस नय होता. ते पण कंटारला. दुहरा दिह गेला तरू बिजी बोट आधारालापण दिखत नय होती.

“दामू काय रा करव्याहा?”खलायान विशारला.

“काय आथा. देवाह्या भरोशावर रेव्याहा.”

“साऊर-पाणी खपला ते?”खलाही घाबरून बोललो.

“ राकेल हाय ना. कुड्या हात ना. मंगे धास्ती क्याही? मावरा भूजून खाऊ. हिंमत नय हारव्या.” दामून समजावीला.

“काय सालले ए? वाय नय. वादर नय. नुसतास समुदरान भटकून मरव्याहा का आपुन?”वाल्या रगीरगीही बोललो.

“चूप अस्ते बोल. पंढरी बारको हाय. तो घाबरून जान. आपुन हये धीर होडून खये सालेन आपुन तांडेल हात. खलायांना आपुन धीर देव्याहा. आपल्या पूर्वजांहीन दर्यावर राज केलाय. अडशा राजा-महाराजा ना व्यापारांसा माल देशा-परदेशान आपला पूर्वज घिऊन जात होता. आपला पूर्वज आफ्रिका, जपान, चीन, ब्रह्मदेश अटा बोटीशान व्यापाऱ्यांसा माल घिऊन जाताहेत. आपुन घाबरून खये सालेन?”रामसंदर समजावीत बोललो.

वाल्या ना रामसंदर बोलत होता. पंढरी त्यांशाखनी गेलो. त्याहा तोंड रडव्या हरका झालता.

“ दादा आपुन मरतीन का? आपली बोट बिगडली ना! "

“ हये बोलव्याहा नय. आपल्याला कुणालापण कायपण होव्या नय. नक्की कुणतीतरू बोट मिरेन बग.” रामसंदर त्याहा माथ्यावरशान हात फिरवीत बोललो.

“दादा, भूक लागलेय ती?”पंढरी रडबुखीवर आयलो.

“थोडी कड काड. मंगे पायजे तवडा खाऊ.” रामसंदरजून त्याला थोपटीला.

“दादा पिव्याहा पाणी पण खपलाय ते. खारा पाणी पिवे नय.” ए आयकून रामसंदरशा डोऱ्यान पाणी आयला.

“देवा, होडव रा या संकटामनशान.” त्यान पंढरीला मिठी मारली.

तोपण दिह जहेथहे गेलो. अन्नपाणी ता कवास खपलता. राकेल ना कुड्या खपल्या. मावरा भुजव्याहा ता क्यावर? खलायावरती भुक्या पोटाही रेव्याही पाळी आयली.

'सागर नौका' शार-पास दिहाया लांबणीवरती पन्नास-साठ वावावरती वाहून गेलती. बिज्या बोटी दिखत नय होत्या. सबनानशा आंगानसा ताण गेलता. सात दिहान मावरापण कुजून गेला. तो टाकून देव्या लागला. जगव्याही आशा खपली. आंगानशी ताकद खपली. आथा आपला काय खरा नय ए सबनजीन समजून गेला. पंढरी ता या विशाराही घाबरून गेलो. तो ता रडव्याला लागलो.

"दादा, आपुन आथा मरतीन ना?"त्यान डोऱ्यानसा टपटप पाणी टाकिला.

"नय दादा. हये काय होव्या नय. आपुन नक्की जगतीन बग" रामसंदरजून त्याला धीर दिलो.

" अजून तुया लगीन बाकी हाय. पार्वती काकीन तुयाठी पोयरी बगीतले ना." वाल्यान त्याही थोडी मस्करी केली. त्यावर तो हालो.

"तुया लगीनान आमी सबनजीन नासतीन." यशवंत बोललो.

" तुला पोरा होतीन. त्याना यास बोटीनसा मावऱ्याही गाबोरी देऊ आपुन. घाबरू नाका. आपुन आज उद्या घरा पोसू."

रामसंदर बोललो खरो, पण त्याहास धीर तुटलता. आपुन परत घर बगू का नय याही त्याला माईती नय होती. पंढरीया डोऱ्यापुडा पार्वती काकी आयली. संद्रा आयली. डोऱ्यान पाणी वाहत होता.

अथांग सागरान 'सागर नौका' निराधार होऊन वावून जात होती. खलाही जागा मिरेन तटा बोटीवर पडून होता. पोटान अन्नपाणी नय. कुणी बोलेपण नय. बोलव्याही ताकदपण खपली. मरण सबनाना दिखव्याहा लागला.

सूर्य मावरतीला वाकला. त्या परास भोंग्याहो आवाज आयलो. रामसंदरजून बगीतला. आवाज कटनी येता समोरशान बोठी आगबोट येत होती. रामसंदर डरकलो, ''ऊठा, ऊठा, ती बगा आगबोट.''

सबन खलायांशा आंगान जोर सडलो. जोर काडून जो तो बरकून आगबोटीला आवाज देव्या लागला.

"पंढरी ऊठ. वरती डोलकाठीवरती सड. वरशान त्या आगबोटीला सिगनल दे.'' वाल्या बोललो.

पंढरीहा आंगान जोर नय होता. पण जगव्याही एक आशा दिखली ना जोम सडलो. तो जहेथहे डोलकाठीवरती सडलो ना फडक्याही सिगनल देव्याला लागलो. नशीब त्यांसा तो सिगनल आगबोटीला मिरलो. ती थांबली. त्या मनशान एक बारकी बोट 'सागर नौका' खनी येव्या लागली. ती आखनी आयली. त्यामनी दोन गोरी माणसा होती. एक देशी माणूस होतो. त्यान विशारपूस केली.

'' क्या हुआ?''

'' साहेब पिस्तन तुटलाय. इंजिन सालू होई नय.'' वाल्या बोललो.

'' इंजिन बंद पडा है? कितने दिन से?''देशी माणसाहा प्रश्न.

'' आज दहावा दिह हाय साहेब. खानापाणी सबन खपलाय. पास दिहाया उपाशी हात सबन.'' रामसंदर रडव्याला लागलो.

“कहा से हो? मतलब बॉम्बे या ओखा से ?”त्याहा पुडसा प्रश्न आयलो.

“बॉम्बे. तटनी सडतीला शार-पास तासावरती हाय आमसा गाव.”

“ ठिक है.” तो देशी माणूस गोऱ्या माणसांखनी गेलो.”व्हॉट शूड वुई डू?”

“व्हॉट मिन्स? दे आर इन ट्रबल. टेक देम वीथ अस. वुई शाल टेक देम टू बॉम्बे फोर्ट. देन हॅन्ड ओव्हर टू कस्टम.” एक गोरा बोललो.

त्यांसा बोलना कुणालास समजत नय होता. पण ते काय तरू सांगलास बोलतान. आपल्या फायद्याहा बोलतान हये खलाही समजून गेला.

दोरली बांदून त्यांशी 'सागर नौका' आगबोटीखनी नेली गेली. बोटीला वरती आगबोटीवरती सडविला गेला. सबन खलायाना जेवण दिला गेला. वाल्या रामसंदर राजाराम याहीन मदत करणाऱ्यांसा आभार मानला.

"जाम उपकार झाला. तुमी मिरला बगून आमी वासला. तुमी देवाहरका भेटला.”

गोऱ्याना त्यांसा बोलना समजत नय होता पण डोऱ्यानसा पाणी ना हावभाव बगून ते समजला. सबन जीवांशी एक मनाही भाषा हता. ती हजिक्या अडचणिया टायमालास उपयोगी पडता.

पंढरी ता बोठबोठ्यान रडव्याला लागलो. आथा घरा जाव्याला मिरेन. आय, बापू, भन मिरेन ए त्याला खरास वाटला नय.

'व्हिक्टोरिया' नावाही ती आगबोट उंबय बंदरान निगाली. पंढरीला तवड्या लांबनशान उंबय ना सोताहा घर दिखव्याहा लागला.

(१५)

दुपारशा परा सबन बायका खोपटीया ना नारलीया हायेडान खाटली टाकून बहलत्या. नवरा त्यांसा बोटीन. बोली पोरा शाळीन. बारकी पोरा दारापुडा खेरत होती. वनाऱ्यावरशान बोंबलाया ना मांदेरी, हुक्कट, होडा यांसा वास येत होता.

बायकांशी कामा खपलती. जेवूनपण झालता बायका एकमेकांशा माथ्यानशा जुवा बग्याला लागलत्या. जुवा बगीता बगीता सुख-दुखाया वार्ता साललत्या. अवड्यान एक सन्यावालो भैय्या आयलो.

"चने लेलो चने."

"ए भैय्या अटा ये. मावऱ्यावर देता का सना?"एकीन विशारला.

"नाही बहेनजी, मावऱ्यावर नाही देत है. पैसे पर देत है." तो भैय्या बोललो.

"कडसा पैसा आणव्याहा आमशाखनी मावरा पायजे तवडा हाय. पण पैसास नय. मावऱ्यावर देत हतीन ता दे बिशाऱ्या. बारक्या पोरांठी बगून." पार्वती काकी बोलली.

"दे रा. क्याला भाव खाता."शंकरशा घरशी बोलली.

"अब का कहे बहनजी. मावरा लेके हम का करें ?"

"का करें मिंजे? विक. पैसे येतीन त्याहा."

“ चलो लावा मावरा.”

भैय्या मावऱ्यावर सना देव्याला तयार झालो. झाकझीक करून त्यान सना दिला. बारक्य पोराहीन खाला. बायकाहीन पण खाला.

“बहनजी, हमका पिने के वास्ते पानी मिलेगा क्या?”

पार्वती काकी खोपटीन गेली. पितलिया पेल्यान पाणी आणून भैय्याया हातीन दिला. भैय्या पाण्यान बग्याला लागलो.

“ बहनजी, बर्तन ठीक से साफ नही किया है. कचरा नजर आ रहा है.” भैय्यान तक्रार केली.

“आरा देवा, मेल्या भैय्या, तू सोता गादलेला हाय. माईत कवडा दिह आंग धुविला का नय ते. ना पाण्याही खोड काडता. गादलेला कडसा तो.” शोभा भैय्याला पिसाटली.

“ हम गादेला नाही है. यह बर्तन गादेला है.” भैय्या बोललो.

“सल दे पेला अटा. जा बिज्याधडा साफ पाणी पियाला.” पार्वती काकीन त्या खनसो पेलो घितलो.

“नहीं बहनजी, हमका पाणी पिने का है. आप बुरा मान गए. वो का है की हम परदेसी है. घर बार छोड रोजी रोटी के लिए यहा आए है. सुना है यह मराठों का देस अच्छा है. यदी हम यहा बिमार पड गए तो हमका देखेगा कौन? गॉव में बिवी-बच्चो को खिलाएगा कौन? बस इसी वास्ते सावधानी बरखते है.”

सबनाना भैय्याहा वाईट वाटला.

“ बिशारा !”सबनानशा तोंडानशान निगला.

"कडसा रा तू ?" शोभान विशारला.

"हम उत्तर भारत से आया हू."

"मिंजे दिल्ली वरशान आयलाय का?"

"हा वही से आया हू."

"भोव लांबनशान आलाय. जेवला का नय?"

"नहीं. हम एक टाईमही खाना खाता है. दो वक्त का खाना कहा से लाऊ? दिनभर में दो-चार आणे मिल जाते है. सब खाने में उडाऊ तो घर क्या ले जाऊ?"भैय्या हांगीत होता त्याही कर्म कहानी.

" बिशारा! देवा कवा आपला देश हुट्टा होन ब्रिटीशांशा ताब्यानशान ना कवा सबनानसा कल्याण होन? एकदा आपुन स्वतंतर झालो का तुमशा लोखांना पण अटातटा जाव्याही गरज पडव्याही नय. तुमी तुमशा घरान आमी आमशा घरान सुखी होतीन."

जनीया बोलना खपला ना पार्वती काकी बोलली, "दादा, आमीपण दुखानूस हात. सावकार, दलाल, व्यापारी यांशा गुलामीन हात. यो अवडा मावरा पण काय उपयोगाहा नय. पैसैस नय मिरे."

"तटा सत्याग्र खये रा हाय ?"शोभनान विशारला.

"बहुत तेजी में है वहा सत्याग्र. मैं भी गया था. पुलीस पिछे लगी तो यहा भाग आया हू. अच्छा में निकलता हू."

भैय्या सन्याही टोपली घिऊन गेला.

"बिशारा! कवड्या लांबनशान पोटाहाठी अटा आयले. अटा पण काय नीट नय मिरे. घरोघर मातीही सूल." पार्वती काकी बोलली.

बायकांशी परत अडशी तडशी वार्ता सुरू झाली. तवा दोगा-तिगा गांधी टोपी घातलेली. सफेद सदरा ना विजार घातलेली माणसा तटा आयली.

“ अवं ताई, सुक्की मच्छी मिळेल का?”

“हा मिरेन ना. कडसा तुमी?”शोभान विशारला.

“घाटावरून आलोय. काही जवळच्या जंगलातले आहेत.” एक घाटी मामा बोललो.

“ हा मिरेन. पण रोकड पैसा.” पार्वती काकी बोलली.

“रोकड पैसा देऊ ताई.” बिजा घाटी टोपी हरकी करीत बोललो.

“पण मावरा नेतीन खये तुमी?”जनीन विशारला.

“ बऱ्याच लांबचा पल्ला आहे ताई. बैलगाड्या आणल्यात. त्यात भरून नेऊ. जरा सस्ती द्या मासळी.” एकान हांगितला.

“मावरा सस्तास हाय. तुमाना यापेक्षा सस्ता देऊ. घाबरतान क्याला?” पार्वती काकी बोलली.

“ ताई एक सूचवू का?” एकजीन बोललो, “तुम्ही जंगलात सुक्की मासळी घेऊन का येत नाहीत? खूप विक्री होईल. जंगलपट्टीत खूप मागणी आहे. पैसा देतील. भात देतील. फळे, भाजीपाला, दूध, लाकडाचा सालपा देतील.”

“तुमी हांगतान ते खरा हाय. पण आमाना ते परवडेन का अवड्या लांबसा पल्ला? परत आमी बाई माणसा. धोकास हाय बाबा.” शंकरशा घरशी बोलली.

“ब्रिटिश सरकारजून जहे आगगाड्या सूरू केल्यान थयेस बशा सूरू करव्याहा हात हये आयकिले मीन. बशा सुरू होतीन तवा येऊ बापा.” पार्वती काकी बोलली

“बरं. पण तुम्ही याच. त्या भागात तुमचा एवढा मावरा खपेल की वर्षभर बघायला नको. तांदूळपाणी, पैसा सर्व सोय होईल.” एका टोपीवाल्यान सुचविला.

त्या माणसाहीन बोंबील, मांदेरी, करदी, हुकट, होडा, माकल्या, वाकट्या, शिरलेला मावरा, हुक्की कावलटी हये बरास मावरा सबन बायकाखनसा घितला. पंधराएक गोण्या भरल्या.

“जेवण झाला का नय तुमसा?” पार्वती काकीन विशारला.

“हो. तुमच्या या गावाबाहेर जेवण शिजवलं. जेवलो.” एकजीन बोललो.

“थोडा जेवतान का धानकांजी हाय.” शोभा बोलली.

“नाही हो. आम्ही जेवलोय.”

“जेवा हो. कोळ्यांचे जेवण. सुकी मासळी तुम्ही खात असतील. आज ओल्या मासळीचे कालवण खा.” पार्वती काकी मराठीन बोलली.

ते मानला. तवड्या शार-पास जीवाना ओल्या मावऱ्याहा कांजी ना धान खायाला मिरला. ते बाजरीही रोट्या ना लाल मिरचीही सटनी खाणारी माणसा. मुही तोरपून जेवला.

“ताई तुमच्या कोळ्यांचं भोजन खाऊन समाधान पावलो बघा. बरं ताई येतो आम्ही.” एकजीन हात जोडून बोललो.

“ मावरा लागला ता परत या का.” शोभा बोलली.

“ हो. येऊ.”

बैलगाड्या गेल्या. बऱ्यास दिहान हातान पैशे बगून बायकाना बरा वाटला.

“ देवा, लवकर बसगाड्या सुरू कर. आमाना जंगलान जाव्याला.” शोभान हात जोडून प्रार्थना केली.

(१६)

राशीहा वखत होता. सुकऱ्या मांदऱ्यावरती निजलतो. पंढरी ना संद्राला नीज लागत नय होती. पार्वती काकिया मांडीवरती डोखा ठेऊन ते पण मांदऱ्यावरती पडून रेलता. पंढरी बोललो.”आया, कश्ना मामाही गोष्ट हांग ना. क्रांतिकारकांशी गोष्ट आईक्याला बरा वाटता.”

पार्वती काकी हांग्याला लागली.

"तुमसो कश्नो मामो मिंजे भारी माणूस. एकदा तो क्रांतिकारकाबरबर कलकत्याला का कटा गेलतो. आगगाडीया रूल का काय हांगतान ते उखडिला ना फरार झालो. शिपायाहीन जाम शोधिला पण मिरलोस नय. तो अवडा चतुर का शिपायासमोर उबी रेऊन सोताबदलस बोलव्याहो. शिपायाना समजव्यास नय. एकदा ता उंबयला कुणीतरू इंग्रजी माणूस टेशनान पेपर वाशित बहलतो. यो त्याहा बाजूला जाऊनउबी रेलो. पेपर घितलो त्याहा हातीनसो ना पेपरानशी गांधीजीही वार्ता बगून बोलता खहे, 'गांधीजीला होडला जेलमनशान इंग्रजाहीन. उत्तम केला'. ए बगून आपली माणसा थरथर कापीत होती. बिशारो इंग्रजी माणूस काईस बोललो नय.”

“व्वा! मस्त! कश्ना मामा या इंग्रजाना हयेस धडो शिकविले पायजे.” पंढरी बोललो.

“एकदा ता उंबयला दोन ब्रिटिश शिपाय वाटीवरती उबी होता. तो बिनधास्तमनी दोगांशा मदीनशान गेलो. ना वरती हांगता काय त्याना, ‘सारी हा, जानटलमान.”

पंढरी ना संद्रा यावरती जाम हाव्याला लागला.

“एकदा सुरत का काय तया गेलतो. तटा ब्रिटिशांशा हाताहीस बंदूका बनव्याही, बाम बनव्याही पुस्तका लोकाना वाटिली.”

“ ए खहे काय?”

“हांगता काय ता. आपला क्रांतिकारक हजिकी पुस्तका बनव्याही. त्यावर आपल्या देवीदेवतांसा चित्र हव्या. ब्रिटिशाना काय हांगव्या. लोकाना उपासनेही पुस्तका वाटीतान. ब्रिटिशाना त्यामनशी भाषा काय समजता. गुजराती, मराठी, मद्रासी या भाषेन ती पुस्तका हव्याही. आतमनी देवीदेवतांशास गोष्टी हव्या.”

“एकदम मस्त! "

“ ए गोरा लोक आपल्यास देशान रेवून आपल्याला गुलाम बनविलो. कोल्ह्याही बूद्धी हाय त्यांशी. आपल्याला जाम लुबाडिले त्याहीन हये मामा हांगीत होता.” पार्वती काकी बोलली.

“आपल्या राजा लोकाहीन त्याना येऊनस क्याला दिला अटा?”पंढरी शिडलो.

"आपली लोका आपल्यानस कैजो करीत रेली. त्याहा फायदो उठविलो त्याहीन. एक दोन होडला ता आपली राजा लोका त्याशापुरतास बगीत रेली. इंग्रजांसा पयला गुलाम ता तेस झाला.” पार्वती काकी बोलली.

ती विशारान पडली. पुडा बोलली, ”आपला पण थयेस हाय. नात्यांनशी माणसा साथ नय देत. ना ते सुखी होत ना तुमाना सुखी होऊन देत.”

“आया, हये केव गा? नात्यागोत्यांशी माणसा केव एकमेकाना साथ देत नय?”संद्रान विशारला.

“अहंकारापायी थये होता. तो पुडा गेला ता मी मगाटी रेन. मीस पुडा गेला पायजे. माहीस तुंबडी भरल्या पायजे. या विशारापायी नात्यांशी माणसा एकमेखांसा पाय खेशितान. माणसाही रीतस हाय ती. कटापण जा. महाभारत हायूस. सोता ता पुडा जात नय ना बिज्यानापण जाऊन देत नय. येस नडले आपल्याना. याहा फायदो बिजा घेतान मंगे.”

पार्वती काकी गप रेली. पंढरी ना संद्रा तिया तोंडाखनी बगीत रेला.

“तुमी हये करू नाका. सबनाना मदत करव्याही. सबनाना साथ देव्याही. त्याना जाऊंदे पुडा. आपुन त्यांशा मगाटी रेऊ. सबनानासा कल्याण होऊन दे. आपला कल्याण मगाटी होनस. देव बगीता. देव, आंदरो नय मिरे. त्याला सबन माईत हाय.”

“ आया तू हांगता थयेस आमी करू.” पंढरी बोललो.

“ पोरादो नीजा आथा. पात्याराशी पंढरीला बोटीन जाव्या लागेन.”

दोगाहीन डोख्याला गोणपाट घितली. तिस त्यांशी उही. पार्वती काकी बाजूला पडली. वरती बगीत बगीत ती विशार करव्याला लागली.

(१७)

वैशाखायो ताप वाढलतो. बोटी बंद झालत्या कवास. संकरातीला बोटीला हाय करून झालता. पुडशा सीजनशी कामा सालू होती. घरोघर डोली हिव्याहा सालू होता. कटा फाटलेल्या डोली हिव्याहा घेतिलता. कटा दोड्डा बनव्याहा काम सालू होता. कटा दोड्डा ना जाराना रंग देव्याहा काम सालू होता. कटा बोटीला चंद्रूस लाव्याहा काम सालू होता. घामाही आख्खा कोळीवाडा भिजत होता. राशी मच्छर मारीत मारीत निजत होता. दुपारशी जेवला का थोडा पडव्याला मिरव्याहा. सबनानशा खोपटीया आसपास नारली ना भेंडी थयेस हेकटाही झाडा होती. त्याहा हायेडान मांदरा ना ता खाटली टाकून गोव माणसा निजून पडव्याही. बायका बिशाऱ्या खोपटीनस सोताला वाय घालीत निजव्याहे. नाय ता मिंगे बाहेर हायेडान बहून सुख-दुखाही वार्ता करीत रेव्याहा. बाहेर समुदरावरशान येणारो वाय बरो लागव्याहो. खाडी-खोब्रान जाव्याहा मात्र सूकला नय कुणाला.

हयेस एका दुपारशा परा हरी टांग्यानशान नाक्यावरती उतरलो. हरी यो पार्वती काकीया भावल्याहो जावय. मिंजे वाल्या ना रामसंदर यांसो भावोजी. उंबयला रेव्याहो. तो पार्वती काकीला जाम मानव्याहो. तो हावूरवाडीला आयलो का पार्वती काकीखनीस जेव्याला थांबव्याहो. आथा तो बोटीया कामाठी आलतो. त्याला बगीतास नाक्यावरशा ओरखिया माणसाहीन त्याला विशारला,

"हरी कवा रा आयलो?"

" यो काय आथास येता."

"जेवलो का नय जेव्याला कटा? दुपार दुपार आयलो तो?"

"बिजा कटा? पार्वती काकी घरा. काकी माहाठी जेवण करीन."

“ तुला काय हाय का नय? येऊन जाऊन ती खनीस. तुहा सख्खा हाऱ्यांशा घरा जा. शेवटी ती आपली माणसा हात. काकी ती काकी.” एकजीन बोललो

"माया हारा ना कुजका हात. माना आथा जेव्याहा वक्तावर बगीतला ना ता त्यांशा बायका का-कू करतीन. पार्वती काकी थये नय मिरे. कवापण जा. ती जेवण करता.” हरी विश्वास दाखवीत बोललो.

“हये? आमाना पटे नय.”

“सल लागली पैज. एक- एक बाटली.”

“लागली पैज. सल जाऊ पार्वती काकीया घरा.”

हरी ना ओरखिया दोगा-तिगा पार्वती काकीया घरा निगाला. त्याना दारान बगीतास पार्वती काकी बोलली, ”जावय कवा आयला? आथा आयलेन ता जेवूनस जा.”

“काकी मी रामसंदरशा घरा जेव्याला जाता.” हरी मुद्दाम बोललो.

“क्याला रामसंदरशा घरा ? अटास जेवा. कोंबडो कापिता. बहा तुमी.” पार्वती काकी हरीला बोलली.

हरीन आपल्या मित्राना खूण केली, ”बगीतला? याला बोलतान हावू.”

खोपटीया बाहेर खाटली होती. त्यावर हरी ना बिजी माणसा बहली.

“काकी जेवण होय तोपर्यंत आमी कामाला जाऊन येतान.” हरी बोललो.

“थांबा थोडा. पावशेर आणता.”

पार्वती काकी सुकऱ्याही पावशेरशी बाटली घेऊन गेली. त्यामनी पावशेर दारू आणली. शार पितलेही गलासा ना पाणी काडून दिला त्याना.

“ क्याला इ आणली काकी?”

“क्याला मिंजे? जावयाहा मानपान करव्याहा नय का? उद्याला उठून तुमीस हांगतीन हावूरवाडीला मानपान करीत नय. शालू ना पोरा बरी हात ना.”

“हा सबन बरी हात.”

“ बरीस पायजेन. तुमी पीत बहा. आमसा जेऊन झालाय. पंढरी बोटीन गेलाय. संद्रा शाळीन गेलेय. तुमसा हरा पागेऱ्याला गेले. मी तुमाना बोंबील भूजून देता साकण्याला. जेवण करता.”

पार्वती काकी खोपटीन गेली. दहा-पंधरा हुक्क्या बोंबलाया हाड्या भूजून त्याशा पुडान दिल्या. वनाऱ्याखनी उबी हलेलो तिहो कोंबडो धरलो ना खोपटीन गेली.

“बगीतला, इ हाय माही हावू.” हरी गलास खपवीत बोललो.

“आथा आपुन तुया हाऱ्यांशा घरा जाऊ. ते खये वागतान ते बगू.”

“सला ना. हातानशा बांगड्या बग्याला आरसो क्याला पायजे.”

हरीन मंगे खोपटीया दारापुडा उबी रेऊन हाक मारली, ”काकी, आमी काम करून येतान.”

“लवकर या. धानकांजी थंडा होन.” पार्वती काकी कोंबडो कापता काफता बोलली.

“ हा. लगेस येतान.”

हरी माणसाना घिऊन रामसंदरशा घरा गेलो. तटा त्याही बायकू रूपा होती. हरीला दुपारशा परा दारान बगून तिया तोंड पडला.

“ दादा, कवा आयला? काकीन जेवण केले हतीन. हांशी शाय पियाला या.” ती उहना पाहुणचार दाखवीत बोलली.

वाल्याहा बायकूनपण योस उत्तर दिला. तवा हरी मित्राना बोललो, ”मी पैज जिंकलो का नय. माही हावू माना नक्की जेवण करीन पण या बायका नय. माना बगूनस यांशा कपारावरती आठ्या पडल्या.”

“खरास. तुही हावू पार्वती काकी देव माणूस हाय. सल तुला पाजिता.”

सबनजीन दारू पियाला गेला. तटापन हरीन आपल्या हावूया गुणगान सुरूस ठेवीलता.

हरी पोसला तवा पार्वती काकीन त्याला हातपाय धुव्याला पाणी दिला. टुवाल दिला. पाट मांडिला. जेवण वाडला. मटनाहा कांजी. कोलबटाहा होडा तरीलता. हरी जेव्याला बहलो.

“जावय कांजी खये झाले?”

“एकदम मस्त! आजपण मी बोटा सुकीन. तुमाना खरा हांगू का. मी अटा तुमशा हातसा जेवण खायाठीस येता. नय ता अटा येव्या हरका काय नय मिरे. तुमशा हाताला जाम गोडी हाय.” हरी मटनाया खडा सावीत सावीत बोललो.

अवड्यान दारापुडा शंकरशा घरसो जन्या आयलो. त्याहा हातान बारकी टोपशी होती.

“ मावशे आयजून थोडा कांजी मागितले.” पोर बोललो.

पार्वती काकीन हरीखनी बगीतला.”तुमाना लागेन का कांजी? थये बरास हाय. बिशारा गरीब हात. जेवण केले नहतीन. थोडा कांजी देता हा. सालेन ना?”

“देया काकी. त्यामनी काय विशारतान.” हरी बोललो.

पार्वती काकीन मटन ना थोडा तरलेला होडा जन्याला दिला. हरी बगीतस रेलो. भूकेल्याही भूक जाणणारी तहान्याही तान जाणणारी हावू हाय पार्वती काकी ए त्यान जाणला.

(१८)

वैशाख खपलो. अखाड लागलो. गरमीही जागा आभारानशान पडणाऱ्या पाण्यान घितली. पाणी मिंजे काय! त्याहास राज्य. तीन-तीन शार-शार दिह बाहेर पडव्याला मिरव्याहा नय अवडा पाणी! ते नदीया रूप घिऊन दर्यान वाहून जात होता. कयाकया ता अर्धा पाय बुडतीन अवडा पाणी जमव्याहापण ना वाहव्याहापण. पाणी कवडापण हवो, बाहेर पडव्यास लागता. निंबराला पाठ केली ता काम खये करव्याहा ना खाव्याहा काय?

लोक खाडीखाजणान जात होता. कोणी वाड्डे-उपऱ्याना जात होता. कोणी खडपान डोली मांडीत होता. कोणी वावरी टाकीत होता. कोणी पागेऱ्याला जात होता. कोणी फग टाकून शिंबोरी धरीत होता. कोणी माग घिऊन दर्यान जात होता. मिरेन ते मावरा घरान कांजीला ठेवून उरलेला बाजारान विकीत होता.

उधारी वाडत होती. लोका दलाला खनशान उहना पैशे घेत होता. मावऱ्याहा पैशे त्याना पूरेपूर मिरत नय होता. उधारी वाडून नय देव्याठी लोका खाडीन खपत होता. मिरेन त्यावर भागीत होता. खाडी ना खोब्रानसा मावरा त्यांसा आगोठीया आसरा होता. लोका देवा धर्माला लागलती बगून थोडीफार भाजी खाव्याहा. नाय ता त्याना मावऱ्याशिवाय रेवत नय होता. नुसता हुक्क्या काट्याहो रस्सो केलो तरी दोन गाहा पोटान जाव्याहा. निदान बोंबलाही भुजलेली हाडी तरू पायजे. गोव माणसाना पावशेर ना मावऱ्याहा कांजी दिला मिंजे दिहभर खप्याला तयार. कवडापण काम हवो. जारा हिव्याहा. डोली हिव्याही. बोटीया काम. खाडी-खोब्रान जाव्या. रात नय. दिह नय बगव्याहा.

सुकऱ्या ना पंढरी राशी मागाला गेलता. जोडीला अजून दोगा होता. भांगाया दर्यान पाणी कमी होता. सुकऱ्या ना पंढरी मागाया टोकाला उबी रेला. दोगा मदीन रेला. ते पाण्यान खिरला. पंढरीला किनाऱ्यावर उबी ठेविला. सुकऱ्या मागाही खाटी घिऊन पाण्यान खिरलो. गोलगोल फिरून तो किनाऱ्यावर आयलो. माग अष्टमीया सांदा हरको झालो. सुकऱ्या ना पंढरीन माग खेचिला. दोगा माग जमिनीला टेकून धरून ठेवित होता. माग किनाऱ्यावर आयलो. हाबऱ्या, बोय, वाकट्या , शिंबोरी, नावेरी तीन-तीन शार-शार टापा होती.

"बरा मावरा हाय. अजून दोन-तीन जोरान सबनानसा वाटो होन." सुकऱ्या बोललो ना परत लागला ते माग माऱ्याला.

पाणी पडत होता. कारोखान काईस दिखत नय होता. सुकऱ्या ना त्याहा जोडीदार थयेस बिजापण कोळी लोका माग मारीत होता. परतेका मावरापण बरास मिरत होता. तीन-शार जोराहीस सुकऱ्याला बरास मावरा मिरला. सबनानशा वाट्याला बरास मावरा आयला. त्याहीन तटास किनाऱ्यावरती वाटा केला. परतेकाला दहा हाबऱ्या, वीस वाकट्या, दहा नावेरा, सरबटा, पास बोठी शिंबोरी मिरली.

" सला उद्याहा जेवणाहापण काम झाला ना खर्चपाणीपण हुटला."

सबनजीन घरा परत फिरला.

सुकऱ्या ना पंढरी घरा पोसला. मावरा टोपल्यान काडला. माग एका कोपऱ्यान ठेविला. पार्वती काकीन गरम पाणी दिला दोगाना आंग धुव्याला. दोगाहीन आंगा धुविली. तवड्यान पार्वती काकीन सावराह्या रोट्या भुजिल्या. आगीवर वाकट्या ना बोया मीठा लावून भूजिला. सुकऱ्या ना पंढरी तवड्या राशी मुही तोरपून जेविला.

"अहाहा! काय मावरा लागता! पोट भरला पण मन भरला नय.” पंढरी बोललो.

"तुमीपण खा. इ बगा हाबऱ्यामनी गाबोरी हाय.” सुकऱ्या पार्वती काकीला बोललो.

पार्वती काकीन बिज्या रोट्या टाकिल्या. संद्रा ना पार्वती काकी ए दोगापण जेवला. भरपेट.

(१९)

गटारी अमोशा आयली. जो तो ज्याहा त्याहा आयपती परमान मटन घेव्याला उस्मानशा दुकानान गर्दी करव्याला लागला. बोठा कुटुंबवाला एक किलो, दोन किलो मटन घेत होता. बारका कुटुंब ना गरीब लोका पाव किलो नाय ता सव्वाशे गराम मटन घेत होता. तवडीपण आयपत नहतीन ता गरसा कोंबडा-कोंबडी हातूस.

पार्वती काकीन सव्वाशे गराम मटन घितला. ती उस्मानला बोलली, ”दोन कालजीया ना दोन नळीया तुकडा टाक.”

उस्मानजून टाकून दिला.

जया बगीन तया खोपटीशान मटन हिजव्याहा वास येत होता. ज्यांशी बरी परस्पती होती, त्यांशा घरान पुऱ्या तरल्या जात होत्या. बऱ्यास जीनांशा घरान ना पुऱ्या ना मटन. कडसा आणतीन बिशारा? आगोठीला हातीन पैसा नय. उधारी

वाडलेली. कर्जपण वाडलेला. पेज पिऊन दिह काडव्याहा. हये परस्पती बऱ्यास जीनांशी त्याना कडशी गटारी ना कडशी कोजागरी. त्याना ता रोजशीस एकादशी.

आभार काजलीहरका काला पडलता. पाणी एक हरका पडत होता. वाय तुफान होतो. दर्यान पाणी. किनाऱ्यावर पाणी. छपरावर पाणी. उतारान पाणी. पाणी नदी हरका दारापुडशान वात होता. त्यामनी गावानसा कसरा जमिनीवरशी माती वावून खाडीन जात होती. बाव्या भरून गेलत्या. खोपट्या गरत होत्या. जमिनी भिजत होत्या. जया बगीन तटा वायपाणीस होता. उधाणपण वाड्याला लागला. मोजा डोंगराहरका उठत होता. जोरजोरान किनाऱ्यावर तीन आपटत होता. वनाऱ्यांशी जागा धूवून निगत होती. खोपट्या लांबन होत्या. मोजा तटा पोसत नय होता. त्यापायी कोणालास उधानाही धास्ती नय होती.

जेव्याहा वखत झाला. पार्वती काकीन तीन ताटा वाडली.

"तुला केव नय वाडला?"सुकऱ्यान विशारला.

"वाडता. पयला शंकरशा घरा थोडा कांजी नेऊन देता. त्यांशा घरान काईस केले नहतीन. बारकी पोरा हात. हन हाय. पोराना आशा हता. रशावर तरू जेवीतीन बिशारी पोरा." पार्वती काकी बोलली.

" जा. घिऊन जा. थोडा बोंबील भुजिले का?"सुकऱ्या बोललो.

"हा. सुलीन टाकिलेन. धानान खारा हाय. तुमी वाडून घ्या. मी येता पटकन." पार्वती काकी बोलली.

"हा. मी घेता. जा तू. पटकन ये."

पार्वती काकी कांजी ना धानाह्यो टोप घिऊन बाहेर पडली.

“ बगीतला पोरादो, तुमशा आयला बिज्यांशी कवडी धास्ती ती. सव्वाशे गराम मटनान पण तिन अवडा वाटा केला. याला हांगतान माणुसकी. मिंगली, मधुलीमाख, माकडा, हत्ती यांशा हरकास आपुन माणूस समाजान रेणारा जीव हात. आपुन एकमेकाना मदत केल्यास पायजे. तवास ता समाज पुडा जाता. आपल्या पूर्वजांहीन समाज बनविलो क्याहाठी? यास करता. एकमेखांशा कल्याणाहाठी.”सुकऱ्या बोललो.

“ आमशी आय हायस भुकेल्याही भूक जाणणारी तानलेल्याही तान जाणणारी.” संद्रा बोलली.

सुकऱ्यान बोंबील भुजून घितला. तिनी ताटान ते वाडला. पार्वती काकीठी ठेविला ढाकून. थोड्या वेरान ती आयली. चौगा गटारीया दाबून जेविला. मटनाया कांजी, भुजलेलाबोंबील, खारा, हुजरा कांदा, मुरा, लिंबू. त्यांशाठी जे जे करीलता ते ते पार्वती काकीन शंकरशा घरा नेऊन दिलता. मुही तोरपून ना तुंबडी भरून जेवला ते. कवडातरू दिहान हजिका जेवण त्याना मिरलता.

(२०)

अखाड खपलो. सरावन सुरू झालो. लोका बोल्याला लागली 'सरावन ना पोट भरावन'. केव ते माईत नय. आथा पाणी कमी झालतो. कवा निंबर ता कवा पाणी पडव्याहो. मदीमनी आभार साप होव्याहो ता कवा कारोकिट होऊन धो धो पाणी पडव्याहो. आसपासशा जंगल- वाड्यान सबन ठिकाणी झाडाझुडपा वाडून हिरवा हिरवा दिखव्याहा लागला.

सरावन मिंजे धर्माह्यो मयनो. गटारीया बिज्या दिहापासून सरावन सुरू झालो. उपास धरणाऱ्याहीन उपास धरला. मयनाभर मास-मटन-मावरा खाव्या नय. गणपतीला फूल पडलो का मंगे तिहऱ्या दिहापासून मावरा खाव्याला सुरवात करव्याही. बहुतेक बाई माणसाहीन उपास धरलो. पुरषाना उपास झेपे नय. मावऱ्याशिवाय त्याना रेवे नय. पोरानापण पायजे मावरा.

नागपंचमी झाली ना बायकाहीन डोम काडून नागाला दूध, कुरमूरे, बत्ताशा दिला. गावाबाहेर पिंपराया झाडाखाली सबनाहीन डोम ठेविला. त्या दिहापासून गावानशा देवलान अध्याय वाशाला सुरवात झाली. बायका-पुरूष कामधंदा सांभारून अध्याय आईक्याला जायाला लागला. हांशी कीर्तन हव्या. उपास धरो ना धरो संबनजीन अध्याय आईक्याला ना कीर्तनाला जात होता. देवाया, धर्माया आईक्याला बरा वाटत होता. मनाला समाधान मिरत होता. अध्याय आईक्याला जाणाऱ्या पुरषाहीन मयनाभर दारूपण होडलती. दूर डोंगरान रेणारा ब्रह्मानंद स्वामी सोता कीर्तन करव्याला आला ता पार्वती काकी ना बिज्यांना स्वर्गान आयल्या हरका समाधान झाला.

ब्रम्हानंद स्वामी कीर्तनान बोलत होता, "बोला पुंडलिक वरदा हार विठ्ठल! श्री ज्ञानदेव तुकाराम! पंढरीनाथ महाराज की जय! शिव शंभो!"

"प्रभूच्या भक्तांनो, प्रभू श्रीराम, काय श्रीकृष्ण, काय पांडुरंग काय, शिव शंभो काय ही सर्व एकाच परमेश्वराची प्रसंगोपात्त घेतलेली रूपे आहेत. वास्तविक देव परमेश्वर एकच आहे. तुमचा-माझा निर्माता पालनकर्ता, संहारकर्ता एकच आहे. तो सर्वत्र आहे. सजीवात-निर्जीवात-चराचरात तो आहे. त्याने हे विश्व बनवले. ही अनंत ब्रह्मांडे घडविली. मुंगीपासून हत्तीपर्यंत जीव निर्माण केले. शिंपला पासून देवमाशापर्यंत जीव घडविले. तो बाहेर तर आहेच पण तुमच्या- माझ्यात सूद्धा आहे.

तोच आपल्याला चालवितो. बोलवितो. आपली सर्व कार्ये करतो. तो आपल्यात शक्तीरूपात आहे. कृती काय करायची हे सर्वस्व आपल्यावर आहे."

लोक कान देऊन आईकित होता.

"तोस आपल्याला जाणीव देता. बरा काय वाईट काय ए आतमनशान हांगता. ते आईक्याला येव्याठी सतगुरूखनी शिकव्या लागता." बऱ्यास जीनाना ए कीर्तन आपल्या गावठी भाषेन हाय हये वाटला. पण ब्रह्मानंद स्वामी मराठीन बोलत होता."सद्गुरू आपल्याला देवाची खरी ओळख करून देतात. पण स्वतः ला देव म्हणवून घेत नाही. म्हणून सद्गुरू करायला पाहिजे. आपल्या सर्व साधुसंतांनी सद्गुरू केला. त्याचा अनुग्रह घेतला. त्याने दाखविलेल्या मार्गावर चालले. म्हणून आज तेही पूज्यनीय झाले. हा भवसागर तरण्यासाठी सद्गुरू कृपेचे ज्ञान लागते. मार्गक्रमण आपल्याला खरावे लागते."

पार्वती काकी ब्रह्मानंद स्वामी खनी समाधानान बग्याला लागली. सबनजीन तान-भूक विहरून आईकित होता.

" देव हा भावाचा भूकेला आहे. त्याला तुमच्या कडून काहीच नको. तुमचा भाव महत्वाचा आहे. आपण काय देणार हो परमेश्वराला? जे काही आहे ते त्याचेच आहे. हा देह देखील त्याचाच आहे. देव नारळाने फुला-हाराने, लाडू-पेढ्याने प्रसन्न होत नाही. हे सर्व मंदिराची शोभा वाढविण्यासाठी आणि आपल्या समाधानासाठी आहे. देवाला तुमचे शुद्ध अंत:करण हवे आहे."

" हे विश्व भल्या-बुऱ्या गोष्टीने भरलेले आहे. माणसाची वृत्ती त्याला वाईटाकडे खेचून घेते. मग तो मनुष्य कोणीही असो. म्हणून त्याला शिकवण द्यावी लागते. चांगल्याकडे वळवावे लागते. म्हणून मार्गदर्शक हवा. जो दोन्ही कडला चांगला मार्ग दाखवतो. बोला पंढरीनाथ महाराज की जय."

सबनाहीन गजर केला.

कोरोख पडेपर्यंत कीर्तन सालला. लोकाहीन मन लावून कीर्तन आईकिला. कीर्तन खपल्यावर लोक ब्रह्मानंद स्वामीया पाया पडव्याला लागला. स्वामीन मना केला.''नको. माझ्या पाया पडू नका. त्या परमेश्वराचे चरण धरा. मी काय. तुमच्या सारखाच सर्व सामान्य माणूस. पोटासाठी आणि मठासाठी खपणारा.''

लोका मंदिरांशा देवाया पाया पडव्याला गेली. पार्वती काकी हजप पडली. अवडा बोठा माणूस. पण जरापण अभिमान नय. सोताला आमशा हरकास हांगता. खरा साधुसंत हयेस हतान. साधा. भोळा. शांत. जगाहा विशार करणारा. सोता पेक्षा देवाला बोठा करणारा.

पार्वती काकी ब्रह्मानंद स्वामीया पुडान हात जोडून उबी रेली.

''बोल पोरी, काय इच्छा आहे?''त्यान विशारला.

''तुमाना भोजन देव्याही इच्छा हाय. तुमी माया घरा जेव्याला येतीन का?''पार्वती काकीन हात जोडून विशारला.

स्वामीन थोडा विशार केला. मंगे बोलला, ''जशी तुझी इच्छा. येतो मी.'' स्वामीया होकार मिरलो. तिला जाम आनंद झाला.

(२१)

आज पार्वती काकी जाम खूश होती. त्याला कारणपण थयेस होता. तिन गुरू करिलता तो ब्रह्मानंद स्वामी तिया घरा येव्याहा होता. पात्याराशी पासून, नय बऱ्यास दिहापासून तिला गुरूया वेध लागलता. तिन लंगड्या मामाला बोलवून जमीन करवून घितली. सोपानाही थोपविली. कुड ना जमीन हेनाही हारवून घितली. रिंग्या रिंग्याहा हेन हारिलता तिन. घरान सबन सापससपाई करवून ठेविला. हुक्का मावरा बाहेर बिज्यांशा घरान ठेविला. गायमूत हिपडून घर पवित्र करवून घितला. पंढरीला हांगून खोपटीला तोरण बांधविला. उतारान दोनी कोपऱ्यान केरी बांधीली.

सुकऱ्या, पंढरी, ना संद्रा पार्वती काकी हांगीन ती कामा सूपसाप करीत होता. देवळान कीर्तन करताना त्याहीन गुरुला बगतीलता. अवडा बोठा माणूस आपल्या घरान येव्या हाय याहापण त्याना आनंद झालता. बगून ते पार्वती काकी हांगीन ती कामा करीत होता.

पार्वती काकीन कणा टाकिली. त्यावर पिडा ठेविला. एका ताटान फलाफूला ठेविली. निरांजन लाविली. उदबत्ती लाविली. देवाला हार सडविला. फूला वाहीली. तिया घर एकदम मंदिराहरका हजलता.

तिन लालभडक कुकवा हरका लुगडा निहीलता. पोलकापण त्यास रंगाया होता. आंबोड्याला आबोलिया फुलांसा गजरा होता. कपारावरती बोठा कुकू लाविलता. हातान सुवासिनीया हिरवी बांगड्या घातिलत्या. सुकऱ्यापण नवी कपडी घालून तयार रेलता. त्यान हूजरा धोतर ना हुजरा सदरा घातिलता. त्यावर काला कोट ना डोख्याला हुजरी टोपी. पंढरी ना संद्रा पण बरी कपडी घालून हजलती.

शोभा, ठकी, मालती, गोकुली या सबन ओरखिया बायका आरतिया ताट घेऊन आयल्या.

“पार्वती, गुरजी रखमाया घरान हाय. थोड्या वेरान अटास येतीन. सबन तयारी झाली ना? " विठीन विशारला.

“ हा सबन तयारी झाली. फुला, फरा, पाना सबन हाय.” पार्वती काकी विठीला पूजेया सामना दाखव्याला लागली. पंढरी ना संद्रा खोपटीया बाहेर गेला. सुकऱ्या पण बाहेर पडलो. खोपटीन बायकांशी धांदल साललती. तोस "ओम शांती! ओम शांती! " हये आवाज आयलो. 'ब्रह्मानंद स्वामी की जय' नामघोष आयक्याला येव्या लागला. खोपटीन धांदल अजून वाडली.

“आया गुरूजी आयला.” पंढरीन खोपटीन येऊन हांगीतला.

बाहेर सुकऱ्या, पंढरी ना संद्रा हात जोडून उबी रेला. ब्रह्मानंद स्वामी दारान आयलो. पार्वती काकीन पटकन तांब्यानसा पाणी त्यांशा पायावर ओतीला. साप फडक्याही पाय फुहिला स्वामीही आरती केली. बिज्या बायकाहीन पण आरत्या केल्या.

"गुरूजी, घरात प्रवेश करावे.” पार्वती काकी हात जोडून बोलली.

ब्रह्मानंद स्वामीन मंदहास्य करून एकदा सबनाना बगीतला ना 'ओम शांती’बोलत घरान प्रवेश केला.

ब्रह्मानंद स्वामी पाटावरती बहला. सबन बायका, पार्वती काकी, सुकऱ्या, पंढरी, संद्रा हात जोडून स्वामीया पुडान उबी रेला. पार्वती काकीन स्वामीला परत एकदा ओवारला. लांबनशान झुकून आशीर्वाद घितला. पाठोपाठ सबनाहीन थयेस केला.

“गुरूजी, तुमशी कृपादृष्टी माहा या बारक्याशा संसारावर हवून द्या.” पार्वती काकीन विनवणी केली.

“ मुली तू भाग्यवान आहेस. ही साधी झोपडी नाही.” हये बोलून स्वामीन खोपटीन बगीतला. घडीभर डोरा मिटला. त्यांसा चेहरा खुलला. ते बोलला, “इथे पुढच्या तीस- पस्तीस वर्षात फार मोठे कार्य होणार आहे. तुला नातू होतील. ती कर्तबगार निघतील. तुझे आणि तुझ्या पोराचे नाव चालवतील. या घरात लोकांचा रोजचा राबता राहील. इथे ज्ञानदानाचे कार्य होणार आहे. या घरात ईश्वराची उपासना चालू होईल. मंत्रोच्चाराने घर भरून जाईल. पवित्र होईल हे घर. तुझ्या पुढच्या सर्व पिढ्या देवभक्त, पवित्र, सद्गुणी, परोपकारी असतील. तुझ्या घराण्याचे नाव चालवतील ते.”

ए सबन आयकून पार्वती काकीला समाधान वाटला.”गुरूदेवा ही तुमशीस कृपा हाय.”

“नाही. ही माझी कृपा नाही. मी कोण कृपा करणार? ही परमेश्वराची कृपा आहे. मीही तुमच्या सारखाच एक तुच्छ जीव आहे. तो परमपीता महान आहे. मी फक्त मार्गदर्शक आहे. परमेश्वराकडे जाणारा मार्ग दाखविणारा मी वाटाड्या आहे.”

ब्रह्मानंद स्वामी पुडा हांग्याला लागला.

“मुली, तू आता या झोपडीच्या आसपास एक उंबराचे झाड लाव. रोज सकाळ-संध्याकाळ त्याची पूजा करीत जा. निरांजन दाखवीत जा. तसे प्रत्येक वृक्ष हे परमेश्वर स्वरूपच आहे. पण या औदुंबरावर श्रीदत्ताची विशेष प्रीती आहे. तू उपास करतेस का?”

“ हा. मंगळवार करता मी. आमशी कुलदेवता एकवीरा आईया उपास हाय तो.” पार्वती काकी बोलली.

“ठीक आहे. त्याच्या सोबत सोमवार, गुरूवार, शनिवार करीत जा. नाही झेपलं तर शाकाहार भोजन करीत जा. श्रीदत्तांची तुझ्यावर कृपा राहील.”

“ हा करीन. नक्की करीन. गुरूदेवा माया पोराबदल काय तरू हांगा.”

ब्रह्मानंद स्वामीन पंढरीखनी बगीतला. थोडावेर डोरा मिटला.’’हा तुझा पोरगा तुमचा पारंपरिक व्यवसाय ही करणार आहे आणि सरकारी सेवाही करणार आहे. याला पत्नीही सुस्वभावी भेटेल. तू याची चिंता करू नकोस.”

“गुरूदेवा तुमशी कृपा झाली. मी धन्य झाली.” पार्वती काकी डोऱ्यान पाणी आणून बोलली.

“भगवंताची कृपा. बरं पोरी येतो मी.” ब्रह्मानंद स्वामी उठला.

“गुरूदेवा, भोजन?’’पार्वती काकीन विशारला.

“ कुठे आहे भोजन? आण इकडे.” स्वामी बोलला.

पार्वती काकीन शाकाहारी पकवानाही टापाटोपा स्वामीया पुडान आणून ठेविला. स्वामीन सबनाना हात लावला.

“पोरी, तूझा भावार्थ पाहूनच माझं पोट भरलं. हे सर्व आता गावात कोणी गोरगरीब असेल, ज्याच्या घरात काही शिजलं नसेल त्याला दे. मला जेवू घालण्यापेक्षा अशा भुकेल्यांच्या पोटाला अन्न घालशील तर जास्त पुण्य मिळेल. मंदिराला दान देऊन आमच्या सारख्यांना जेवू घालून पुण्य नाही मिळत पोरी. आपले जे जे आहे ते परमेश्वराचे आहे असे समजून शक्य तेवढी अडल्या-नडल्यांची मदत

करीत जा. उपाशी असेल त्याला जेवू घाल. तहानलेला असेल त्याला पाणी दे. कोणी धनापासून किंवा अन्य काही कारणास्तव अडला असेल त्याला मदत कर. हाच पुण्याई कमविण्याचा मार्ग आहे. मानसिक शांतीसाठी ईश्वराचे स्मरण कर. पुण्याई कमविण्यासाठी मदत करीत जा. परमेश्वर तुझा सारथी होईल.

आणि हो तू मच्छिमार आहेस. तुम्ही मासे खाणारे आहेत. म्हणून मी तुझ्या घरी जेवत नाही असा किंतू मनात अजिबात आणू नकोस. आम्ही संन्यासी माणसं. खाल्लं. नाही खाल्लं. फरक पडत नाही. ईश्वराचे नाम हेच आमचे भोजन. तू माझ्याकरिता अन्न शिजवलेस ते पावलं मला. हे अन्न गरीबांच्या पोटात गेले की मला प्राप्त होईल हे मनात पक्के धरून ठेव. अडल्या-नडल्यांची मदत कर. ती निश्चित ईश्वरापर्यंत पोहचतेच. तुझ्या खात्यात पुण्याई जमा होत जाईल.”

"जशी आपली आज्ञा.” पार्वती काकीन हात जोडला.

"परमेश्वर तुम्हा सर्वांचे भले करो.”

ब्रह्मानंद स्वामी उठला. सबनाहीन त्यांसा लांबून पाया पडला. 'ओम शांती' बोलत स्वामी बाहेर पडला.

स्वामी बाहेर पडल्यावरती फुलांसा सुगंध खोपडीन पसरला. खोपटीन एक प्रकारशी दिव्यशांती पसरली. स्वमीया पायाखनी पार्वती काकी एकटक बगीत रेली. सत्गुरूया पाय आपल्या खोपटीला लागला. आपुन धन्य झालो. हये तिला वाटला. मन एकदम हलका हलका झालता. मनान दिव्य आनंद भरून रेलता. तो आनंद हांगव्या हरका नय होता.

(२२)

सुकऱ्याान परदन्यान पैशे खोविला ना तो पट्ट्यावरती निगालो ताडी पियाला. रस्त्यान त्याला तुक्या मिरलो. त्याला बगून सुकऱ्याहा कपारावर आट्या पडल्या. तुक्या यो फुकट खाव हाय. फुकट खये मिरेन येस तो बगीत रेता. सुकऱ्या ला पट्ट्यान जाताना बगून तो जोडीला झालो.

दोगा पट्ट्यान बहला. सुकऱ्यान दोन लीटर ताडी मागविली. दोगाहीन दोन काशीही गलासा घितली. साकण्याला बाफलेला सना घितला. एकेक घोट घेत दोगा बोलत बहला.

"ए बग सुकऱ्या राग मानू नाका. तू हांगेन माहा कान भरता. खरा तेस हांगता. बायकाना मुठीन धरून ठेव्याहा. त्याना डोख्यावर सडून देव्याहा नय." तुक्याहा डोख्यान ताडी सडली थये बोलव्या लागलो.

"मीपण तेस हांगता. तू तुया बायकूला हुटी त्याला होडता?"सुकऱ्या पण नशेन बोल्याला लागलो. यावर तुक्या शिडलो."मी तुया बायकू बदल बोलता ना तू माहा बायकूवरती आयलो तो. माही बायकू बरी हाय. तुहीस बायकू बरी नय मिरे."

" ए माया पार्वती बदल नीट बोल. माही पार्वती देवी हाय." सुकऱ्या बायकूया पक्ष घेऊन बोललो.

"पार्वती देवी नय भुतारीण हाय." तुक्या आवाज सडवून बोललो. सुकऱ्या संतापलो. त्यान शिडून तुक्याहा तोंडावरती ताडी फेकीली. बगीता बगीता फेकाफेकी

सुरू झाली. दोगांशी मारामारी लागली. कुत्र्यांशी लागता थये. तुक्या सुकऱ्याला माऱ्याला लागलो. सुकऱ्यान पण त्यावर हात साफ करून घितला.

पट्ट्यानशा माणसाहीन मदीन पडून त्यांशी मारामारी होडविली.

"तुही बायकू लफंगी हाय. तवास बिज्यांशा घरान आग लावीत फिरता." सुकऱ्या बोठ्यान बोललो.

"सुकऱ्या, माहा बायकू बदल नीट बोल. माना तून अजून ओरखिलेला नय मिरे." तुक्यानपण आवाज वाडविलो.

"मीस काय आख्खा गाव तुला ओरखिता. बायकू लोखांसा मावरा सोरता. नवरा मारामारी करीत फिरता. ना दोगा लोखांशा घरान आग लावीत फिरतान. सोर कडसा ते." सुकऱ्या ताणओढ करीत बोललो.

"तू ना तूही बायकू लबाड हाय. सोर हाय. भुतारीण कडशी ती." तुक्या बोललो.

"ए सोरा. तुहीस बायकू लबाड हाय. भुतारीण हाय. तीन नवरा खाऊन बहले. आथा तुला धरले. बारलवडी कडशी ती." सुकऱ्यान गारे दिले.

" ए सुकऱ्या, तू काय बोलता? माना अजून ओरखिलेला नय. मी जाम खराब माणूस हाय. मी तुया खानदान बरबाद करीन. तुया वंश वाडून देव्याहो नय."

तुक्या दम देऊन निघून गेलो.

सुकऱ्या घरा परतलो. पार्वती काकीला सबन हांगीतला. तिया कारीज थरथऱ्याला लागला. तिन सद्गुरूया स्मरण केला, "देवा तुही कृपा ठेव रा."

“तुमी क्याला नादी लागतान? तो हाय खरपाशी. आडडंबू. माऱ्याला खोटी करव्याहो नय. देवा, माया पोरांसा वंशाया रक्षण कर.”पार्वती काकी हात जोडून बोलली.

“वेडी हाय का तू?”सुकऱ्या बोललो , ”त्याहा काय माकडाहा आयकिता? सतगुरुन काय हांगतिलता? आपली नाता आपला वंश पुडा नेतीन. नाव कमवितीन.”

“हा. मी विहरलती यांशापायान.”

“वेडी, कवातरू सत्गुरूया ऐकव्याहा. सदगुरू हांगता तेस खरा हता. लोखांसा नय आयकव्याहा. लोक काय डुबव्यालास येतान.” सुकऱ्यान पिलतीपण शानपणाहा बोलत होता.

“मी काय हांगता, पंढरीहाठी पोरी बगू या.” पार्वती काकीन सूचविला.

“आजूस मीन दोगा-तिगाना हांगून ठेविलाय. त्यांसा निरोप मिरला का जाऊ पोरी बग्याला. पसन करू ना देऊ पंढरीया लगीन लाऊन. खये”

“बरबर हाय.”

तिया मनाला समाधान झाला. पोराया लगीन होन. होयरीक वाडेन. बाजू होन माही. माही नाता येतीन. गणगोत वाडेन माहा. मंगे सबन विशारतीन. कुन मेलो नावा ठेव्याहो नय. ना दम देव्याहो नय.”सतगुरू राया, लवकर कर. आथा रेवे नय.”

पार्वती काकीन मनामनान प्रार्थना केली.

(२३)

पंढरी जाम खुशीन होता त्यान कडसातरू कोलशाहा खडा आणला. पेटविला. लाल केला ना तांब्यान घिऊन शाळीनशा कपड्याना इसतारी करव्याला लागलो. संद्राही कपडीपण त्यान इसतरीहाठी घितली. पार्वती काकीन विशारला, "केव रा दादा? कटा सालला?"

"आया, आज हाय ना राशी भारताला स्वातंत्र्य मिरेन. राशी गावान बोठो कार्यक्रम हाय. मास्तरान माना बोलविले. आज राशी गोरा लोक त्यांशा गावान जातीन. आपुन स्वतंत्र होतीन. उद्यापासून आपल्या देशाया लोकाना सुखाहा दिह येतीन." पंढरी खुशीन बोललो.

"तू ता शाळीन जाई नय. मंगे तुला केव बोलविले पागधरे मास्तरान?" पार्वती काकीन विशारला.

"बोठी पोरा पायजेन का नको. मशाल घिऊन गावान फिरव्याला लागेन. 'वंदेमातरम्' बोलव्याला लागेन. आजशा राशी आपला देश खरा मिंजे जागा होन. पहाट होन आज. रेडिओ वरती राशी पंडित नेहरू ना महात्मा गांधींजी भाषण करतीन. साने गुरुजी ना सावरकरसा पण भाषण होन."

"साने गुरुजी ता आलता ना तुया शाळीन?"पार्वती काकी.

"हा मीन बगतीलता त्याना. मस्त गोष्ट हांगतान ते तुया हरका." पंढरी कपड्यावर तांब्यो फिरवित बोललो.

"संद्रालापण नेव्याहा का?"

" हा. आज स्वातंत्र्याहा दिह हाय. सबनाहीन यामनी भाग घेव्याहा हाय. पोरा. पोरी. पुरुष. बायका. सबन हतीन मिरवणुकीन." पंढरी बोललो.

“ जा बाबा. फेरीला जा.’वंदेमातरम्’ बोल. राष्ट्रीय झेंडा घिऊन लोकाना जागा कर. देवाला हांग आथातरू आमाना सुख दे.” पार्वती काकी बोलली.

ती बंदरावर गेली. अटा पंढरीन मस्त इसतरी केली कपड्याना. ती कपडी नीट मांडणीवर रसून ठेविली. संद्रा ए सबन बगीत होती.

“खरास का आज जाम बोठा उत्सव हाय?”

“हा. आपुन जाव्यास हात. यो स्वातंत्र्याहा उत्सव हाय. परत कवा येव्याहो नय. घालव्याहा नय यो दिह. तू अटा घरामनी लक्ष दे. मी बाजारान जाऊन येता.”

“केव रा दादा?”संद्रान विशारला.

“तुमाठी राष्ट्रझेंड्याही वेणी ना राष्ट्र झेंडा घिऊन येता.”

संद्रा राष्ट्रझेंड्याही वेणी आयकून खूश झाली. पंढरी बाजारान गेलो. लागेन ते सामान आणला. कवा रात होन हये त्याना झालता. गावान स्वातंत्र्य उत्सवाही तयारी सालू होती. हांशीस वाईट बातमी त्यांशा कानावरती पडली. पंजाब ना बाकी भागान दंगा झाला. हिंदू-मुसलमानाहीन एकमेकाना कापिला. अखंड भारताहा भारत ना पाकिस्तान हये दोन तुकडा पडला. ब्रिटिश लोका जाताजाता आग लाऊन गेली. अख्खयशी. हिंदू-मुसलमानाना कायमसा फोडला त्याहीन. फूट पाडली.

पंढरीला ए सबन आयकून वाईट वाटला. माणूस ना दुनिया कवडी स्वार्थी हता. 'माना नय मिरे ता घाल कुत्र्याला', हये करता इ दुनिया. माना नय मिरे ता बिज्यालापण मिरून देव्या नय इस वृत्ती हाय या जगाही. इंग्रजांशा ताब्यान यो देश गेला. पण अडशा लोखाना नीट सुखाया जगता येव्याला नको त्याहाठी इंग्रजाहीन हिंदू-मुसलमानान फूट पाडली. वाद लाऊन दिला.

राशी जेऊन झाल्यावर पंढरी ना संद्रा लवकरूस तयार झाला. ते शाळीन जायाला निगाली.

“पोरांदो, हरकी जा. वाटीन कुत्रा हतान. राशापरा अटातटा भटकू नाका. पंढरी संद्राला नीट घिऊन जा.” पार्वती काकीन समजाऊन हांगितला.

“ आया तू घाबरू नाका. आमी स्वातंत्र्याहा उत्सवाला जातान. बरीस माणसा हतीन. बरीस पोरा-पोरी हतीन. आज खरी मजा येन 'वंदेमातरम्' बोलव्याला.” पंढरीला जोम सडलो.

पार्वती काकीही दोगी पोरा राशी शाळीन गेली. शाळीनशी बरीस पोरा-पोरी कपडी घालून आलती. मास्तर, गावानशी जाणती माणसा, स्वातंत्र्यसैनिक इ सबन माणसा शाळीह्या मैदानान जमली. पंढरी ना बाकीया स्वयंसेवकाहीन सबनाना एका ओरीन उबी केला. बोठ्या पोरांशा हातीन राष्ट्रझेंडा होता. काही पोराहीन उजेडाठी कंदील ना गॅसबत्ती धरीलता. स्वातंत्र्यसैनिकांशा तोंडावर तवड्या कारोखानपण स्वातंत्र्याहा आनंद दिखत होता.

पागधरे मास्तरान एक डरकाली फोडली.

"एकसाथ सावधान. राष्ट्रगीत सुरू कर.”

त्यांना आवाज शाळीया कानाकोपऱ्यान, झाडाझुडपान घुमला. त्याबरबर राष्ट्रगीत सुरू झाला. आंगा आंगावर काटा उबी रेला. सबनानशा डोऱ्यान पाणी आयला. स्वातंत्र्यसैनिक ता धायधाय रडला.

मंगे प्रभातफेरीला सुरवात झाली. होती रात. पण देशाठी ती प्रभात होती. गावाया रस्त्यारस्त्यावरती रांगोल्या टाकिलत्या. पाण्याही त्या वाहून गेल्या. पण लोकांसा स्वातंत्र्याहा उत्साह कमी नय झालो. लोकाहीन पणत्या लाऊन उजेड करीलता. वाय-पाणीपण त्या पणत्या बिजव्याहा विशार करीत नय होता. मशालीया उजेडान गावभर प्रभातफेरी निगाली. लोक जागा होऊन घरामनशान बाहेर निगून स्वातंत्र्याहा उत्सव बगीत होता. कुणी प्रभातफेरीवरती फुला टाकीत होता. त्यांशा आयुष्यान हजिका उत्सव यो पयल्यांदास बग्याला मिरत होता त्याना.

‘ भारत माता की जय', ‘वंदेमातरम्', ‘स्वातंत्र्य चिरायू राहो’पोरा हये घोषणा देत होती. कुणीस निजला नय. यो जागव्याहा टाईम होता. सबनानशाठी हनाही रात होती. रात डोख्यावरती सडलती. पण कुणीस देशभक्त निजला नय. दायींसा पोरपण रडव्याहा थांबला. केव ता माना जनमतास देशाहा स्वातंत्र्य बग्याला मिरला. स्वातंत्र्यान त्याहा सवाश सुरू झाला. याहा त्या प्रत्येक जनमलेल्या पोराना आनंद झालता.

लोक-लोक प्रभातफेरीन सामील झाला. गाव दिव्याह्या ना मशालीया उजेडान झगमगून गेलता. धूपाह्या ना फूलाह्या वासाही गाव सुगंधित झाला. आकाशान ढग जमलता. परत एकदा पाण्याला सुरवात झाली. पावसानपण देशप्रेमीवरती पाण्याहा अभिषेक केला.

प्रभातफेरी शाळीया मैदानान पोसली. भर पावसान भर अंधारान सबन स्वातंत्र्यप्रेमी उबी होता. पंडित जवाहरलाल नेहरूंन रेडिओ वरती भाषणान काय हांगितला ते पागधरे मास्तरान सबनाना मराठीन बोठ्या आवाजान हांगितला. शेवटी सबनाहीन उजवा हात पुडा करून प्रतिज्ञा केली.

“मी या राष्ट्रध्वजाशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करतो.”

पंढरी ना संद्रा घरा परतला.

रात उलटून गेलती. ते साप भिजलता. त्याहीन कपडी बदलीली. पार्वती काकीन फडक्याही त्यांसा आंग ना डोखा साफ फुहिला. दोगापण मांदऱ्यावरती निजला. संद्राला नीज लागली. पंढरी जागास होता. तो पार्वती काकीला हांगीत होता, “आथा उद्यापासून आपुन सुखी होतीन. इंग्रज गेला आया.”

पण पार्वती काकीया तोंडावर आनंद नय होता. ती मनान बोलली, ”इंग्रज गेला खरा पण आपली पिल्ला ठेऊन गेला. त्याहा काय ती जगून देतीन का सुखाही”

(२४)

सरावन खपलो. लोकाहीन देवळान अमोशाही सत्यनारायणाही पूजा घातिली. भादवो लागलो. शार दिहान गणपती आयला. लोकाहीन नवसाया ना हौसाया गणपती भवडीला. गावान एक दोन हौसाया गणपती होडला ता सात आठ घरगुती गणपती होता. बारक्या पोराहीन सार्वजनिक गणपती बहडविलतो. आथा प्रश्न पडेन का आगोठीला अवडा सबन करव्याला पैसो कडसो? ता बाप्पा, कोली लोका जाम हौशी! 'कर्जवाल्याहो कर्ज काडीन पण पोराटोराना उपाशी ठेव्याहो नय' हये कोणीतरी बोलून गेलता. ते सबनानशा मनान बहला. धंदो सालू हता तवास ते उगरानी काडून ठेवीतान. त्यामनी ज्याला मागशा वर्षी बरा मावरा होता, तो बोटवाला गणपतीही मूर्ती ना मंडपाहा खर्च देता. ज्याहीन नवस केलेला हता ते सीजनला पैशे बाजूला काडून ठेवीतान. ना कमी जास्त पडला ता दलाल ना व्यापारी हातूस पैशे उहना देव्याला.

पार्वती काकीन ऐपती परमान मोदक लाडू केलता. देवाला जोवारून झाला. देवाया चरणावर फूल पडला ना पोराटोरांशा तोंडान गोडधोड पदार्थ पडला. पार्वती काकीन एक लाडू देवापुडा ठेविला ना बिजा पोराना दिला.

दिह दिहाया गणपती गेला. अनंत चतुर्दशी झाली. लोकाहीन बोटी डेवरिल्या. सरावनान नारल पौर्णिमेला सागराही पूजा करीलती सबनाहीन. फूला, उदबत्त्या, बत्ती दाखवून सागराला विनंती करीलती, "देवा सागरा, तूस आमसा आयबाप हाय. आथा आमी मच्छिमारीया धंद्याला सुरवात करतान. बोटी होडतान पाण्यान. तूस आमसा सांभार कर."

पूजा जरी नारल पौर्णिमेला झाली तरू बोटी गणपती नंतरस डेवरिल्या पाण्यान. संकष्टीला खोपटीया हन आयलो. यास दिवशी बंदरावर वनाऱ्या ना

तात्पुरत्या खोपट्या उबी रेव्याला सुरवात झाली. बाठावर जारा हिव्याला बोठा खोपटा पडला. हांशी सांदाला जोवारून झाला. लोकाहीन उपास होडलो. लोक जेव्याला बहला तवा राशी वीज गरोडो झालो. वायपाणीपण जाम होतो. आथा यो थांबता का नय हये झाला. बोटी डेवरिलत्या. जारा भरीलती. पाटी सामान भरीलता. वागराना जाव्याही तयारी होती. त्यामनी यो उलटा वायपाणी आयलो. धास्ती वाडली. पण अर्दी रात होता होता वायपाणी थांबलो. आभार साप झाला. पात्याराशी बोटी हुटव्याह्या टायमावर बर्फावरनी आयल्या हरका थंडो वाय हुटलो. सांदण्या सबन दिखत होत्या. सांद मावरताना दिखत होतो. बोटी हुटल्या.

आणि.... ... बिज्या दिवशी.....

गावान सामसूम होता. कुत्र्याहापण आवाज नय होता. वाल्याहा घरान शोक झालता. लोक लोक लोटलता त्याहा घरान. कालशीस गोष्ट. बोठ्या मावऱ्याठी जारा मांडीलती. अवड्यान देवमासो आयलो. हेपटाही बोटीवरती फटको मारलो. बोटीही गाबडी निगली ना बोट बुडली दर्यान. खलाही, वाल्या, रामसंदर, दामू, राजाराम, भरत, पंढरी ए सबन सुखरूप घरा परतला. बिज्या बोटीन त्याना घरा आणला. त्याना बगून ना त्यांशा तोंडानशान बोटीही वार्ता आयकून घरान एकूस रडाबोंब झाली. सबन खलायांशा बायका, पार्वती काकी, संद्रा ए सबन रडव्याला लागल्या. पुरषानापण रेवला नय. ते पण रडव्याला लागला. शेवटी अवडा किमती जीव वासला ए महत्त्वाया.

आतमनी वाल्याही बायकू रुपा बग्याला येणाऱ्या बायकाना तीसतीस गोष्ट रडून रडून हांगीन होती. बाहेर वाल्या, दामू, रामसंदर ए पण पुरषाना बोट खये बुडली ते हांगीत होता.

"आमीन पयला जोर घितलो. बरास मावरा होता. दाढा, घोळ, रावस. बिज्या जोराही जारा मांडीली. राशीया वखत. सबन निजलता. मी एकटोस जागतो. लोयली टाकिली. आजूबाजूला दर्यान यो कारोख! बिज्या बोटी लांबन लांबन. मी बोटीया दखल्या बाजूला लक्ष ठेऊन होतो. मानापण डुलकी लागली. मीन वावरी पेटवीली. एक दोन घूट घेता न घेता तोस 'फटाक'शी आवाज झालो. धरणीकंप झाल्याहरकी बोट हालली.

सबनजीन घाबऱ्याही जागा झाला. काय झाला ते पटकन समजलास नय. थोड्या वेरान पुडशी नाल पाण्यान जाव्याला लागली. इंजिनमनी पाणी घुसला.. नाल तुटली. ती क्यापायी फुटली ए आमाना समजलास नय. बगीतान ता काय आमशा समोर यो बोठो देवमासो पाणी उडवीत गेलो. आमी जाग्यावर थरथर काप्याला लागला. देवमाशान बोट फोडली ए आमी समजला. आमी पटकन शिंदे, तिकडी, पाण्याहा डराम एकमेखाना बांदून घितला. त्यावर बहून आमी पाण्यान तरंग्याला लागला. नशीब आमसा एकाही बोट मिरली. आमशा डोऱ्यादेखत आमशी बोट बुडली. आमशी लक्ष्युमी पाण्यान गेली." वाल्याहा डोऱ्यान पाणी आयला.

"रडू नाका." एकजीन समजावीत बोललो, "तुमसा जीव वासला अवडा बरा झाला. धंदा गेला ता गेला. तो काय परत उबी करता येन. पण एकदा माणूस गेला का परत मिरे नय. तुमी सुखरूप हात यामनी समाधान हाय."

"खरास हाय तुमसा. पण बोटीयापण दुख हायूस. जिया मुंडार बारक्याहा बोठा झाला. लगीना केली. आमा बाहांसा, आयबापांसा, काका-काकीहा संसार झालो, तिस बोट बुडली ता दुख होतास दादा." रामसंदर बोललो.

अटा आतमनी बोट खये बुडली ए माईत हवून तरू बायका येऊन येऊन विशारीत होत्या. बोट बुडली त्याहाठी खराखोटा कालविलत होता. माणसा वासली त्याहाठी देवाया आभार मानीत होता.

"देवाया सत्व हाय बगून माणसा वासली." एक बाई बोलली.

"हा खरास. देवाया सत्वाशिवाय माणसा वासत नय बाय." पार्वती काकी बोलली.

सखू हलूस रूपाखनी सरकली. पार्वती काकीखनी बगीत रूपाला बोलली, "बाय, तुमशा नवऱ्यांशी दिहट काड. कुणाही तरू नजर लागलेय त्याना. कुणाला तरू तुमी पुडा जातान ते बगवे नय. बगून पक्का बंदोबस्त केलाय कुणीतरू. तुमशा नवऱ्याना मारव्याहास पलान होता बाय. हयेस बोट नय बुडली."

रूपा कान देऊन आयक्याला लागली. तिहा काळीज घाबऱ्याही वरती-खालती होव्या लागला. तियापेक्षा पार्वती काकीहा कालीज ता जास्तीस धडधड करव्याला लागला. विठीला सखूया डाव समजला. ती रूपाला बोठ्यान बोलली, "बाय सखू, बरबर बोलता. कुणीतरू तुमशा आख्खा खानदान बरबाद करव्याहा बंदोबस्त केलाय. पंढरी बिशारो, सबनान बारको होतो. त्यान ता कायपण दुनिया बगीतली नय. देवाया, सतगुरुया, सत्व होता बगून पंढरी वासलो ना सबन खलाही वासला."

पार्वती काकीला सबनान बदनाम करव्याहो सखूयो डाव विठीन बोठ्या हुशारीन पाडलो. त्यापायी पार्वती काकीला बरा वाटला. छाती उडव्याही थांबली.

"बाय रूपा, घरान पूजा वास. होम कर. बाहेरशा कोणालापण बोलवू नाका. घरशी घरशीस माणसा ठेव. कुन खये हता. खये नय. देवाया कार्यानपण विघ्न आणणारी माणसा हतान बाय. राक्षसी वृत्तीही." विठी रुपाला बोलली.

विठीया ए शब्द सखूला जाम झुमला. सांत्वनाला आयलेल्या बायका समजून गेल्या का सखूया ना विठीया काय सालले ते. सखूवरती सबन बायका शिडत होत्या. विठीन तिला बोलण्यान टोमणा मारला. सखूला ते लागला. बायकांना बरा वाटला. काईक बायका मनामनान बोलव्याला लागल्या."आयलेन क्याला ना करतान काय? थोडातरू भान ठेव्याहा ना."

बाहेर शिपाय आलता. त्याहीन पंचनामा केला. खलायांशी जबानी घितली. ते त्यांसा काम करून गेला. सरकार खनशान काय मिरेन हये आशा नय होती. जे काय करव्याहा लागेन ते त्यानास करव्याहा लागेन. एकमेकाना साथसंगत देऊन करव्याहा लागेन ए खलायाना माईत होता.

(२५)

हकाल दिखिस संद्राला झाड्याला होत होता. तीन-शारदा ती बंदरावर जाऊन आलती. पार्वती काकीन तिला लिंबाया सरबत करून दिला. पोटाही खुरमी जायाठी बेंबीवरती पैसा ठेवून त्यावर कापूर पेटविला ना पटकन कासूया गलास ठेविला. कापूर बिजल्याखोटी बेंब गलासान वरती सडली. बरास टाईम ती थयेस रेली. आपुआप गलास निगालो. यो उपाय केला बगून तिला बरा वाटला. तिन शाळीन जाव्याही तयारी केली. पार्वती काकी बोलली, "नाका जाऊ. बरा नय करी ना तुला. झाड्याला उतरतान. क्याला जाता?"

"आया माना आथा बरा हाय. आज पाटेल बाई उजळणी घेव्याही हाय. मीन औटकी, दीडकी पाठ केली हाय. मी ते बाईला बोलून दाखविन. बाई माना शाबासकी देन."

संद्राला अभ्यासाही जाम गोडी होती. पार्वती काकीन तिला शाळीन पाठविली. ती एकटीस घरान होती. पंढरी बोटीन गेलता. सुकऱ्या खोबरान पागेऱ्याला गेलतो. पार्वती काकी हुक्का मावरा टोपलीन भरून ढाकून ठेव्याला लागली. अवड्यान शाळीनशी एक पोरी निरोप घिऊन आयली.

"मावशे, तुला पाटेल बाईन शाळीन बोलविले."

" क्याला गा बाय?"

"संद्रान शाळीन झाड्याला केलाय. वरगान सबन रेंदा झालाय. पोऱ्या उठून गेल्या. पाटेलबाई जाम शिडलेय. संद्राला काय काय बरा वाईट बोलली."

"संद्रा कटा हाय?"पार्वती काकीन घाबऱ्या घाबऱ्या विशारला.

“ती तटास शाळीन हाय. जाम रडता.”

“ तू पुडा सल. मी येतास.”

आलती ती पोरी गेली. पार्वती काकीन पटकन खराटो घितलो. कसरा भरव्याहा हुपडा घितला. शाळीन गेली.

“ ये. अवडा वखत? साफ कर ते. पोरीला बरा नय ता शाळीन क्याला पाठव्याहा? असनी घोडी झाली. संडास धरून ठेविता नय येय?”पाटेल बाई रगीरगीही बोलली.

“बाय माणूस हाय. कवा तब्येत खराब होन काय हांगता येता कुणाला ढुसा दिलाय. सबनाना तरास होतास. पोरीला बोलू नाका बाय. तिही इज्जत रेव्याही नय.” पार्वती काकी थोड्या गुश्शाहीस बोलली.

“व्वा! शानी माही बाय. इ शाळा हाय. उकाड नय रेंदा करव्याला. अटा पोऱ्या विद्या शिक्याला बहतान. समजला ना.” पाटेलबाईपण रगीरगीही बोलली.

पार्वती काकी काय नय बोलता कामाला लागली. माती टाकून साफ केला. पाण्याही धुवून टाकिला. हेन हारून दिला. संद्राला ओगी करून घरा आणली.

“बस, आथा शाळीन जाऊ नाका. हजिकली दुष्ट बुद्धीही माणसा हल्यावर कुणी काय शिकव्याहा? आथा खये होव्या आपला गरीबांसा? कुणी वालीस नय.”

पार्वती काकी संद्राला ऐंगीन घिऊन माथ्यावरशान हात फिरवून समजावित हांगीत होती.”उलट्या संडास कुणाला सुकलाय का? मंगे नुसतास बोलव्याहा? माह्या डायडूय पोरीही इज्जत काडली. जये खये यांशा गाडीला ढुसा दिलाय. ए नय का हगत बोठे आयलेन शिकव्याला.” पार्वती काकीला पशीताप झालता. जुवान पोरीही सबना समोर इज्जत गेली. बाईन समजून नय घितला याहा तिला शीड आलती. पण काय करीन ती कुणाला हांगीन कुण आयकून घेन?

(२६)

विठीला जेवणाया टायमावर दारान बगून पार्वती काकी काय समजव्या ते समजली. विठीया हातान बारकी टोपशी होती. रम्या, निशा उगडानागडा तिया मगाटी होता. तिया तोंड बगून आज यांशा घरान सूल पेटली नय ए पार्वती काकी समजली.

“ ये बाय. बह अटा.” पार्वती काकी हये बोलल्यावर विठी सूलीया बाजूला जाऊन बहली. तिला एकदम लाजव्या हरका झालता.

“विठी क्याला तोंड बारका करता? ए पण दिह निगून जातीन. तुयापण बरा दिह येतीन. बग मी हमेशा हांगता. 'हेनानशी कीड हेनान रेई नय'. तेस दिह रेत नय. कवा बरा ता कवा वाईट. ए सालूस रेता.” पार्वती काकी धीर देत समजावीत बोलली.

"पार्वती बाय, तू एक हाय जी माना धीर देता. नाय ता माहा हगीहोयरा जाम पाडून बोलतान. मी आयली बगून घरादाराया सत्यानाश झाला. कलाटी लागली. हये बोलतान ते. आथा तूस हांग बाय, याना दारूया संद लागलाय. दारूपायी त्यांशी ना आमशी- बायका पोरांशी जिंदगी बरबाद झाली. दारूपायी ए झाला हये नय बोलत. मानास दोष देतान.” विठी रडतरडत हांगीत होती.

“रडू नाका बाय. आथा हाल- जंजार काडव्याहा. आपल्या नशीबान लिहिलाय ता ते भोगव्यास लागता. देवादिकाना नय सुकला ता मनुजाला काय सुकेन.” पार्वती काकी समजावीत बोलली.

“ तू हांगता ते खरा हाय रडून पडून काय वडे नय. काम करीत रेव्या. पाटीला यश देव्याला भगवंत हाय.”

“आथा खये बोलली. इ दोन दुवापुता हात ना त्याना वाडव. इ करती झाली का बग खये होन ते. बंगल्यान रेन तू. गाडीन फिरेन.” पार्वती काकीन विठीला गोड सप्ना दाखविला. विठी हाली.

“बाय, तुया तोंडान हाकर पडो. जेव्याला काय केलाय?”

“हेकटाया पाल्याहो शाक ना बोंबील तरलेन. हुक्क्या कावलेटीया कांजीपण केलाय.”

मावऱ्याहा नाव आयकून पोरांशा तोंडाला पाणी हुटला. विठीला पोटान कालवाकालव झाली. राशी जेमतेम खायाला मिरलता. तिन पार्वती काकीला समजून दिला नय. पाना पालटीत ती बोलली, ”पंढरीया लगीन कवा करव्याहा? पोरी बगीतली ना! काय झाला त्याहा?”

“बाय हाय ते बरा हाय. आसपासशा सबन गावानशा पोऱ्या हांगून झाल्या. पोऱ्यांशा घरा कुण हांगता देव जाणे. कोणी हांगता पंढरी गादेलो हाय. कोणी हांगता याला पोरा होव्याही नय. कोणी हांगता याला घर नय. दार नय. त्याला काय पोरी देव्या. बग बाय माह्या पोराबदल लोका खये हांगतान ते.” पार्वती काकी दुखाही बोलली.

“बाय, आपलीस माणसा आपला वाईट करतान. आपलोस रूपयो खोटो ता कुणाला दोष देव्याहा?”विठी हांगीत होती.” मेल्यांना, होयरीक मोडणाऱ्याना दिखे खये नय कुणाहा बरा होत हतीन ता क्याला मदीन काडी घालव्या? कुणाहा बरा होता

ता होऊन दे ना. बाय तू वाईट मानून घिऊ नाका. पंढरीया लगीन नक्की होन बग. तून कुणाहा वाईट केलाय ता तुया वाईट होन? कून तरी पोरी देन बग.”

“नशीबा शिवाय काय नय. जोडा स्वर्गान तयार होतान. आपुन हये ना थये हांगतान.” पार्वती काकी बोलली.

“ जाउंदे. तू शिंता करू नाका.” विठी समजवीत बोलली.

पार्वती काकीन तिला कांजी दिला. बोंबील दिला. शाक दिली.

“बाय तुया उपकार कया फेडू?”विठी बोलली.

“उपकार कडसा गा बाय. मदत करव्याहा एकमेकाना. इस माणूसकी हाय. बाय आथास माणूस ओरखाव्या. मेला ता गेला. माही एकूस इच्छा हाय. सबनानसा कल्याण होउंदे. मगाटी माया कल्याण होउंदे. बाय तुला हांगून ठेविता. मी मेली गेली ता माया या दोगा पोरावर लक्ष ठेव.”

“ हट. हये काय बोलता? मरे तुया दायदुषमन. तुयावर ता ब्रह्मानंद स्वामीही कृपा हाय. तुया कायपण वाईट होव्याहा नय. सांगलास सांगला होन. जे होन ते सांगलास होन.” विठी बोलली.

“बस हये धीर देणारी माणसा पायजेन. मंगे कष्ट कऱ्याला तरास काड्याला काईस वाटे नय.” पार्वती काकी बोलली.

(२७)

वरीसावर वरीस जात होता. सरावन-भादवो दर वरीस येव्याहो ना जाव्याहो. नारली पौर्णिमाला दर्याही पूजा होव्याही. गणपतीला मोदक बनव्याहा. गटारीला मटन हिजव्याहा. खोपटीया हनाला बोटी सुरू होव्याहा ना संक्रातीला बंद होव्याहा. देशाला स्वातंत्र्य मिरल्यानंतर थोडी थोडी सुधारणा होव्याला सुरवात झालती. गावान मोटार सुरू झाली. इंजिनशा बोटी वाड्याला लागल्या. मच्छीमारामनी सहकाराही भावना वाड्याला लागली. दलाल ना व्यापारापासून आपली हुटका करवून घेव्याही आपली सहकारी संस्था पायजे हये लोक विशार करव्याहा लागला. कुणी दालदा या (पापलेट) हरगा मावऱ्याहा धंद्याहा विशार मांडव्याला लागला. कव, वागरा, काटी-मुशी, तरती-बुडती ए धंदा होतास. आथा दालदा या फक्त हरग्या मावऱ्याठी धंदो सुरू करव्याहा कोळ्यांसो विशार सालू झालो.

पार्वती काकी, विठी, शोभा या सबनानशी परस्पती थोडी थोडी सुधरीत होती. पंढरी ना संद्रा बोठा झाला. संद्रा लगीनाही झाली. पंढरीया लगीनस होत नय होता. पार्वती काकीला या दोगा पोरांशा लगीनाही शिंता लागून होती. तुक्या ना सखू अदीनमदीन कल काडीत रेव्याहा. तुक्या ना सखू तिया भावल्यांशा पोरांसा कान भरीत रेव्याहा. मंगे ते पण वेड्या हरका नातीगोती विहरून पार्वती काकीला तरास देव्याला येव्याहा. आथापण ते आयला.

पार्वती काकीया खोपटीया बाहेर खाटलीवरती वाल्या ना रामसंदर येऊन बहलता. त्याना बगून पार्वती काकीया कपारावरती आठ्या पडल्या. ये लोक आयलेन मिंजे नक्कीस काय तरू कल हाय ए पार्वती काकीन ओरखीला. घरान बिजा कुणीस नय होता. संद्रा हुक्का मावरा आण्याला गेलती. पंढरी कामाठी कारखान्यान गेलता. पार्वती काकी त्यांशा पुडान येऊन उबी रेली.

“काय काम होता?”तिन विशारला.

“ए बग काकी फिरून फिरून हांगी नय. स्पष्ट हांगता. इ खोपटी आमाना दे.” वाल्या बोललो.

“ व्वा! शाणा हात दादा. तुमाना इ खोपटी देऊन माहो पोर कटा रेव्याहो? पंढरीन काय करव्याहा?”पार्वती काकी संतापली.

“काकी, तू समजे नय. आपुन संद्राया लगीन लाऊन देऊ. पंढरीया काय लगीन होन हये वाटे नय. तो घाशेडो हाय. त्याला कुन पोरी देव्या हात? ना दिली तरू त्याला पोरा होव्याही नय. आमसा विशार होता का यो जागो आमाना दिलो ता तुमी आमशाखनी रेतीन. दोन घा खातीन. तुला काम करव्याहा लागव्या नय. आपुन एकत्र रेतीन. खरा का खोटा?”रामसंदर बोललो.

“माना शिकवू नाका. मी काय अनपढ नय. माह्या पंढरीला रस्त्यावर आण्याला बगीतान का? कुन नय पोरी माह्या पंढरीला देव्याहा. थोट्या पांगऱ्याला पोरी देतान. ना त्याला केव नय देव्याहा? माह्या पंढरीला एक काय पास-सहा पोरा होतीन. काय बोलतान तुमी.” पार्वती काकी रगीरगीही बोलली.

ते दोगा शिडला. वाल्यान सोताला शांत केला. तो बोललो, “ए बग काकी, आमाना एका साधून हांगीतला हाय का या जागीऱ्यावर धन गाटलेला हाय. इ खोपटी तोड. जो धन मिरेन तो वाटून घेऊ. सबन बाहा श्रीमंत होतीन. काय बोलता?”

पार्वती काकी दोगांसा उद्देश समजली. ती पण त्यांशी आय निगाली. ती बोलली, “नको रा दादा, तो धन. जवा माह्या पंढरीही आयपत होन तो पक्का घर बांधीन. तवा पाया घाल्याला जमीन खोदीतीन ना, त्या टायमाला धन मिरला ता आपुन वाटून घेऊ.”

“काकी तुला समजे केव नय. तो धन मिरला ता आपुन सबन सुखी होतीन.” रामसंदर थोडा शिडून बोललो.

“खये काय सुखी होतीन? तो धन आपल्या बापाया हाय का?”पार्वती काकीयो आवाज सडलो.”बिज्यानसा धन ना आपला क्याला मन? तो धन हतीन ता रेउंदे थयेस. या धनापायी पनवती लागता. आजार येतान. वेड लागता. व्यसन लागता. पाप हाय ते. ज्यान कुणी ते धन गाटून ठेविले हतीन, त्याही वासना हतीन त्यामनी. बिज्यानसा ते बिज्यानसा.”

“ तुला खोपटी तोडव्याही हाय का नय?”वाल्यान दम भरलो.

“नय तोडव्याही. काय करीन तू?”पार्वती काकीन पदर खोशीलो.

“मी माणसा आणून इ खोपटी पाडीन.” रामसंदर दम देत बोललो.

“ जा माणसा आण. मी खोपटी तोडून देव्याही नय. माहो आसरो काडव्याला बगीतान का तुमी.”

त्यांसो कैजो बग्याला लोक जमा झाला. त्यापायी दोगा तडशान निगून गेला. विठी पार्वती काकीखनी गेली. बोलली, “काडून दे ना धन. तुयापण फायदा होन.”

“कडसा गा धन आयला अटा? पक्का लबाड हात ए दोगा. माही खोपटी पाडव्याही. मंगे आमी वाटेवरती येतीन. याहीन मंगे या जागीरावरती हक करव्याहा. योस डाव हाय त्यांसा. बायकाहीन भरवीले हतीन ना त्यांशा बायकाना त्या बंडलेल्या तुक्या ना ती बंडलेली सखून भरविले हतीन.” पार्वती काकी स्पष्ट करीत बोलली.

“हये हाय का? मेली सोरस हात तुया भावल्याही पोरा.” विठी बोलली, “तवास मी विशार करता आपल्या पायाखाली धन हवून आपुन उपाशी तापाशी केव रेतान.”

विठी ना पार्वती काकी दोगी हाव्याला लागल्या.

(२८)

पार्वती काकीला निग्याला जाम वखत झालो. ती पयल्यांदास हुक्का मावरा घिऊन जंगलान गेलती. थोडासा बोठा बोंबील, निरला, मांदेरी, करदी ना होडा. यो मच्छीमारांसा धन घिऊन ती जंगलान गेलती

गावान ईस्टी सुरू होऊन मयनापण नय झाला. बऱ्यास कोळीणीनसो जंगलानसो हुक्क्या मावऱ्याहो धंदो सुरू झालो. जंगलान वस्ती लांबन लांबन. पार्वती काकी माथ्यावर पाटी घिऊन जंगलान फिऱ्याला पयला घाबरली. अटा कुन हाय आपला. दूरदूर पर्यंत वस्ती नय. माणसा नय. नुसता जंगल. एकटी बाई. सोरांसा जनावरांसा घाबरा. पण तिही भीती खोटी निगली. तडशी माणसा जाम सांगली होती ती ज्या ज्या खोपटीखनी गेली तया तया तिहा मावरा खपला. कुनी तिला पाणी दिला. कुनी दूध दिला. कुनी जेव्याला दिला. नांगल्याह्या रोट्या ना लाल मिरच्याही शेंगदाणा घालून सटनी. तिन डोऱ्यान ना नाकान पाणी येऊन येऊन ते खाला. दुपारशी एका खोपटीन थोडा आराम केला. पुरुष ना बाई माणसा बरी होती. पार्वती काकी बरबर ते प्रेमाही मायेही वागताहेत.

पाड्या पाड्यावर फिरून थोडासा मावरा रेला. तो खपव्याहा नादान तिही ईस्टी गेली. तटा दिहाला दोनूस ईस्ट्या. हकालशी येणारी ना तिस परत जाणारी. पार्वती काकी धास्तावली. आथा काय करव्याहा यो प्रश्न पडलो तिला.

आजूबाजूया शारपास बायकांशा ए लक्षान आयला.

"कोळीणबाय, ईस्टी सुकली का?"

“हा बाय. आथा घरा खये जाऊ? माही पोरा घरान ऐकटीस. मायो नवरो ना ती धास्तावतीन.” पार्वती काकी घाबऱ्या गुबऱ्या हौऊन बोलली.

“बाय तून लवकर निगल्या पायजे होता. सरकारजून जंगलान ईस्टी सुरू केली खरी पण दिहाला एखदास-हकालशी. तिस परत हांशी. आथा तुला उद्या हांशीस घरा जाता येतीन.” एक आदिवासी बाई बोलली.

“ हा ते पण ईस्टी आली तास. नाय ता खपला.” बिजी बाई हये बोलल्यावर पार्वती काकी अजून धास्तावली.

“चूप रेता का. त्या बिशाऱ्या एकट्या बाईला घाबरीतान क्याला?”त्या गावाही पाटलीण बोलली. मंगे ती पार्वती काकीखनी वरली, ”ए बग बाय. तू घाबरू नाका. माया घरा सल. वस्तीला रे. दोन घा खा. उद्या सावकाश जा.”

पार्वती काकीला धीर आयलो खरो, पण एकदम विश्वास बहलो नय.

“अगा क्याला घाबरता? तू बाई. थये मीपण बाई. माह्या घरान तुला क्याहीस कमी पडव्याही नय.” पाटलीण समजावीत बोलली.

“ पण माही पोरा. .” पार्वती काकीला सोतापेक्षा पोरांशी कारजी होती.

“ पोरांशी शिंता क्याला करता? तुया नवरा हाय ना. तो बगीन पोराखनी. देन जेवण करून.” पाटलीण परत समजावीत बोलली.

“पण, मी नय गेली ता ते धास्तावतीन.”

“आथा त्याला काय करव्याहा बाय? जवळपास हता ता बैलगाडीन बहडून रातोरात तुला घरा पोसून दिला हता. तुया गाव अवडा लांबन हाय का बैलगाडीला तटा पोशाला दोन दिह लागतीन. तू धास्ती करू नाका. देवावर भरोसा ठेव. सल माह्या घरा. आजसास दिह हाय. उरलेला मावरा विक ना नीग मंगे.”

पार्वती काकी पाटलीण बरबर सालव्या लागली.

तिया समोर डेवतीला सूर्यनारायण मावरलता. डोंगराया कडा काला पड्याला लागलता. जंगलान हांज पड्याला लागली. थंडो वाय हुटलो. रात किड्यांशी किरकिर सुरू होव्या लागली.

पाटलीण पार्वती काकीला जाम आतमनी झाडाझुडपान घिऊन गेली. तटा तिया घर होता. तिला घरान घितली. घर कश्श्या वीटा मातीया होता. वरती कौला होती. गोठा होता. पाटलीणीन पार्वती काकीला हातपाय धुव्याला पाणी दिला. टुवाल दिला.

"ताई घाबरव्याहा नय. आपलास घर समज याला." पाटील बोललो.

पार्वती काकी आयल्यामुळे घरानशी गोव माणसा बाहेर ओट्यावर बहलती. पार्वती काकीला खये तरीस वाटला. ती पाटलीणला बोलली' "माह्यापायी घरानशा पुरषाना बाहेर रेव्याहा लागला."

"अगा बाय थये काय नय. पावण्याहाठी आपली लोका वाटेन तो तरास काडतान. केव ता पावना देव हता. पुरषांसा काय, ते ता घराबाहेरस जास्त रेतान. बायकामनी त्यांसा काय काम आयला?"पाटलीण हांगीत होती.

चिमण्या बत्त्या ना कंदीला सुरू झाली. पुरुष बाहेर वार्ता करीत बहलता. बायका पार्वती काकीला धीर देत घरानशी कामा करीत होत्या. तिला घरशी आठवण येव्याला नको त्याहाठी तिया बरबर एक हारकी बडबड करीत होती. घरान दान-कांजी हिजत होता त्याहा जंगली वास घरान ना घराबाहेर पडत होता.

जेव्याहा टाईम झाला. पुरुष माणसाना बाहेर ओट्यावरती जेवण वाडला गेला. बायकांशाठी आतमनी जेवण वाडला गेला. घरानशा सबन बायकाबरबर पार्वती काकीपण जेव्याला बहली.

"बिनधास्त जेव. लाजू नाका. तुखनशीस घितलेल्या हुक्क्या करदीया कांजी केलाय. पाखट भुजीलाय. निरला भुजिल्यान. आज जेवण उरपीतीन सबन." पाटलीण बोलली.

पार्वती काकीला जेवण जात नय होता. घरशी आठवण येत होती.

"जेव बाय. पोरांशी शिंता करू नाका. ते जेवतीन. उद्या भेटतीन." पाटलीण पाठीवर हात ठेवून धीर देत बोलली.

सबनानशी दिव्याह्या उजेडान जेवणा सालू झाली. बाहेर पुरषांसा शेतीही, पिकापाण्याही वार्ता साललत्या. घरान बायका पार्वती काकीयो विषय घिऊन बहलत्या. मायेन सबनाहीन तिही अवडी का विशारपूस केली का तिला तो सोताहा घर वाटला. तिही सबन धास्ती दूर झाली. जेवताना तिला पंढरी ना संद्राही आठवण झालती.

बाहेर पुरुष लोका धान-कांजी, भुजलेला मावरा मांगीत होता. जेवणाला रूस आलती. ओट्यावरती पाटील बोलत होतो, "काय पण हांग आज जेवणाला वेगरीस सव हाय. कुनी बाई माणूस पावना आला का घरान सबन खये मस्त होता बग."

अवडा आयकून पार्वती काकीला धन्य झाला. पाटलीण पण बोलली, "खरास पार्वती बाय. सपनानपण विशार केला नय का अवडा मस्त जेवण होन ते. तू आयली ना घर कार्याहरका भरलेला वाटला आज."

सबनानशी जेवणा झाली. पार्वती काकी बासना वट्याला पुडा झाली. पाटलीणीन तिला अडविला."हल. तू पावणी हाय. तुला खये काय भांडी वट्याला देतीन. घरान पोऱ्या हात. ओवारा माणसा हात. वटीतीन ते."

पाटलीण पार्वती काकीला घिऊन पलगावरती बहली.

“बाय, पुरुष माणसा बाहेरुस नीजतीन का?”पार्वती काकीन विशारला.

“हा. ते बाहेरूस निजतान.”

“मी हाय बगून का?”पार्वती काकीला वाईट वाटला.

“ त्याहाठी नय. अटा हाय ना वाघ येता. बखऱ्या, मेंढ्या, गाय-म्हस घिऊन जाता. त्याला हाकल्याठी रोज राशी पुरुष माणसा बाहेर मसणावर निजतान. कुनी ता ओट्यावरती पण निजतान.”पाटलीण बोलली.

“घाबरा नय वाटे त्याना?”पार्वती काकी वाघाया नावाही घाबरली.

“वाघ माणसाना काईस करी नय. मेलो जनावरास घिऊन जाता. त्याहाठी देखरेख करव्याहा लागता. आथा आपुन निजू या.”

घरान निजव्याही तयारी सुरु झाली. पुरुष माणसा झाडावरशा मसणावरती जाऊन निजला. त्याहीन बोठबोठ्या काठ्या घेतीलत्या. दगडा घेतीलती. घरान बत्त्या बंद झाल्या. एक बारकीस चिमणी बत्ती सालू होती. मांदऱ्यावरती बायका पोऱ्यांशा पथाऱ्या पडल्या. बारकी पोरा ता वाघाया धास्तीही निजून गेलती. आयांना बिलगून निजलती ती.

पाटलीण पार्वती काकीला घिऊन पलंगावर निजली. राशी तिया डोरा लागला. राशी निजारीनस कवातरू वाघायो आवाज तिला आयक्याला आलतो. अगदी दारान वाघ येऊन गेलो. ती दमलती. बगून तिला जाम नीज लागलती. ती वाघाला बग्याला ऊठलीस नय. राशी पुरुष वाघाया मगाटी जाम दूरपर्यंत गेलता. हकाली पार्वती काकीला ते समजला.

(२९)

पार्वती काकी जाम आनंदान होती. तिही सबनान बोठी शिंता दूर झालती. पंढरीया लगीन होन का नय हये तिला झालता. पोरी बगीतली का कुन ना कुन जाऊन पोरीया घरा वाईट-साईट हांगून लगीन मोडीत होता. त्यामनी घरसा-दारसा पंढरीया लगीन होव्यास नय हये हांगीत होता. ज्योतिषाया बाप झालता ते. ती जाम शिंता करव्याही. पण सतगुरुन तिला हांगून दिलता. तुही नाता जाम बोठी होतीन. तुया नाव कमवितीन. बगून पंढरीया लगीन होन ए शंभर टक्के खरा होता. तिया सत्गुरूवरती विश्वास होता. तिया विश्वास खरा ठरला. पंढरीया लगीन ठरला. एका कोळीवाड्यानशी पोरी दिली त्याला. पोरी कारी सावरी होती पण साटसुटी होती. पोरीया घरा काहीजणाहीन जाम खोटानाटा हांगून लगीन मोडव्याहा प्रयत्न केला. पण पोरीया बाप आत्माराम देव माणूस. त्यान डोरा बंद करून आपली पोरी दिली. ती पार्वती काकीखनी सुखी होन याही त्याला पक्की जाणीव होती.

लगीनाहा दिह जवळ आला. पार्वती काकीला पंढरीया साधासुधा लगीन करव्याहा विशार होता. पण वाल्या, रामसंदर, सुकऱ्या याहीन मानला नय. घरानसा पयलास लगीन हाय. तो पण पोराया. माणसा आयली पायजेन. त्यांसा बरा पाहुणचार झाला पायजे. यो सबनानसा विशार. पार्वती काकी बोलली, "माखनी थाटान लगीन करव्याला पैशे नय मिरे."

" खये नय मिरे? तू अवडो जंगलांसो बाजार करता. त्याहा साऊर-पाणी ता भरलेला हतीन ना." वाल्या पार्वती काकीला बोलत होतो."दलाला खनशान थोडा कर्ज काड. हजार-पाचशे आमी देतीन. जेवणाला मावरा कुनीतरू देनस. आहेर जमेन ते फेड मिंगे."

"दादा, माना कर्ज करव्याहा नय मिरे." पार्वती काकीन नकार दिलो.

“ जास्ती कर्ज नय होव्याहा. आहेर जमेन त्याही फेडता येन. कर्जाशिवाय कार्य होतान का आजशा जमान्यान.” सुकऱ्यान वाल्याला साथ दिली.

“ पण आहेर तवडा जमे नय. खये काय कर्ज फेडव्याहा?” तिहा प्रश्न.

“नय आहेर जमला ता फेडू अस्ते अस्ते. पंढरीया लगीन वाटल्या पायजे. बेंडबाज्यो, मावरा, मटन, दारू. मज्या येन बग.” सुकऱ्या बोललो.

“आपली आयपत नय तवडी.” पार्वती काकी तयार नय होती.

“होन नीट. तू शिंता करू नाका. पयलास लगीन हाय. होऊन जाउंदे थाटान.” वाल्यान जोर धरलो.

“पण दादा पैशे कडसा आणव्याहा? पैशाहा होंग करता येत नय. जहे जमेन थये करीन.” पार्वती काकी मुस्कुट वाकडा करीत बोलली.

_ होऊन जाउंदे. कर्ज फेडू आपुन.” सुकऱ्या बोललो.

"कर्ज काडून कार्य करव्याहा? आपला काम नय. बोठ्या लोकांशी बोठी वार्ता.” पार्वती काकी नकार देत बोलली.

"काकी, तू शिंता करू नाका. आमी करू दारु ना मांडवाही सोय. तू तयार रे. कर्ज फिटेन. नको धास्ती.” वाल्या बोललो. त्या दोगांशा पुडा तिया कायूस सालला नय.

पार्वती काकीन अलाना कंपनीया व्यापाराखनशान दोन हजार रुपये कर्ज काडला. वाल्या ना रामसंदरजून पास-पासशे रूपये दिला. सुकऱ्यान पण त्याह्या जिम्यावर एक हजार रुपये कर्ज काडला. लगीनाही सबन तयारी झाली. मांडव हजला. केरी बांधली गेली. दारूया ना ताडीया डराम आयला. बाजूया तानाजीन दोन दाढामासा दिला. ते कापला जात होता. पंढरीला हरद लागत होती. त्याह्या ओब्या त्याला हरद लावीत होत्या. सुलीवर धान-कांजी-डाल- लापशी हिजत होती. पार्वती काकीला लगीनान दारू-बिरू देव्याहा आवडला नय. पण पुरषांशा पुडा ती गप रेली.

लगीनाठी पाटीसामान बाबून उधार दिला. पैशाबदल एक शब्दपण बोलला नय. तो पार्वती काकीला बोललो, ''पार्वती बाय, तूखनसा पैशे कटा जातान. आपल्यास पोराया लगीन हाय. पायजे तवडा सामान ने. उरला ता परत आणून दे. पन अन्नाही नासाडी करू नाका. घटला ता परत रांद. पण अन्न टाक्याला होन हये करू नाका.''

एक परका माणूस तोपण मुसलमान पार्वती काकीला अन्नाहा महत्त्व समजावून हांगीत होता. लगीनान मात्र बरीस नाटका झाली. प्रत्येक लगीनान नाटका होतानस. अजून हरद लागता ना अटा जेव्याला येस पायजे ना तेस पायजे, दारू मनाहरकी पायजे, एका गलासावर समाधान नय. धानकांजी जास्त झाला. कांज्यान तेल जास्त पडला. पण सत्गुरूया कृपेन पार्वती काकीन सबन सहन केला. लगीनान कमीजास्त होतास. दुनियान जा.

हरदीया दिह गेलो.

लगीन दुपारसा होता. पंढरीला हजविलता. पार्वती काकी, सुकऱ्या, संद्रा, वाल्या, रामसंदर, रूपा, कुसूम ए सबन हजलता. त्याहीन एक हरकी कपडी करीलती. लालभडक कूकू हरका नऊवारी लुगडा. पोलकापण थयेस लालभडक. नाकान नथ. गळयान मंगळसूत्र ना हावूही बोरमाळ. कानान डूल. माथ्यानशा आंबाड्यान मोगरा-आबोली यांशा फुलांसा गजरा. पायान पैंजन. कपारावर बोठा कूकू. पार्वती काकी, संद्रा ना तिही दोगी ओवा मांडवान उठून दिखत होत्या.

पंढरीन हुजरा कुडता-पायजमा घातीलता. डोख्यावरती गांधी टोपी. कपारावर मुंडावळी बांधिलती. हातान चाकू दिली. सुकऱ्या, वाल्या ना रामसंदर ए तिगा निळा कुडता ना सफेद परदाना घालून मांडवान नासत होता.

बेंडबाज्यो वाज्याला लागलो. वरात नासत देऊळान गेली. तटा नवरी ना नवरीया घरशी माणसा हजर होती. पंढरी नवरीया बाजूला पिड्यावर जाऊन बहलो.

सबनजीन खाली सतरंजी वरती बहला. बामणान मंत्र बोल्याला सुरवात केली.”मंगलम् भगवान विष्णू.. "

पार्वती काकी पंढरीया बाजूला बहलेल्या नवरीला बगीत होती. तिला ती ओव नय जाम बोठा काय तरू धन मिरल्या हरका वाटला. तिया नाव सुजाता होता. दोगांसा जोडा शोभत होता.

शुभ मंगलम् सावधान.. .”

अक्षता पडल्या. अंतरपाट दूर झाला. नवरा-नवरीन एकमेकना हार घातला. बेंडबाज्यो वाज्याला लागलो. अक्षता टाकिता टाकिता पार्वती काकीया डोऱ्यान पाणी आयला. घायघाय रड्याला लागली ती. तिया विश्वास जिंकला. सत्गुरूया शब्द जिंकला.

वरात घरा आयली. सबनानसा जेवण खावन झाला. वारना नय केला तरू पानसाट्या हरका तुक्या ना सखू लगीनान आलता. तेट्टावून जेवला. पिलीपण तवडीस. वाल्या ना रामसंदरजून तुक्याला लांबन ठेव्याहा प्रयत्न केला. मांडवान तो तमाशा घालीन याहा त्याना घाबरा होता. रूपा ना कुसूमपण सखूला दूर ठेवित होत्या.

परत नावर जाऊन आयली. हाऊहऱ्या घरा जावयाहा सांगलास पाहुणचार झाला. आथा रोजसास जीवन परत सुरू झाला.

पार्वती काकीला कर्ज फेडव्याही शिंता होती. पायजे तवडा आहीर पडला नय. पार्वती काकीन ज्याना भारी आहीर दिलता त्याहीन बारकी बारकी भांडी दिली. पितलीही इस्टीलशी टोपशी ना पेला. पैशे कमीस पडला. पार्वती काकीन बाबूही सबन उधारी भरली. तिला आहीर कवडा आयला याही परवा नय होती. पोराया लगीन झाला याहा तिला समाधान होता.

(३०)

पार्वती काकीला ओव बरी भेटली. पोरी हरकी. तिला ता हये वाट्याला लागला का माना दोन पोऱ्या हात. एक संद्रा ना बिजी सुजाता. ती पार्वती काकीला मावरा निवडून ते लाव्याला, हुकव्याला ना बाजारान विकव्याला मदत करव्याला लागली. कवाकवा दोगी जगलान हुक्का मावरा घेऊन जाव्या लागल्या. सुजाता पार्वती काकीला काम करून देव्याही नय. संद्रा ना ती दोगी घरानशी कामा कऱ्याला लागला. पार्वती काकी जंगलानशी आयली का सुजाता पायाला गोडातेल सोरून काशाहा पेल्याही ते सोरव्याही. तिला बरा वाट्याला. थकवा दूर होव्याहा.

पार्वती काकी उतारान बहून विशार करीत होती. ओव आयली. तिही बाजू मजबूत झाली. आथा संद्राया लगीन झाला का आपली बाजू अजून मजबूत होन. जावय येन. दोन नातापुता होतीन. घर भरेन. मंगे कुनाही हिंमत नय होव्याही बोलव्याही. हये ती विशार करीत होती. तवड्यान सुजाता आयली.”आया, सल ना. बोट काडले फिरव्याला.”

“तू जा बाय. मी नय येय. संद्राला घेऊन जा.” तिन नकार दिलो.

“ नाय, तुमाना येव्यास लागेन. आपुन कोलीण्या हात ना बोटीन फिरव्याहा अनुभव नय हये होव्याला नाका. सला तुमी.” सुजाता हट करव्याला लागली.

“अगा बाय, क्याला वठ्ठय करता? मी माया रामाया मुंडावर जाम बगीतले. बऱ्यासदा बोटीन फिरून आयले. आथा तुमसा दिह हात. तुमी जा.”

सुजाता संद्राला घेऊन गेली.

ना दोन यम पार्वती काकीया पुडान उबी रेला. त्याना बगीतास पार्वती काकीला त्याना गिरू का खाऊ हये झाला. ते दोगा बोटीन जाव्या होडून काकीखनी गेला. पिलेला होता ते.

“काकी तून काय विशार केला?” वाल्या बोललो. त्यान डोरा बाहेर काडिलता.

“काय विशार करव्याहा? इ माही खोपटी हाय. तुमाना देव्याही नय.” पार्वती काकी छाती ठोकून बोलली.

“आमाना तुही खोपटी नाका. बस थोडा दिह तुमी आमशा अटा रेया. अडसा धन काडला का परत खोपटी बांधून देवू आमी.” वाल्या समजावीत बोललो.

“जाम शाना हाय तू. माना काय वेडी समजले का? अटा धन कुन गाटून ठेव्या नय. खारटन जमीन हाय इ. सागराया पाणी येव्याहा अटा. हजारो वरीसा आदी आपला पुर्वज अटा रेत होता, त्याआदी अटा कुत्रापण रेत नय होता. साप ना अडुका रेव्याहा. ये आथा आपुन मावरा लाव्याला बगून अटा येऊन रेला. गेली शेकडो वर्स अटा कुनी आला नहतीन.” पार्वती काकी बोलली.

“ए बग काकी, आमाना शिकू नाका. आमाना बायावालीन हांगीतले. अटा धन गाटलेला हाय. आमाना तो धन पायजे मिंजे पायजे.” रामसंदरजून दम भरलो.

“हवून दे ना तो धन हाय ता. आपल्याला क्याला पायजे तो? बिज्यानसा धन वापरीला ता रोगराग होतान. दरिद्री होता माणूस. कवड्या तरू पिड्या वेडी होतान. रेवूंदे थयेस त्याला. तुमाना काय वाटता. तो धन काडून तुमाना मिरेन हये? विहरा सबन. शिपाय अटा हजर होतीन ना सबन धन घेऊन जातीन. तुमी अटा घडीघडी धनाठी येतान ए सबनाहीन बगीतले. कुनीतरू शिपायाना चुगली लाविलीय. शिपाय अटा आलता. ते तुमसा विशारीत होता. आथा इ खोपटी काडली ता कुनीतरू शिपायाना जाऊन हांगतीन. ना मिंगे तुमाना बेड्या पडतीन. धन ता मिरव्यास नय. तुरूगान जाव्याला लागेन. धन हाय ता रेवूंदे. जवा आपुन अटा घर बांदू ना तवा काडू ते गुपशूप.”

शिपायांसा नाव आईकितास दोगा टरकला. ते पाय आपटीत तडशान निगून गेला. पार्वती काकीही हुशारी सालली तटा.

(३१)

पंढरी धावत धावत खोपटीया पुडान आयलो. पार्वती काकी ना सुजाता उतारान बहलत्या.

“आया, सल बोट फिरव्याला काडले.” पंढरी बोललो.

“ मी नय येय.” पार्वती काकी बोलली.”सुजाताला घेऊन जा. संद्राला पोर हांगून आलाय. तडशी माणसा येव्या हात.”

“ आया, मंगे मी पण येता तुमाना मदत करव्याला.” सुजाता बोलली.

“ नय गो बाय. तू जा. तुया फिरव्याहा दिह हात. फिरून घे. एकदा संसार सालू झाला का मंगे काय गा फिरव्याला मिरता.” पार्वती काकी बोलली.

“पण आया…. .” सुजाताही पार्वती काकीला टाकून जाव्याही इच्छा नय होती.

“पणबिन काय नय. तू जा.”

सुजाताया नाईलाज झाला. ती पंढरी बरबर बंदरावर गेली. पाणी बुडत होता. सुजाता, पंढरी ना बिजी माणसा बारक्या होडीन बहून बोटीपर्यंत गेली. सबनजीन बोटीन सडला. सुजाता डेकवरती बायका बहलत्या त्यामनी जाऊन बहली. पढरीन बोठी खाटी घेऊन बोट पाण्यान घेतली. सुकऱ्या न पाग होडली. वाल्यान घेर टाकिलो. बोट उधानाया पाणी कापीत दर्यान निगाली.

वाय बरास होता. मोजा बोटीवर येऊन आपटून जात होता. त्यापायी पाणी बोटीन उडत होता. पाणी डेकपर्यंत उडून भिजव्याला होत होता. बोटीया समोरशान डोंगरा अवडा मोजा आयला का बोट नालीखनशान उबी रेव्याही. हये वाटव्या का आथा मोजा बोटीवर येऊन बोटीला बुडवितीन. पण थये होव्यास नय. बोट मोज्या वरती स्वार होऊन पुडा निगून जाव्याही. मोजा मगाटी गेला का बोट धापदिशी खाली आपटीत रेव्याही. हये वाटव्या का बोट जमिनीला लागले.

पंढरी नालीखनी उबी रेऊन समोरसा येणारा मोजा बगीत रेलता. बायका, पोरा, पोऱ्या समुदराया मौजाया मजा बगीत होता. बारक्या बारक्या पोराहीन दर्यान उडी टाकिली. बोटीया दोनी बाजूला बोठबोठ्या मोज्यान ते पोह्याला लागला. कोळ्यांशी पोरा ती. दर्याला काय घाबरतान!

सुजाता कंबरीवर हात ठेवून उबी रेलेल्या पंढरीखनी बगीत होती. तो निडर कोळी तिला खराखुरा 'दर्याहा' राजा वाटत होता. पण पंढरीया लक्ष तिखनी नय होता. त्याहा मनान निरालास विशार सालू होता. तो दर्याला डोरा भरून बगीत होता. त्याला एक हरका हये वाटत होता का माना परत यो दर्या बग्याला मिरता का नय? या दर्याया आंगा-खांद्यावर परत खेळव्याला मिरता का नय? माया पिढ्यान पिढ्या दर्यान खपल्या. दर्यावरती त्याहीन राज्य केला. थये माना करता येन का नय ?

हजिका विशार केव येतान येस त्याला समजत नय होता. पण दर्याहा ना आपला जन्मोजन्मीहा संबंध हाय ए तो जाणून होता. मागशा कोणत्या तरू जन्मान आपुन बोठ्या आगबोटीवर कामाला होता. जुन्या जमानांशा बोटीवर तांडेल होता. त्यान आपल्या हाताही बोटीही शिड बांधीलती. आपल्यास हाताही चाच्यांशा बोटीवर तोफ डागीलती. मागशा बऱ्यास जन्मान बोट बुडून, बोट पेटून, बोटीवर हल्ला होऊन आपुन मेलता, हये त्याला दर्याखनी बगून वाटत होता. बोटीवरती आपटत हलेल्या मोजाना पंढरी एकहरका बगीत होता. समोरसा चौफेर सागर मोजा

उबी करून बोटीया स्वागत करीत होता. वरती निला आकाश हुजऱ्या ढगाना वाहून आणताना खाली समुदरान काला ठिपका तयार होत होता.

“ए तो बग देवमासा.” कुनीतरू त्या काल्या ठिपक्याखनी बोट दाखवीत बोलला. सबनानसा लक्ष तटा गेला.

"काय नय तू. तो ढगाया हायेड हाय. देवमासा नय. कवडी घाबरली मी.” एक बाई शिडून बोलली. सबनाहीन दात काडला.

बोट मोजा कापीत पुडा जात होती. पोरा बोटीया पागीला धरून पाण्यान पोहत होती. कवा ते मोज्याहा खाली जाव्या. कवा मोज्यावर स्वार होव्या. त्यांशी कसरत बोटीनशी माणसा बगीत होती.

बोट किनाऱ्या पासून लांबन गेली. किनारा काल्या पट्टीहरका दिख्याला लागला. आथा बोटीया आठी कोपऱ्याला पाणी होता. दूर दर्यान दोन-तीन बोटीया काला ठिपका दिखत होता. तिसरी बत्ती पार करून बोट अजून पुडा गेली. आथा बोट वरती-खालती, मगाटी-पुडा डुल्याला लागली. वरती-खालती होव्याला लागली. चेंडू जहे उडता थये ती पाण्यावर वरती उडून परत आपट्याला लागली. बोट उडली का बोटीनशी बायका पोरा बोठबोठ्यान बरकव्याहा. आंगावर खारट पाणी उडला का एक वेगळास आनंद वाटव्याहा. अदीन-मदीन बारका बारका मावरा उडताना दिखत होता.

(३२)

पार्वती काकिया डोख्याला जामस संताप झालतो. व्यापापायी ती दोन दिह जेवलीस नय. खोपटीया जागीराठी भावल्याही पोरा मगाटी लागलती. त्यावरशान जाम कैजो झालो. भावल्याहा पोराहीन-वाल्या ना रामसंदरजून पार्वती काकीला मारलीपण. पंढरीलापण मारलो. नातीगोती पैसा ना इष्टकी पुडा मेल्याहरकी झाली. यो आथाया नय, रामायण-महाभारत काळापासून, त्या आधीपासूनस माणूसकीला नात्याला लागलेला डाग हाय. देवपण ते दूर करू शकला नय. पार्वती काकीला ए माईत होता. जोपर्यंत माणूस या धरणीवरती हाय तोंगनी हयेस सालेन. देव येवो नाय ता देवाया बाप येवो यो स्वार्थ माणसाया शेवटपर्यंत सालतस रेन.

पार्वती काकीन जिद्द होडली नय. तिन मार खालो. पण भावल्यांशा पोराना खोपटी नय दिली. तिला एक पोर होतो. त्याहा लगीन झालता. उद्या नातापुता होतीन. कटा रेतीन. यो विशार तिला होतो. तिया भावल्याही पोरा काय मेली धनाठी आंदरी झालती. या मगाटी तुक्या ना सखू हाय ए पण तिला माईत होता.

त्या टायमाला लोकाहीन तमाशा बगीतला. होड्याला कुनी आयला नय. खये येतीन? खरपाशांशा नादी कुन लागता! कुन जाता व्याप करव्याला! पण सबन हेजोरशी माणसा पार्वती काकिया बाजूला होती. त्याहीन पार्वती काकीला धीर दिलो.

भांडणापायी पार्वती काकीन पंढरीला बोटीनसो काडलो. पंढरी आथा परशाया बोटीन जाव्याला लागलो. परशा जाम बरा माणूस होतो. तरूपण पार्वती

काकीला धास्ती होती ती पंढरीया खये होन? उद्या दोन दुवापुता झाली ता खये पोटा भरीन तो त्यांशी?

तिय बिजा मन हांगीत होता कुत्र्या मांजरांसा संसार होतान. माया पोराया होन नय का? देव हाय. तो देन यश. त्यान जन्माला घातले. त्याला धास्ती.

पंढरीहो बोटीनसो भाग बंद झालो इ गोष्ट कुनालास पटली नय. कायद्यान त्याहोपण बोटीन हिस्सो होतो. सुकऱ्या बिशारो काय बोलेन त्याहा कायदा सालता त्या भावांशा पोरापुडा. कष्णामामाला जाम संताप झालतो. त्यान पंढरीला दूर नेव्याहो विशार केलो. पंढरीठी तो उंबयमनी नोकरी बग्याला लागलो. त्यांशास नात्यानसो तामोरे मनून एक माणूस उंबयला कामाला होतो. पंढरीया कामाठी कष्नान तामोरेला हांगून बगीतला. काही दिवसान तामोरेन निरोप धाडून दिलो. पंढरीला नोकरी लागली. तीपण रेल्वेमनी.

पण नोकरीठी त्याला उंबयलास रेव्याहा लागणार होता. रोजसा ये -जा करव्याहा त्याला जमणार नय होता. बगून त्यान उंबयला कष्ना मामाखनी रेव्याहा हये कष्ना मामान सुचवीला.

पंढरीला उंबयला पाठव्याहा विशाराही पार्वती काकीया पोटान फार पडलो. पण अटा व्यापान ठेवून त्याही जिंदगी बरबाद करव्याहा तिला पटव्या हरका नय होता. ती पंढरीला उंबयला पाठव्याला तयार झाली.

आयसा मन कुडकुडत होता. पण पोराया कल्याणाठी त्याग करव्याही तयारीपण होती. पंढरीलापण पार्वती काकीला होडून जाव्याला जीवावर आलता. तो ता तयारूस नय होता. तो जाम रडलो.

“आया, मी नय जाय. तुया आधार हाय मी. मी तुला होडून खये जान?”तो रडत रडत बोललो.

“नय दादा, तुला गेल्यास पायजे. तुला नोकरी मिरली ये भला समज. नाय ता आपल्या लोखाना नोकरी रेल्वेन कुन देतान रा?” पार्वती काकी समजावीत बोलली.

“ मी नय नोकरी करी. मी बोटीन जात जान. माना अटा तुयाखनीस रेव्या हाय.” पंढरी तयार होत नय होतो.

“नय दादा तू जा.” पार्वती काकीनपण जिद्द केली.

“पण आया, मी गेलो का ते तुला सतावितीन. हालहाल करतीन तुया.” पंढरीला पार्वती काकीही कारजी होती.

“माया जोडीला देव हाय ना. तो बगीन माना. सत्गुरूही कृपा हाय.” पार्वती काकी बोलली.

“ देव हतो ता तुया हये हाल नय होता.” पंढरी शिडून बोललो.

“हये काय बोलू नाका. जा तू बापा.” पार्वती काकीला बोलण्याला जड झालता.

“आया, तून माही शेवा-साकरी केली. मी आथा नोकरीठी बाहेर गावा गेलो ता तुया फायदा काय? तू हयेस रेन का?” पंढरी डोऱ्यांनसा पाणी फुहित बोललो.

“ ते माया काम होता. मीन केला. तून सुखी रेव्याहा अवडीस माही इच्छा हाय.”

“तुला टाकून जाऊन मी खये सुखी रेन? रामाला आयबापाना टाकून जाव्या लागला. रेला का सुखी?” पंढरी जाव्याठी तयार नय होतो.

“बापा देवान ना आपल्यान फरक हाय.” पार्वती काकी बोलली.

“काय फरक नय. तेपण आपल्या हरकास होता. त्याहीन जी बरी-वाईट कर्म केली ते बगून आपुन सुधारव्या हता. पुंडलिकान आयबापांशी शेवा केली. देवाया चरणाखाली सुखान हाय तो सरावन बाळान आयबापांशी शेवा केली. थयेस मी पण तुही शेवासाकरी करीत रेन.” पंढरी आयक्याला तयार नय होता.

“पंढरी, वठ्ठय करू नाका. जा तू. माही शपथ हाय तुला. तू नोकरीला गेलो नय ता मी कवास तुही बोलव्याही नय.” पार्वती काकीन दम दिलो.

पंढरी गप रेलो. काय बोलेन बिशारो तो शिडलो.

“तू हांगता ता जाता मी.” पंढरी जाम रडलो.

शातीवरती दगड ठेवून तो उंबयला जायाला तयार झालो. सविताला पण तयार केली. दोगा गेला उंबयला. पार्वती काकी चुपचाप बगीत रेली.

(३३)

संद्राला वर हांगून आलता. मास्तर होतो तो. उसो टांगो होतो. तिला बग्याला माणसा आयली. संद्रा जाम घाबरली. ती विठीया खोपटीन जाऊन दपली.

“ बाय, हये काय करता? घरा जा.” विठी संद्राला बोलली.

“नय मावशे, माना जाव्या नय मिरे. लगीनस करव्याहा नय मिरे.” संद्रा घाबरत घाबरत बोलली.

“जाता का नय. माणसा आयलेन घरान. ते काय विशार करतीन? पोरी वेडी हाय का काय हये वाटेन त्याना. पार्वतीया नाक कापेन. सल घरा.” विठी तिला समजावीत हात धरून खेशीत बोलली.

“ नय माना घाबरा वाटता पोरांसा.” संद्रा हात होडीत बोलली.

“ क्याहा घाबरा वाटता? गावानशा पोराना गारे देता तवा घाबरा नय वाटे ना आथास केव घाबरा वाट्याला लागला? सल टाईम होता.”

“ नय माना लगीनस करव्याहा नय मिरे.” संद्रा आयक्याला तयार नय. तया विठीयो नवरो आयलो.

“ संद्रा सलता का नय? नाय ता आथा उसलून नेता तुला.” त्यान दम दिलो.

संद्रा घाबरली. ती विठी बरबर घरा गेली. तयारी करून तिला बग्याला आयलेल्या माणसांशा पुडान उबी रेली. थरथर कापीत होती ती. सवितान तिला धीर दिलो.

संद्रान थरथरत्या हाताही पावन्याना शायपाणी वाडला. शेव वाडली.

पोराया बापान विशारला, ”नाव काय तुहा?”

“संद्रा सुकऱ्या तामोरे" संद्रान उत्तर दिला.

“कवडी शिकले पुडसा?”प्रश्न.

“सहावी.” तिन मान खाली घालून उत्तर दिला.

“स्वयपाक बनविता येतान का?”

“ हा" हलू आवाजान मान हालवून ती बोलली.

"मावरा लाविता येतान ना?”

“हा येतान.”

पोराया बापाला समाधान झाला. तो पार्वती काकीला बोललो, ”पोरी आमाना पसंत हाय. बामणाखनी पत्रिका बगून मंगे कळवू आमी.”

ए आयकून पार्वती काकी धास्तावली.

माणसा निगून गेली. संद्राला जीवान जीव आयलो.

“मी नय लगीन करव्याही. माना पुरषांसो ओहोटो नाका.” संद्रा हट्टाहट्टाही बोलली.

“नय बाय. हये नय बोलव्याहा. प्रत्येक पोरीला एक दिह लगीन करून हावू घरा जाव्या लागता. रीतस हाय ती जगाही.” पार्वती काकी तिला समजावीत बोलली.

“ मी हावू घरा जाव्या नय. मी अटास रेन.”

संद्राया हट्टापायी पार्वती काकीला परत व्याप झालो. पोराया व्यापाशान निगे नय ता यो पोरीयो व्याप लागलो.

“ देवा सत्गुरू राया, तूस बग आथा. आयबाप होव्या मिंजे काट्याकुट्याशान सालव्या हरका हाय.”

तिन देवावर भार होडलो. देव करीन तेस खरा. आपल्या हातान काय नय. हाडा माहाहो देह. शिंता करून क्याला खराब करव्याहा? जे होन ते क्रिष्णार्पन.”

काही दिवसान निरोप आयलो.

“पोरीला मंगल हाय. यो लगीन झाला ता नवरा मरेन. पत्रिका जुळे नय. त्यापायी आमसा उत्तर नाय हाय.”

संद्राला बरा वाटला. तिया मनाहरका झाला. पण पार्वती काकीयो व्याप वाडलो.

“ खये होव्याहा या पोरीया? ए देवा सत्गुरू राया, लक्ष ठेव रे. मंगल लागलो पोराया मगाटी.”

थोडा दिह गेला. झाला गेला सबन विहरला. पंढरी उंबयला गेलो. जोडीला सविता गेली. संद्रा पार्वती काकीला मावऱ्याहा धंद्यान मदत करीत होती. सुकऱ्या अदीन -मदीन खाडीन जात होतो. सबन खये जाग्यावर होता.

ना एक दिह अचानक सुकऱ्या शीक पडलो. हट्टोकट्टो होतो. कामधंदा करीत होतो. दर्यान खप्याला जात होतो. पार्वती काकीला संसारान मदत करीत होतो. तो एकदम शीक पडलो. खाटली धरली त्यान. पार्वती काकीन बरास औषधपाणी केला पण त्याला बरा वाटला नय. वाल्यान सुकऱ्याला सोताया घरा नेलो. त्यानपण

औषधपाणी केला. पण सुकऱ्या जगलो नय. पार्वती काकी जाम रडली. शाती कुटून कुटून रडली.

"माया रामा रे. तू क्याला होडून साललो माना? मी आथा काय करू? कुनाया तोंडाखनी बगू?" पार्वती काकी सुकऱ्याहा मस्तकाखनी बहून रडत होती. संद्रा, वाल्या, रामसंदर, रूपा, कुसूम ए सबन रडव्याला लागलता. वाल्यान उंबयला सुकऱ्या शीक पडल्याहो निरोप धाडिलतो. पंढरी, सविता, कष्णा ए तिगा उंबयशान आयला. लोका जमा झाली.

पार्वती काकीया घरान दुख झालता ना बाहेर तुक्या कुले काड्याला लागलो."बगीतला डोखरो मेलो."

मैताला आयलेल्या एकाला तुक्याहा हजिका बोलना सहन झाला नय. तो पटकन तुक्याला बोललो, "हा दादा, आथा आपली पाळी. सुकऱ्यान बरास आयुष्य काडला. आपुन तवडा तरू रेतीन का नय माईत नय."

त्याहा बोलना तुक्याला झुंबला. तो गप रेलो.

प्रेत मशानान नेव्याही तयारी झाली. तिघा बाहाईन केस दिला. सुकऱ्याही तक्ती तुकली गेली. थोड्या दूरपर्यंत बायका प्रेताबरबर गेल्या. मंगे मगाटी फिरल्या. प्रेत समुदरावरती नेला गेला. त्याला समुदराया पाण्याही हिंपला. तटास किनाऱ्यावरती शिता रसली गेली. पंढरी, वाल्या, रामसंदर ना कुटुंबदाराहीन प्रेताला शिताभोवती सात फेऱ्या मारविल्या. प्रेत शितावरती ठेविला. त्यावर बिजी लाकडा रसली गेली.

दोन माणसा शिताया उगवती-मावरतीला उबी रेला. एकाया हातीन बारकी कुराड होती. पंढरी हुक्क्या हावल्यावरती पेटता निखारा घिऊन शिताभोवती फिरव्याला लागलो. वाल्या, रामसंदर, बिजा कुटुंबदार एकमेकांशा खांद्यावर हात

देऊन प्रेताला प्रदिक्षणा घाल्याला लागला. प्रत्येक प्रदिक्षणाला कुराड प्रेतावरशान फिरविली जात होती. सात फेरी झाली ना प्रेताला अग्नी दिला गेला.

सबनाहीन शिताला हात जोडला. शिता भकभक करीत पेट्याला लागली. पंढरी, वाल्या, रामसंदर थोडा दूर उबी रेला. लोका त्यांसा हात हातान घिऊन निरोप घेत जात होता. सबन गेला. शेवटी तिगा ना प्रेतावरशी तिगा-शारजीन रेला. तिगा बहाहीन शेवटसा शिताला हात जोडला. ते पण घरशा वाटीला लागला.

मशानान अमोशाला दसपिंड पडलो. अकरावो-बारावो दिह पार पडलो. देवळान जाऊन हुतक होडला ना लोक आपापल्या मार्गाला लागला. पार्वती काकीया जाम बोठा नुकसान झाला. तिहो नवरो मेलो. दिहपाण्याला खर्च झाला. होता तवडा पैसा खपला.

तिया कपारावरसा कूकू फुहला. तिया चेहऱ्यावरसा तेज गेला. गाठी-सोरी बिगर ती खये तरीस दिखत होती. पण तिन सोताला सावरीला. परत काम धंद्याला लागली. तिन मावऱ्याहो भाग हुकव्याला घितलो. संद्रा तिला मदत करीत होती. विठी, शोभा यापण एकमेकांना मावरा निवड्याला ना मावरा हुकव्याला मदत करीत होत्या. पार्वती काकीला पंढरीयो विशार नय होतो. तिला आथा संद्राया लगीनाया विशार पड्याला लागलो. 'बायला मंगल हाय! खये होव्या? पोरी आयुष्यभर बिन लगीनाहीस रेव्याही का? 'यो विशार तिला निजून देत नय होतो.

(३४)

दुपारसा वखत होता. संद्रा बंदरावर वनारीवरसा हुक्का बोंबील काड्याला गेलती. घरान पार्वती काकी एकटीस होती. तिही घरानशी सटरफटर कामा सालू होती. तवड्यान तिला खोपटीया बाहेर कायतरू गडबडी हरका वाटला. ती पटकन बाहेर आयली. समोर बगीता ता तुक्या घाबऱ्या घाबऱ्या तिया पुडान उबी रेलो.

"काय रा तुक्या? काय झाला?" तिन विशारला.

"बाय माना दपव. शिपाय माना बेड्या घाल्याला आयलेन." तुक्या घाबऱ्या घाबऱ्या हांगीत होतो.

"केव रा दादा? काय केला तून?"तीपण घाबरली.

"काय नय गा. ताडीया पट्ट्यावर जानू बरबर मारामारी झाली. तो माया बायकूला बरा-वाईट बोल्याला लागलो. मीन रगीही त्याहा डोखा आपटून दिला. त्यापायी शिपाय माना धऱ्याला आयलेन."

" दादा, मी काय करीन? कटा दपवीन तुला?"

"कटापण दपव. शिपाय माना मारतीन गा." तुक्या रड्याला उडी पडलो. पार्वती काकीला त्याहा रडना बगवला नय. तिन त्याला खोपटीन नेलो. खोपटीन बोठो पिप होतो. त्यामनी तुक्याला दपविलो. वरती ढाकन ठेवून त्यावर मावऱ्याहा टोपला ठेविला ना ती बाहेर येऊन कामाला लागली.

तिया मनान कालवाकालव सालू होती.”शिपाय आला ता काय करव्याहा? त्याना काय जबाब देव्याहा? त्याहीन खोपटीन तपाशिलो मंगे मी काय करू? हे सत्गुरू राया, तूस काय तरू मार्ग काड रा.”

अवड्यान खरोखर शिपाय तिया पुडान येऊन उबी रेला.

“ए बाय, तुक्याला बगीतले का?”शिपायाहीन विशारला.

“ नय दादांदो.” तिन पाना पालटीली.

“ नय खये? त्याला अटास येताना आमी बगीतला. त्या बाजूया एकान तुला तुक्या बरबर बोलताना बगीतले. हांग कटा हाय तो?” शिपाय डरकून बोलला. पार्वती काकी घाबरली.

"नय ना दादा. माना माईत नय.” ती जहे थये बोलली.

शिपाय तिया खोपटीन घुसला. तुक्यान पिपान हालवशीलव केली. त्यापायी शिपायाना तो हापडलो. शिपायाहीन तुक्याला बेड्या घातल्या. मारीत मारीत नेलो.

“ए बाय, तू पण सल. सोराला घरान लपविला तून. सोराही भागीदार. सल तूपण.”

पार्वती काकी थरथर काप्याला लागली. शिपायाहीन तिलापण नेली. विठी, शोभा, पार्वती काकीया खोपटीखनी गेल्या.

“ आथा गा ?” विठीन विशारला.

“काय तरू केल्यास पायजे. बिशारी, तुक्यापायी फसली.” शोभा.

“तिनपण क्याला मदत करव्याही? मेलो खरपाशी हाय. माईत हाय ना तिला. कवडा तरास दिलो दोगा नवरा-बायकोन. त्यालास मदत केली. फसली ना आथा.” विठी शिडून बोलली.

“ हा आपुन एक करू या. सबन बायका मिरून जाऊ. तुक्यान पार्वतीला दमदाटी केली हये हांगू शिपायाना. होडतीन तिला.”विठीन सुचविला.

तवड्यान कष्णा आयलो.

“ बरा झाला तू आयलो दादा.” विठी घाईघाईन बोलली.

“काय झाला?”कष्णा थोडा धास्तावलो.

“पार्वतीला शिपाय घिऊन गेला. सल तिला होडव्याला.” शोभा बोलली ना साल मांडली.

“ माया भनला नेली.” कष्णा संतापलो.

“तू आयलो. तिला होडतीन आथा. सत्याग्रहीही भन हाय ती. तू ब्रिटिश शिपायाना नय घाबरला ता याना काय घाबरेन? सल पटकन पाय सालव.”

तिगा सपसप पाय टाकीत निगाला. टांगा करून पोलीस सौकीला पोसला. तटा पार्वती काकी थरथर कपीत उबी होती. या तिगाना बगून, कष्णाला बगून तिला धीर आयलो.

कष्णा धोतर सावरीत शिपायांशा पुडा उबी रेलो.

“सायेब माया भन ला पार्वतीला केव आणला अटा?”कष्णाया आवाजान जोर होतो.

“या बाईन तुक्याला घरान दपून ठेविलतो.” शिपाय बोलला.

“खोटा हाय ते सायेब. त्यान तिला दमदाटी केली. दपिलो नय ता कापून टाकिन हये दम दिलो. बिशारी काय करीन घाबरी हाय ती.” विठी पटपट बोलली.

कष्णान शिपायाना सोताही ओरख करून दिली. शिपायान तिगांसा बोलना आयकून घितला. पार्वती काकीखनी बगीतला. ए तिगा खरा बोलतान ना पार्वती काकी एकदम साधी बाई हाय ए शिपाय समजून गेला. त्याहीन पार्वती काकीला होडून दिला.

बाहेर पडल्यावर पार्वती काकी बारक्या पोरा हरकी रड्याला लागली.

“रडू नाका. तून काय वाईट केला नय ता रडव्या क्याठी? सत्य कवास मरे नय.” विठी तिया डोरा फुहित बोलली.

तिगाहीन तिला धीर देऊन घरा नेला.

“आथा तू कष्णा दादा बरबर वार्ता कर. बिजा काय विशार करू नाका.” विठी समजावीत बोलली.

“दादाठी पावशेर आण्याही होती.” पार्वती काकी बोलली.

“ मी आणून देता.” विठीन पार्वती काकीखनशान पैशे घितला. गलास घितलो. शोभा बरबर बाहेर पडली.

“दादा, खये येना केला? अगदी टायमावर कृष्णाहरको आयलो तू. नाव सार्थक केला.”पार्वती काकीन विशारला.

“बाय मावरा घेव्याठी आयले. तुखनसास घेता. उंबयला ता मावरा मिरता पण अडसा बरा लागता. माहो एक मित्र होतो उंबयसो. आमशी जाम दोस्ती. बऱ्यास वर्षापूर्वी आपली ती 'रामदास’बोट गटारी अमोशाला बुडलती मायते का?”

“हा आईकिले खरा.”

“त्यामनी माहो मित्रतपण बुडलो. पत्ता लागलास नय त्याहा. त्याही बायका-पोरा अलिबागला रेताहेत. अवड्या वर्षान त्याहो एक पोर उंबयला भेटलो माना. त्यान माना ओरखिलो. माया फोटू हाय त्यांशा घरा. तवा माना मित्राही आठवण झाली. मीन त्याला घरा नेलो. जेवडीलो. एकदा मी पण त्याहा घरा जाऊन आयलो. विशार केला त्याना मावरा भेट देता. उंबयसा मावरा पटकन खपता. त्याहाठी मी अटा आयलो.”कष्णा बोललो.

“मंगे ने पायजे तवडा.” पार्वती काकी बोलली.

“फुकट नय. पैशावर घेन मावरा मी.”

“बाहा खनसा पैशे खये घेव्याहा?” ती बोलली.

“घे बाय. तुया संसार हाय.”

“ बरा. आथा मी कोंबडो कापिता. जेऊन खाऊन सावकाश जा.”

ती जेवण बनव्याला लागली.

(३५)

हा ना करता संद्राया लगीन ठरला. कोळीवाड्यान आथास मच्छीमारांशी सहकारी सोसायटी स्थापन झालती. त्याहा शेरमन रामदासजून संद्राला मागणी घातली. रामदास शिकलेलो जुवान पोर. गोरोपान. उसो. हसमुख. शिडलो का कुणायो नय. सांगल्या विशारायो.

खरा मिंजे रामदासला संद्रा बारक्यापणापासून आवडत होती. तो संद्रा वर जीव टाक्याहो. पण पयला पयला त्याही हिंमत होत नय होती. मिंगे त्यान हिंमत करून मागणी घातली. सोसायटीयास माणूस त्यान पार्वती काकीखनी धाडिलतो. पार्वती काकीन त्याला स्पष्ट हांगितला, "ए बग दादा, पोरीला मंगल हाय. बामण हांगता तिया लगीन झाला ता नवरा मरेन. स्पष्ट हांगितलेला बरा. नय का?"

रामदासजून धाडलेलो भगवान दादो बोललो, "बाय, पोराला सबन मायते तुमशी इष्टोरी. पोर हांगता मंगल मिंजे पवित्र. पोरीला मंगल हाय मिंजे तिया ग्रह पवित्रस हाय. त्यान कुन तो ब्रह्मानंद स्वामीला गुरू केलाय. त्या गुरूलास त्यान तुमशा संद्राबदल विशारीलता. गुरून त्याला बिनधास्त लगीन कऱ्याला हांगीतला. पोर सांगलो हाय. नय हांगू नाका."

"पण दादा, पोराया घरशी माणसा?"तिन विशारला.

"पोराया घरशी माणसापण बरी हात. त्याहीनपण ब्रह्मानंद स्वामीला गुरू केलाय. त्याया शिकवणीन हात ती माणसा." आयलेलो भगवान दादो समजून हांगीत होतो. पार्वती काकीला बरा वाटला. तिया डोऱ्यापुडा ब्रह्मानंद स्वामी उबी रेला.

"ठीक हाय. मी तयार हाय. आपुन एक दिह बहून बोलणी करु. मी पंढरीला ना कष्णाला बोलवून घेता."

आयलेलो माणूस पावशेरसा गलास खपवून गेलो.

पार्वती काकीन संद्राखनी बगीतला."पोरी तू तयार हाय ना! "

संद्रान हा हांगीतला.

पार्वती काकीया मनावरसा भार कमी झाला. ती मनामनान बोलली, "हे सत्गुरू राया, तुही कृपा बोठी हाय. पोरीही माना शिंता होती. आज तून ती दूर केली. पोर बरा मिरला. पोरीपण तयार झाली. आथा माना समजला. माया कुटुंबावर तुही कृपा हाय. तूस माहा कुटुंबाला सांभाळीत हाय. माना आथा शिंता करव्याही गरज नय."

पार्वती काकीन हात जोडला.

तिला रेवून रेवून धास्ती करीत होती. संद्राला मागणी आयली खरी. पण कुनी खो घातलो मिंगे? जो तो माया वाईटस बगीता. पंढरीया लगीनाया टायमाला कवडी नाटका केली दुश्मिनाहीन. संद्राला मंगल हाय बगून डोरफुट्याना कवडा बरा वाटला! ब्रह्मानंद स्वामीही कृपा बगून रामदास संद्रा बरबर लगीन कऱ्याला तयार झालो. बस! स्वामी वरती तिन भार ठेविलो. बोलनिया पोराघरशी सबन माणसा आलती. पार्वती काकीन परत एकदा त्याना हांगीतला.

"तुमी नीट विशार करा. पोरीला मंगल हाय. पोराला काय झाला बिला मिंगे?"पुडा ती गप झाली.

तवा रामदासशी आय पटकन बोलली, "बामण काय हांगव्याहा काम करतान. पत्रिका जहे दिखता थये ते हांगतान. बामण बोठा का सत्गुरू बोठा?"

तिया या प्रश्नावर पार्वती काकीला बरा वाटला.

रामदाससो बापू तवा पटकन बोललो, ”ए बग बाय. नशिबान जे हयेन ते होन. ते कुन टाळू शके नय. हा पण सत्गुरू ही कृपा हतीन ता वाईटाया सांगला होऊ शकता. ए मंगल-बिंगल जुनी गोष्ट हाय. देवापेक्षा बोठा कोणतास ग्रह नाय. सत्गुरू पेक्षा ता कुनीस नय. मिंगे जया सत्गुरूस आपल्या बाजूला हाय तटा क्याला मंगल-फिंगलला घाबरव्या?”

रामदासशा आयबापांसा ये शब्द आयकून पार्वती काकीला समाधान झाला. अवडी विशारी माणसा तिला पयल्यांदास बग्याला मिरलती.

“ ब्रह्मानंद स्वामीही कृपा हाय मिंगे माना धास्ती नय.” ती बोलली.

“ये बग बाय.” रामदाससो बापू अत्माराम बोल्याला लागलो, “जुन्यान जे वाईट हाय ते टाकून देव्याला पायजे. ना सांगला हाय ते वाढविल्या पायजे. नवीन सांगला घेतल्या पायजे. तवास आपला कल्याण होन ना.”

पार्वती काकीला अजून बरा वाटला.

“मिंगे लगीन कवा धरव्या? बामणाखनी मुहूर्त बग्याला लागेन ना.” पार्वती काकी बोलली.

“नाय. बामणाखनी-बिमणाखनी बगव्याहा नय.” रामदासशी आय बोलली, “आपला सत्गुरू हाय ना! त्याहापेक्षा सांगला मुहूर्त कुन हांगेन?”

“ बरबर हाय तुमसा. गुरू शिवाय मार्ग नय?”पार्वती काकी खुशीन बोलली.

सबन खुश होता. पार्वती काकीला आपला घर भरल्या भरल्या हरका वाटला. आपली बाजू आथा मजबूत होव्या लागली. याहा तिया मनाला बरा वाट्याला लागला.

संद्राया लगीन झाला. नात्यागोत्यांशी सबन माणसा येऊन गेली. कुनी बरी. कुनी वाईट. कुनी पार्वती काकीया धूर बगणारी. कुनी तिला पायजे ती मदत करणारी. त्यांशा वागण्या-बोलण्या वरशान पार्वती काकीला कुन आपला, कुन परका ए समजला.

संद्रा लगीन करून गेली ना पार्वती काकी एकटी पडली. पंढरी ना सविता उंबयला परत गेला. घरान पार्वती काकीला एकटीला करमत नय होता. ती आपल्या मावऱ्याहा कामान सोताला गुतवून ठेव्याला लागली. दिवसाला एक फेरी संद्राया घरा मारव्या लागली. संद्रापण तिला भेट्याला येऊन जात होती. कामाला मदत करून देत होती. पंढरी मयन्याला एकदा येऊन जात होता.

पार्वती काकी जंगलानपण जात होती. हुक्क्या मावऱ्यावर हालपा ना साऊर करीत होती. तिला एकटीला कवडा साऊर लागता? थोडा साऊर ती संद्राला देव्याही. बरास साऊर पंढरीला उंबयला धाडून देव्याही. विठी जनी, शोभा, ठकी याना ती लागेन ती मदत करव्याही. तिही आथा बाजू झालती. देवान भरपूर दिला आथा नातापुता बगव्याही तिला इच्छा होव्या लागली. कवा एकदा नाता बगीता हये तिला झाला. ब्रह्मानंद स्वामीहा एकेक शब्द खरा ठरव्याला सुरवात झाली.

ब्रह्मानंद स्वामीहा भरोशावर तिन सबन विशार होडून दिलतो. संद्राया लगीनाया वखताला कवडाजीन तिला बरा-वाईट बोलला.”क्याला पोरीया लगीन करता? रामदासला मारव्या हाय? का सोताया सुखाहाठी तू रामदासशा जीवा बरबर खेरू नाका.”

काही दुष्ट बुद्धीया लोकाहीन रामदासशा घरा जाऊन कल लाव्याहा प्रयत्न केला.''क्याला ती पोरी करता मंगल हाय तिला.''

'' मिंजे तुया डोखा उलटा हाय वाटता. तुला शेरमन कुनी केलो?'' कललाव्यो हार मान्याला तयार नय होतो.

''आमशा ब्रह्मानंद स्वामीन हांगीतला ना! बस्स. त्यांशापुडा माना कुनाया एक ऐकव्या नय मिरे.'' रामदास जून हये बोलून सबनानसा आवाज बंद केलो.

पार्वती काकीला सत्गुरू माऊलीया कृपेया हजप वाट्याला लागलो. रातदिह ती सत्गुरुयास नाव घेत होती. जेवताना, निजताना, मावरा निवडीताना, मावरा लाविताना, जंगलान जाताना ती सत्गुरूया नाव घेत होती.

आथापण ती सत्गुरूया नाव घेत बंदरावर आयली. वनारीवरसा बोंबील पाटीन भरला. आसपास मावऱ्याहा वास घुमलता. दूर समिंदर मोजा आपटून भूमीया पाया पडीत होता. वनारीया थोडा दूर बाठावर जारा हिव्याही खोपटी घातीलती. तया खलाही फाटकी डोली हिवीत होता. 'बतबोईर' नावाया बारकूसास पक्षी पटकन पाण्यान खिरून सोशीन मावरा धरून बाहेर येत होता. बंदरावर हुजरा पक्षी बारका शिंबोरा धरून खात होता.

पार्वती काकी माथ्यावर पाटी घिऊन घरा जाव्याला निगाली. अवड्यान तिला तुक्या ना त्याही बायकू सखू दोगी रगीरगीही येताना दिखली. पार्वती काकी त्या दोगांना बगून घाबरली.

'' यो कवा परत आयलो, तुरूंगांनी?''

दोगी तिया समोर उबी रेवून तिला गारे देव्या लागला. वाशेवाशे ना नाखानशे गारे देत होता ते. पार्वती काकी थरथर काप्याला लागली.”मीन काय केला? माना क्याला तुमी लोका गारे देतान?”ती थरथरत बोलली.

तुक्यान आवाज सडविलो.” तून माना तुरूंगान धाडलो. तुया पायान मीन शिपायांसो मार खालो. तूखनी मी मदत माग्याला आलतो. माना दपविला हता ता तुया काय गेला हता?”

“ पण दादा, मीन तुला दपविलतो ता खरा. तुया पायान उलटा माना शिपाय घिऊन गेला.”

“ ना शिपायाना पिप कुनी दाखविलो? तूनस ना.” सखू तडतड करीत बोलली.

“अये बाबा, मायावर खोटा आरोप क्याला करतान? शिपायाना कुनीतरू हांगीतला का तुक्या माया घरान दपले. शिपाय घरान घुसला. त्याला मी काय करीन?”पार्वती काकी थरथर कापीत बोलली.

“ तू खोटी हाय. आमसा वाईट बगीता तू. तवास तून माना शिपायांशा सवाधी केलो.” तुक्या तडतड करीत बोललो.

“नय दादा. मी क्याला तुमसा वाईट बगीन मीन? भुकीही भूक जाणली. तहान्याही तान जाणली. मीन कुनायापण वाईट बगीतला नय. उलट जगानस माया वाईट बगीतला. मी क्याला कुनाया वाईट बगू?” ती रड्याला लागली.

“तू भुतारीण हाय. तवास तून माया वाईट बगीतला. कुन तो साधू घातिलतो ना घरान. त्याखनी तू जादू मंतरा शिकता ना! मी बग आथा काय करता. तुया आख्ख्या खानदानाया वाट लावीन मी. तुही तीन पोरा, तीन ओवा, दोन पोऱ्या ना दोन जावय हात ना. मी खये करता बग या सबनानसा. मी तुया वंश वाडू देव्याहो

नय. एकालापण पोरा होऊन देव्याहो नय. तुला जीव देव्याला लावीन. आख्ख्या गावान तुला भुतारीण काडीन. कोणायापण काय वाईट झाला ता लोका तुयास नाव घेतीन. हालहाल करतीन तुया."

पार्वती काकीला शाट लागलो.

"मेल्या, बाठीन पडलेल्या. क्याला पाप तुकीता? नाका ना माया गुवान काडी लोपू. भोगीन तू. माना डाग लाऊ नाका. त्या साधू पुरुषाला वाईट बोलू नाका. माया शाप-सराप घेऊ नाका. किडा पडतीन तुला जीत्या जीवान."

पार्वती काकीया ए शब्द दोगाना जाम झोंबला. सखून तिहो हेंडो धरलो. कानाखाली वाजविला. पार्वती काकीला मातीन आडवी पाडली. दोगा तिला लाते-लाते माऱ्याला लागला. पार्वती काकी बोंबा ठोक्याला लागली. तिया बोंबा आयकून खोपट्यांसा खलाही धावत आयला. दोगा-तिगाईन तुक्याला धरलो. आडवा पाडून पक्का शेशिलो. एकान सखूला धरून ठेविलो. ती पुरुषाला आयक्याला तयार नय. अवड्यान बायकापण आयल्या. त्याहीन सखूला झोडून काडली. विठीन ता बोंबलाही तिला पक्को झोडून काडली.

वार्ता आयकून संद्रा ना रामदास धावत आयला. त्याहीन पार्वती काकीला घरान नेली. डाक्टर बोलविलो. बिशारी पार्वती काकी! तिला मारापेक्षा भुतारीण हांगितलो याहा शाट लागलो.

माणसाहीन तुक्या ना सखूला हातपाय बांदून तालुक्याला शिपायाखनी नेलो.

(३६)

मावरा जाम येव्या लागला. काही मच्छिमारांसा उत्पन्न वाड्याला लागला. वाल्या, रामसंदर, दामू, राजाराम, भगवान यशवंत, जन्या यांसा उत्पन्न वाडला. त्याहीन सहकारी सोसायटी खनशान कर्ज काडून त्यामनी सोताया उत्पन्न घालून सोताया बोटी केल्या. वाल्या ना रामसंदर वेगळा पडला. 'पैशाहो जोर यो.'

पार्वती काकीला तुक्या ना सखून मारीलती. तिला बग्याला जाव्याहीपण त्यांशी इच्छा नय झाली. पण लोका हातीन बगून ते गेला . ते पण तवड्या पुरतास. पार्वती काकीही खरी शेवा केली ती संद्रान. भावल्याही ना सोताही हये तीन पोरांशी आय खरी . पण गरजीला एकपण पोर कामाला नय आयलो. कटा नेता हजिकी पोरा. पोऱ्यास खऱ्या आयबापांशा कैवारी हतान. 'बेटी मिंजे धनाही पेटी' ए पार्वती काकीला आथा समजला.

पंढरी ता तिहो पोर. पण तो धास्ती करीन. काम टाकून येन. अटा येऊन कैजो करीन. त्यापरीस त्याला न हांगितलेला बरा. बगून पार्वती काकीन त्याला कळून दिला नय. तियो बाहा कष्णा आयलो तिला बग्याला. त्याला तिन हांगितला, ''दादा, पंढरीला हांगू नाका ये. नाय ता तो येन तडतड करीत. तुक्या बरबर कैजो करीन. तुक्या मेलो तिरफट हाय. पटकन सुरी कोयती घेता तो. पंढरीला मारीन. रेउंदे त्याला तटास.''

हरी ना त्याही बायकू पार्वती काकीला बगून गेला. शेवटी पार्वती काकीला जावय ना पोरीस कामाला आयला. पोरा ना ओवा काय कामाहे.

संद्रा ना रामदास याहीन केलेली शेवा ना तिया सत्गुरू वरसा विश्वास यापायी पार्वती काकी बरी झाली. पण आथा ती पयल्या हरकी रेली नय. घाबऱ्या घाबऱ्या रेव्याला लागली. एकटीस हली ता ती रडव्याही. कुनी थूकला ता तिला वाटव्याहा का मानास बगून थूकतान. तुक्यान भुतारीण काडीलती. लोका अडाणी. गू खायाला हांगीतला तरी खातीन. देवापेक्षा भुतावरती त्यांसा विश्वास जास्ती. लगेस खरा मानतान. कुनी हांगीतला का एखाद्या बाईला नावा ठेव्याला कमी करीत नय. सुकता आपला. पण काय तरू वाईट झाला का नाव ठेव्या बिज्याला. कमजोर समाजाही इ रीतूस हाय.

पार्वती काकीला आपल्याला लोका नावा ठेवितीन यापेक्षा तुक्यान जो दम दिलतो त्याहीस धास्ती जास्त होती. त्यान वंश नष्ट करव्याहा दम दिलतो. 'दोगा भावल्याहा पोराना काईस झाला नय. पंढरीया आथास लगीन झालता. या तुक्यान काय केला ना पंढरीला पोरा नय झाली मंगे? ' पार्वती काकी विशार करून थरथर काप्याला लागली. रड्याला लागली. तवा तिया आतमनानशान ब्रह्मानंद स्वामीया आवाज आयला.''तुही नाता जाम नाव कमवितीन. तुमशा घरान माणसांसा ये-जा सालूस रेन. तुया खानदानाया कल्याण होन.''

यो आवाज आयकून पार्वती काकीला हलका वाटला. ती सत्गुरूला हात जोडला. तिन सत्गुरूवर विश्वास ठेविला.''तुक्या मेलो मच्छर. सत्गुरू. मिंजे देव. सत्गुरू हांगिन तेस खरा होन. तुक्याला कुन घाबरता हये तिन विशार केला.

(३७)

रुपाला घरान जाम काम होता. त्यापायी तिला बंदरावर हुक्का बोंबील आण्याला जायाला दुपार झाली. तवड्यान बिज्यानसा बोंबील ना हुक्का मावरा आणून झालता. रुपा बंदरावर पोसली तवा तटा कुनीस नय होता. ती वनारीया चक्रव्यूहा मनशान वाट काडून सोताया वनारीखनी गेली. हुकलेला बोंबील पाटीन भऱ्याला लागली. ती एकटीस. डोख्यावर कडक निंबर. जारा हिव्याही खोपटीपण लांबन होती. तटापण खलाही दुपारसा घडीभर आराम करीत पडलता.

अवड्यान रूपाला कुनीतरू तिखनी येता हये जाणवला. खरोखरस एक पुरुष तिखनी आयलो. तो तुक्या होतो. त्याला बगून ती थोडी घाबरलीस.

"तू अटा काय करता?"रूपान जरा तेखिही विशारला.

"तूखनी काम होता. बरा झाला अटास भेटली." तुक्या बोललो.

"काय ते?"तिन नजर फिरविली.

"मी काय हांगता. तुया लगीनाला शार-पास वरीस झाला. तरू तुला पोरा नय झाली. तुया नवरा दारू पिऊन कमजोर झालाय. माया बरबर सल. तुला लगेस पोरा होतीन." तुक्या लाज होडून बोललो.

रूपाला ते सहन झाला नय. तिन तुक्याया कानाखाली वाजविली."लाज वाटता का नय बोल्याला? तुया पोरी हरकी पोरी मी. हये बोलताना तुही जीभ केव खडली नय."

तुक्या संतापलो. त्यान तियो हात धरलो. रूपा त्याहा हात होडून पऱ्याला लागली.''कुनीतरू वासवा'' ती बरकत परत होती. तुक्यान तिला धरलीस. रूपान जाम हातपाय पाखडिला. पण काय उपयोग झाला नय. त्यान रूपाला एंगीन घितली. आथा आपला काय खरा नय हये तिला वाटला. ती बोठबोठ्यान बरक्याला लागली. रड्याला लागली.

''कुनी ऐकव्या नय तुया आवाज. तुला वाशव्याला कुनी येव्या नय. मी तुमशा खानदानाही वाट लावीन. सुरवात तुया पासून करता. तुला बाटवीता. तू बाटली का पार्वती खपलीस. कवडा केला तरू ती तुही हावू हाय. तुया बदल तिला माया हयेनस. मीन तुमसा पार्वती बदल कान भरून तुमशान फूट पाडली. पण ती निगली भुतारीण. तिया काईस वाईट झाला नय. मीपण कमी नय मिरे. आथा बग खये करता ते. सल काड कपडी" तुक्या आंगाला झुंबलो.

तवड्यान पार्वती काकी तया पोसली. तिन ए सबन बगीतला. तिन वनारीयो बांबू घिऊन तुक्याला शेशाला घितलो. माथ्यावर, पाठीन पक्को मार दिलो. रूपाला ए बगून जोम आयलो. तिनपण बांबू काडून तुक्याला झोड्याला घितलो. तो मार सुकव्याला पऱ्याला लागलो. त्यांसा आवाज आयकून खोपटीनसा खलाही धावत आयला. त्याहीनपण तुक्याला लाते घाल्याला घितला.

'' तुमी माना केव मारतान?''तुक्या मार सुकवित बोललो.

''यान माया आंगावर हात टाकिला. याहा माना बाटवून पार्वती काकीया नाव खराब करव्याहा डाव होता.'' रूपा रगीरगीही बोलली. ए आयकून गो माणसाहिन परत त्याला मारलो. त्याहा तोंडानसा रगत येव्या लागला. तो बोल्याला लागलो, ''इ रूपा खोटी हाय. तिनूस माना बोलविला. हकालशी इ माना भेटली. बोलली नवऱ्यापासून माना सुख नय मिरे. माया हावून पार्वती काकीन त्यावर काय जादूमंतरा

केली देव जाणे. येऊन जाऊन दारू पिता. माखनी लक्ष देई नय. माना उपाशी रेव्या लागता. त्याहाठीस इन माना अटा बोलविला. तुमाना बगून फिरली ती."

ए आयकून रूपा जामस संतापली."मेल्या खोट्या थू! जीभ खडेन ना. तू माया हावूया नाव खराब करता ना आथा मायापण नाव खराब करव्याला निगाले. यो सबन खोटा बोलता." हये बोलून तिन बांबूया फटका तुक्याया मस्तकान मारला.

" माना माईत हाय पोरी. यो मेलो बंडलेलो हाय. आपल्या खानदानाही वाट लाव्याला निगाले. त्यापायी माया नाव खराब करता. तुया खराब करव्या लागले. कटा नशिबान मिरलो देव जाणे." तिनपण बांबूयो फटको मारलो.

"तुमी दोगी शिपायाखनी सला. याला आपुन शिपायांशा ताब्यान देऊ. पास-सहा वरीस तुरूंगान रेन. शिपाय जाम मारतीन याला. नबला होऊन येन. पास-सहा वरीस कटकट नय याही. येन तवा जोम मोडेन याहा." एक गोव माणूस बोललो.

सबन तालुक्याला शिपायाखनी गेला. तक्रार दिली. तुक्याला शिपायांशा ताब्यान दिलो. रूपा ना पार्वती काकी घरा आयले.

" काकी, तू नहती ता आज माया काय झाला हता? " रूपा रडून बोलली.

" देवानूस माना बुद्धी दिली बाय. मीन सबन मावरा काडून नेलता तरू वाटला अजून काय तरू हयेन. बगून मी आयली." पार्वती काकी बोलली.

"काकी, मीन याला नय बोलविलो. मी तुयाबदल ना यांशाबदल काईस बोलली नय." रूपा परत बोलली उलटा योस ना याही बायकू आमशा घरा येऊन तुमशाबदल पंढरीबदल आमसा कान भरव्याहा. मेल्या खरपाशाहा आमी आईकिला. आमाना माफ कर काकी." रूपान हात जोडला.

“ मायते माना. तू थजिकी नय. तुक्याला दुनिया ओरखिता. त्याहाठी तुला खये दोष देन मी? पण तुमी त्याहा नादाला लागला ये बरा नय झाला. आथा डोरा उघडला ना! बरा झाला. तू आथा मनाला लावून घेऊ नाका.” पार्वती काकी रूपाला समजावित बोलली.

“ माना आथा करला, काकी आपुन एकोट रेतीन तस आपला कल्याण हाय. कुनाया हांगण्यान येऊन फायदा नय.” रूपा बोलली.

“ आथा करला का बाय तुला. इ पार्वती काकी पवित्र हाय. नावा हरकीस. मीन लोकांसा वाईट नय बगितला ता तुमसा वाईट खये बगीन? पण तुमी गेला लोकांशा हांगण्यान. बाय 'पाची बोटा हरकी नहतान'. पण एकोट्यान रेतान. तवास काम होता. थयेस हाय मनुज्याहा. तुया-माया विशार एक हरका असू शके नय. पण कुटुंबान एकोप्यान रेव्यास लागता. तवास संसार होता बाय.” पार्वती काकी बोलली.

“आथा हये नय होव्या, 1काकी. आपुन वेगवेगल्या घरान रेला तरू आथा एकोट रेव्याहा. आपली ताकद वाडव्याही. तीन बाहा, तीन ओवा, दोन पोऱ्या, दोन जावय. आपली ताकद कवडी होन. आथा आपुन एकत्र रेव्याहा.” रूपा पशिताप करीत बोलली.

पार्वती काकीला बरा वाटला.

(३८)

पार्वती काकी सत्गुरूया नाव घेऊन संसारान मन घाल्याला लागली. हकालशी लवकर उठून झाड्याला जाऊन येव्या. आंग धुविला का घराबाहेर कणा टाकव्या. देवाला बत्ती करव्या. मिंगे शाय पिऊन दांड्यावर मावरा निवड्याला नय ता हुक्का मावरा काड्याला जाव्या. मावरा निवडिता ना काडतानास तिया दिह जाव्या लागला. बंदरावर तिया मन लागव्या. पण तिखनी बगव्याही लोकांशी बदललेली नजर तिला समजत होती. कुनी नुसतास थूकला तरू तिला वाईट वाटव्या. ये माना बगून ता नाय ना थूकत? तुक्यान डाग लावून ठेविला तो कवा मिटव्या? त्यामनी दोन वरीस झाला तरू पंढरीला काईस झाला नय. तटा संद्रालापण काईस झाला नय. भावल्यांशी पोरापण निपुत्रिक होता. पार्वती काकी शिंतनान पडली.”तुक्याहा शब्द खरा ता नय होन माया वंश नष्ट होव्या ना?”

धास्तीन तिया खानापिना कमी झाला. तिला रेवे नय. ती ब्रह्मानंद स्वामीया आश्रमान गेली. सत्गुरूया पुडान तिही अडचण हांगितली. ब्रह्मानंद स्वामी गालान हाला. तियाखनी बगून बोल्याला लागला.

“ पोरी क्याला धास्ती करता तू? दशरथाला कवा पोरा झाली? शाप डोखरो झालो. केसा पिकली तवा. पण त्याहा घरान देवान जन्म घेतला. आज त्यांशी पूजा जग करता. वासुदेवाया घरान श्रीकृष्णान जन्म कवा घेतला सबनान शेवटी. आज ते जगद्गुरु हाय. मारूतिया आयबापाना पोर कवा झालो ? तेपण बरीस वरीस झाली तवा. पण त्यांसा पोर आज जगान बलवान- बुद्धीमान-पूज्यनीय हाय. त्यांशा हरकास तुला नाता होतीन.”

ब्रह्मानंद स्वामीया ए शब्द आयकून तिला बरा वाटला. तिही धास्ती दूर झाली. पण तुक्याहा तिला संशय होता. त्या बदल तिन विशारला, “सत्गुरू राया, तो माया दुश्मन. त्यान माया वंश नष्ट करव्याही धमकी दिले”

स्वामी बोलला, "पोरी, मायावर विश्वास ठेव. कुन काय बोलता यावर लक्ष देऊ नाका. इ राक्षसी वृत्ती हाय. या वृत्तीन देवाधिकाना नय होडला. साधूसंताना नय होडला. त्याना जाम तरास दिला या राक्षसी वृत्तीन. तुला ना माना होडतीन का? कुत्रा भूकतान ता भूकून दे. आपुन हत्ती हरका रेव्या. लक्ष देव्या नय. कुत्रा कवडा भूकला तरू ते हत्तीला भारी पडू शके नय".

"अजून एक लक्षान ठेव. आपला कुनी दुश्मन नहता. देवान बनविलेल्या या दुनियेन सांगला-वाईट सबनस देवाया हता. इ पृथ्वी कर्मभूमी हाय. अटा प्रत्येकाला कसोटी देव्या लागता आपली कसोटी घेव्याहाठीस देवान वाईट प्रवृत्ती जन्माला घातले. आपुन खये वागतान ए देवाला बगव्या हता. जो सांगला वागता देव त्याला बक्षीस देता. त्याला जन्मपण सुखाया, मरणपण सुखाया ना आयुष्यपण सुखाया करता तो. जो वाईट वागता त्याला देव भोग देता. वाईट वागणाऱ्याला वागून दे वाईट. त्याहा पापाया घडा भरला का आपोआप फुटेन. तवा देवपण वाशव्याला येव्या नय. तुला जीत्याजीवान बग्याला मिरेन."

पार्वती काकीया डोऱ्यान पाणी आयला. घराघरा ती रड्याला लागली. ती ब्रह्मानंद स्वामीया पायावर पडली. ओटीनशी पंन्नासशी नोट काडून शरणावर ठेविली. स्वामीन ते बगीतला.

"पोरी, ते उसल. आमी संन्याशी. आमाना त्याही गरज नाय. देवाया नाव घेव्या. लोकाना देवाया भजनाला लाव्या. सोताहीपण पुण्याई वाढव्याही ना लोकांशीपण पुण्याई वाढव्याही. तवा या भूमीही पुण्याई वाढता. ती पुण्याईस आपला सांबाळ करता. आमसा योस काम. लोकाना सांगला मार्ग दाखव्याहा."

पार्वती काकीन नोट तुकून ओटीन ठेविली. लुगड्याहा पदराला डोरा फूहून आश्रमाबाहेर पडली. विशार करव्या लागली सत्गुरू नहता ता माया काय झाला हता?

(३९)

कोळीवाड्यान हिमग्याहा हनाही धामधूम सुरू होती. हनाला उंबयशान पंढरी ना सविता घरा आयला. पार्वती काकीला त्यांशी सोबत झाली. तिया दिह बरा जाव्या लागला. त्यामनी रूपा ना तुक्याहा प्रकाराही वाल्या ना रामसंदरसा डोरा उघडला. त्याना पार्वती काकीया महत्त्व समज्याला लागला. ते आथा पार्वती काकी बरबर बरा वाग्याला लागला. तिही देखभाल करव्या लागला. पार्वती काकीला बरा वाटला. तिया कुटुंब पूरा झाला. ब्रह्मानंद स्वामीया शब्द तिला आठवीत रेव्याहा. आथा तिला एकूस दुख होता. तिगा ओवाना ना एका पोरीला पोराबाळा होत नय होती. पण स्वामीया शब्दापायी तिन शिंता करव्याहा होडून दिलता. ती आथा एकटी रेत नय होती. तिया आजूबाजूला घरशी माणसा होती. तिला बिज्या गोष्टीहीपण आठवण येत नय होती. खोपटीया बाजूला कुड्या पेटवून सबनजीन वार्ता करीत बहव्या. वाल्या, रूपा, कुसूम, रामसंदर, पंढरी सविता, सुक्री, इंदिरा, विठी रातभर वार्ता करव्या. पार्वती काकीया हिमग्याहा पंधरा दिह सुखान गेला.

पंधराव्या दिवशी बोठी होरी होती. गावान दोन- तीन जाग्यावर बोठी होरी पेटव्याही. पार्वती काकीन त्याहाठी खास बाजारानशान उह, बत्ताशा, नारोळ, आणिलता. हांशी वाजत गाजत आळीन होरीला आणला. सजविला गेला. पूजा केली गेली. पार्वती काकी राशी जेव्या पुरता घरान गेलती. सवितान जेवण करीलता. कवड्यातरु दिहान ओवशा हाताया जेवण तिला खायाला मिरला.

जेवून झाल्यावर पार्वती काकीन पाठ टेकिली. पडल्या पडल्या सविता बरबर वार्ता केली. अवड्यान पंढरी बाहेरशान आयलो. सविता ना पंढरी दोगी जेव्याला

बहला. त्याना जेवताना बगून पार्वती काकीला समाधान मिरत होता. 'येस ते दोगा हात जे माया वंश पुडा सालवितीन. माही एक से एक नाता-नाती येतीन. माया घर भरेन.'ती विशार करव्या लागली.

सुजातान भांडी घहिल्यावर विठी आयली. तिया हातान नारोल ना उह होता.''पार्वती सल होरीवरती.'' पार्वती काकी तयारूस होती. तिन लालभडक कूकू रंगाया लुगडा निहिलता. पंढरीन तियाठी आणिलता ते. पोलकापण लालभडक. पायान कडा. गळ्यान बोरमाल. ती बाहेर गेली.

'' नारोल ना उह घे.''

''नाका. पंढरी ना सुजाता घेऊन येतीन. तू सल आपल्या.''

पार्वती काकी ना विठी गेल्या.

घरान पंढरी ना सुजाता होता. दोगाहीन तयारी सुरु केली. पंढरीन लाल बंडी ना लाल टोपी घातली. कंबरीला हुजरा रूमाल गुटारीला. रूमालावर बोटीया चित्र होता. कपारान चंदनाया टिरा लाविला. कवड्यातरू दिहान त्यान कोळ्यांसा वेश करीलता.

सुजातापण पार्वती काकी हरकास लाल लुगडा निहिलता. वरती लाल पोलका घातीलता. काळ्या केसान आबोलीया गजरा ना मोगऱ्याहा गजरा घातीला. हातान हिरव्या बांगड्या. नाकान नथ. गऱ्यान मंगळसूत्र होता. मस्तकावर कूकू होता. तिला बगीतल्यावर पंढरी तियाखनी बगीतूस रेला.

''काय बगीतान? कवा बगीतला नय का?''तिन विशारला.

'' बगीतला गा. पण हये स्वातीया नक्षत्राया पावसाही तयार झालेला मोती नय बगीतला.'' पंढरी बोललो.

“अवडी का मी सुंदर दिखता?”तिन विशारला.

“अं... माया आयशा अवडी नय.” तो बोललो.

“आय खये पण हवो. सबनाना आवडतास. सला आथा.”

दोगी बाहेर पडला. सुजातान नारोल उह हातान घितला. पंढरीन खोपटीया दार ओडकिला. दोगा होरीवर निगाला.

वाटीन बरीस माणसा त्याना भेटत होती. डोखरा-डोखरी, जुवान जो बगीन तो त्यांशाखनी बगीत होता. जास्तस ओरखिया हला ता थांबवून विशारला, “पंढरी कवा रे आला? बरा हाय ना?”

“ बरा हाय.” पंढरी सबनाना योस उत्तर देव्याला लागलो.

दोगा होरीवर पोसला. तटा बरीस लोका होरीला फेरा घालीत होता. पंढरी ना सुजाता त्यांशामनी खिरला. ते पण प्रदक्षिणा घाल्याला लागला. सात फेऱ्या झाल्या. पंढरीन होरीला हात जोडला. नारोल ना उह वाहिला. पार्वती काकी लांबनशान त्याना बगीत होती. ती मनान बोलली, “होरी माते, माया पोराला ना ओवला शक्ती दे. सुखी ठेव त्याना.” तिया डोऱ्यान पाणी आयला.

दर्शन घिऊन झाल्यावर सुजाता पार्वती काकीखनी जाऊन बहली. पंढरीन जन्याला बगीतला. तो जन्याखनी गेलो. विशारला, “बरा हाय ना? कामधंदा खये साललेे?”

“ बरा हाय. शिलाय करता. अदीन मदीन गायतऱ्या मावरा धऱ्याला जाता. दिहाला एक-दोन रूपये हुटतान.” जन्या बोललो.

“ तुया बरा हाय. तू काय शिकलाय. कटातरू तुला नोकरी लागेनस. तू जाम पुडा जान.” पंढरी बोललो.

“ तुयापण ता बरास हाय ना. उंबयला नोकरी करता तू.”

“हा बरा हाय. पण आथा काय, आमी बाहा एकोट झालेन. त्याहीन माना वेगळी बोट करून देव्या लाविले. मी परत अटा येन.” पंढरी बोललो.

तवड्यान वाल्या ना रामसंदर होरीवरती आयला. जोडीला त्यांशा बायका होत्या. त्याहीन होरीही पूजा केली. ते पण यांशान येऊन बहला. पार्वती काकीया तिगा ओवाहीन एकसाईट कपडी घातीलती. पार्वती काकी हरकीस. पार्वती काकीला त्या तिगी लक्ष्मी, पार्वती ना सरस्वती वाट्याला लागल्या. पार्वती काकीया परिवार एक झाला. तिला भरून पावला.

सबनानशा वार्ता रंगान आलत्या. अवड्यान गोविंदबुवा आयलो. त्यान कोळीगीता बोल्याला सुरवात केली. सबन जुवान, बायका, पोऱ्या पोरा होरी भोवती फेर धरून नाशाला लागला. पार्वती काकीही तिनी पोरा ना तिनी ओवापण नाशव्याला लागली. रात डोख्यावर सडव्या लागली. नास रंगान येव्या लागला. पार्वती काकीन लुगड्याहा पदराला डोरा फुहिला.

(४०)

पापलेटसा धंदा सुरू झाल्यापासून बऱ्यास बोटी पापलेटला, दालद्याला वाग्याला लागल्या. दालद्याला उत्पन्न बरास होता. दोन-शार जोरानस शंभर-सव्वाशे कोडी हरगा सडव्याहा बोटीला. किरकोल मावरा सडेन तो वेगळास. काही मच्छिमाराहीन कवीया धंदापण सालू ठेविलता. बोंबील मावरा बरास येव्याहा. वागरानापण बोटी जाव्या. दाढा, मासा, वाव, घोळ, सुरमय हये मावरा बरास मिरव्या. बारक्या बोटी तरतीला जाव्या. त्यमनी हरगा, कावलेटी, बांगडा, काटी, मुशी, कोता हये मावरा येव्याहा.

वाल्या ना रामसंदर यांशा बोटी होत्या. पंढरीलापण बारकी बोट बनवून दिली त्याहीन. त्याना उत्पन्न होव्या लागला. परस्पती सुधाऱ्या लागली. मावरा ता बरास येव्याहा पण मनाहरका भाव नय मिरत होता. दलाल ना व्यापारी लोका आडीबाजी करव्याहा. सोसायटीला मावरा दिला ता आपला फायदास हाय हये समजून बरासजीन मच्छीमार सोसायटीला मावरा देव्या लागला. सोसायटी त्याना स्वस्तान डिझेल, राकेल, बरफ, जारा, बाकीया मच्छीमारीया सामान देव्या लागली. सोसायटी अस्ते अस्ते नावारूपाला येव्या लागली. रामदास हरकी बरीस कर्तृत्ववान माणसा सोसायटीन होती. त्याहीन मेहनत घेऊन सोसायटी नावारूपाला आणली.

कोळीवाड्यान सबन बदलत होता. खोपट्या जावून पक्की वीटा-मातीही कौलाही घरा बनत होती. पण एखाद्या वर्षी उधाणाया पाण्याही तीपण वाहून जात होती. मच्छीमार धंद्याहो जहे भरोसो देता येई नय थयेस मच्छीमारी वस्तीयो पण भरोसो देता येई नय. त्यामनी बाहेरशा बऱ्यास लोकांसा लक्ष समुदराखनी ना

मच्छीमार वस्तीखनी जाव्या लागला. त्यांशा मनान भविष्याया योजना हिजत होत्या. पण बिशाऱ्या मच्छीमाराना याही काईस माहिती नय होती. आपली परस्पती आथा सांगली होत सालले यामनीस त्याना आनंद होता.

वाल्या, रामसंदर याहीन खोपटीया विशार होडलो. तुक्याहा ना सखूया हांगनीन येव्याहा त्याहीन होडला. धंद्यावर लक्ष दिला. पार्वती काकीला तरास देव्याहा ते बंद झाला. ते उलटा आथा पार्वती काकीही बाजू घेव्याला लागला. पण तुक्या ना सखू खयनी ना खयनी कल काडव्यास. पार्वती काकी बिशारी त्यांशाखनी लक्ष देव्यास नय. 'कुत्रो भुकेन ता त्याहास तोंड दुखेन' ये सत्गुरुया उपदेश तिन लक्षान ठेविलो.

गावदेवीया पालखीला सबन परत एकदा एकोट झाला. गावदेवीही खणा-नारलाही ओटी भरली. आशीर्वाद घितला. तटशान परत येताना वाटीनस सुजातान पार्वती काकीला हांगितला, "आया, तू आजी होव्या हाय."

बस्स! अवडा आयक्याही खोटी पार्वती काकीया डोऱ्यासमोर ब्रह्मानंद स्वामी आयलो. सत्गुरुया शब्द खरा ठरला. तिन मनामनान सत्गुरुया पाया पडला. तिला काय करू ना काय नको हये झाला.

" देव परीक्षा बगीता. भक्ताला सतावून घेता. रडविता. पाडता. पण त्याहा बरबर अखंड रेता. ना मंगे एकदास भरभरून देता. 'हेनानशी कीड हेनान रेई नय' येस खरा." ती विशार करव्या लागली.

(४१)

पार्वती काकी सुजाताही जाम शेवा करव्या लागली. तिला आंग धुव्याला पाणी तापवून देव्या लागली. तिया बरबर बंदरावर झाड्याला जाव्या लागली. तिया माथा धुवून देव्या लागली. केस ओखलून देव्या लागली.

पार्वती काकी सुजाताला जास्ती काम देव्याही नय. घरानशी सबन कामा तिस करव्याही. बावी वरसा पाणीपण तिस भरव्याही. तवा तिया दोगी ओवा येऊन तिला मदत करव्या लागल्या. सुजाताला ये आवड्याहा नय. पण पार्वती काकीया पुडान तिया कायपण सालव्या नय.''बाय काम काय जन्माहास हाय. मरेपर्यंत काम करव्याहास हाय. पण हजिक्या वखताला सांभाळून रेव्या पायजे.'' पार्वती काकीन समजावून हांगितला.

''पण आया, नुसतास बहून कंटोरो येता. हाताला काय तरू काम पायजे का नाका.''

''ठिक हाय. हलका काम करीत जा. माना विशारल्याबिगर कुनतास काम करू नाका.''

मंगे सुजाता जेवण करव्या. भांडी घहव्या. हये हलकी कामा करव्या लागली. एक दिह ओव ना हावू बंदरावर जात होता. वाटीन तुक्या मिरलो. सखू जोडीला होती. ती ता पार्वती काकीला बगून दात- ओठ खाव्याला लागली.

'' याला शिपाय केव होडतान?'' ती मनान बोलली.

“पार्वती, माया शब्द लक्षान हात ना! तुया वंश मी वाडून देव्या नय. बरबाद करीन.”

सुजाता संतापली. ती तुक्याला कायतरू बोलव्या होती. पण पार्वती काकीन तिया हात धरून तिला पुडा नेली.

“ पार्वती, तून आमसा वाईट बघीतला ना. तुया खये वाईट होता बग.” तुक्या बोठबोठ्यान बोल्याला लागलो.

पार्वती काकी थरथर काप्याला लागली. सुजाता जाम शिडली.”आया, यो तुला काय काय बरा-वाईट बोलता. तू चूप केव हाय? . मी आथा थोबाड फोडता त्याहा. होड तू माना.”

“ नाय गो बाय. त्यांशा वाट्याला जाऊ नाका. खरपाशी हात ती माणसा.” पार्वती काकी थरथर कापत बोलली.

“आपुन बोलत नय बगून सडलेन ते. तू होड माना. त्याना तालावर आणता बग मी.”

“नय बाय. तू सल अटनी.”

पार्वती काकीन तिला ताणीत ओढीत नेली. वाटीन सुजातान विशारला, "मीन आईकिले का तुमाना भुतारीण हांगतान इ लोका.”

पार्वती काकी काय पण बोलली नय.

“आया, माया तोंडावर बोलून दे बस. नाय थोबाड फोडला ना त्यांसा ता नावाही सुजाता नय. तून ये आमाना आदीस हांगव्या नय का. बोलणारा कुनी नहला

का सवय पडता सबनाना. सापाला टायमावरस शेसल्या पायजे. नाय ता तो डसता.” सुजाता रगीरगीही बोलली.

“बाय, तुमसो नवो संसार. तुमाना क्याला तरास देव्या ये सबन हांगून. माया पंढरीन जाम वाईट दिह काडलेन. त्याला व्याप होन. त्याहाठी नय हांगितला.”

“पण माना तरू हांगव्या होता. पक्के धडो शिकविलो हतो त्याला.” सुजाता बोलली

“बग बाय, आथा याहा विशार करू नाका. सद्या आपला जे आयले त्यावर लक्ष दे. या मनशान निफरले का मंगे बगू.” पार्वती काकी सुजाताला शांत करीत बोलली.

“मंगे ता मी बगून घेव्यास हाय सबनाना. एकटी पडली त्याहाठी कुनीपण कायपण बोलव्याहा का? इ माणसा अवडी विचित्र केव हात? कुणीपण डोखरी बाई दिखली का काडतान भुतारीण. तुमी नय का डोखरा होव्या? अमृता पिऊन आयलेन का? सडलेल्या-कुजलेल्या मेंदूही माणसा हात इ.”

“बस बाय. तू आथा व्याप करू नाका. शांत रे. देवाया नाव घे. हाहत-खेरत रे.” पार्वती काकीन सुजाताला गप केली. पण ती आतमनी घाबरून गेलती.

दोगी घरा जाव्याला लागल्या. तवा शोभा धावत आयली.”पार्वती बाय, थांब.”

“काय गा झाला?”पार्वती काकीही शाती धडधड कऱ्याला लागली.

“ तुया दोगी ओवाहीन तुक्या ना सखूला जाम झोडला. बांबू बांबूही फोडून काडला त्याना. बंदरावर धाव काडून काडून मारला त्याना. अर्धमेला झालेन ते.” शोभान हांगितला.

“अए देवा, याहीन हये काय केला? शिपाय धरून नेतीन.”

“तू क्याला घाबरता? त्याहीन बरबर केला. त्याना मारून उलटा तुह्या ओवास शिपायाखनी तक्रार कऱ्याला गेलेन. तुला बरा-वाईट बोलत होता ते. तुला भुतारीण बोलला तवा जामस संतापल्या त्या दोगी. थोबाड ना थोबाड फोडून काडला.”

“सल बरा झाला. माया काम माया भावलणीयाहीन केला. याना हयेस तरास दिल्या पायजे. पुनरपी कुनाला नावा ठेव्याहा नय. आमी तिघे ता त्यांशा मगाटी हात धुवून लागतीन. यांशी तोंडा बंद केल्याशिवाय समाजान विधवा, डोखऱ्या बायाना नावा ठेव्याला बंद होव्या नय. कुनाला बगून कुनी थूकला, कुनाला नावा ठेविली का सबनाहीन मिरून त्यांसा थोबाड फोडल्या पायजे.”

सुजाता बोलत होती. पार्वती काकीला तिया म्हणणा पटत होता. पण तिला मारझोड नका होती.

(४२)

सुजाताया पोटान दुखव्याला लागला. तिला सरकारी दवाखान्यान नेला गेला. नुकतास गावान सरकारी दवाखाना सरकारजून सुरू करिलता. सबन सोय होती. सांगला डाक्टर होता. विठी, जनी, शोभा याहीन सुजाताला दवाखान्यान नेव्याठी पार्वती काकीला मदत केली. वाल्या, रामसंदर यांशा बायकापण आयल्या.

पार्वती काकीही शाती धडधड करीत होती. ती एक हरकी देवाया नाव घेत होती. सत्गुरुया नाव घेत होती. रेवून रेवून तिला तुक्याही धमकी आठवित होती. 'देव बोठा का तुक्या बोठा? 'सत्गुरुन तिला मनान समजावून हांगितला. जन्म ना मरण देवाया हातान हाय. माणसाया नय. थये हता ता माणूस माजला हता. कुनाला पण मारीत हुटता. मंगे जगान माणूसस रेता नय. खरा मिंजे माणसाया हातान कायपण नय मिरे. सबन देवाया हातान हाय. देवान ए बरा केला. माणसाया हातान कायपण नय ठेविला ते. बगून देव बोठा हाय. माणूस नय. देवून दे त्याला धमकी. सत्गुरुन हांगितलेय. माही नाता नाव कमावितीन. माया नाव सालवितीन. थयेस होन.

पार्वती काकीया मनान बरा-वाईट विशार सालू होता. रेवून रेवून तुक्या आठव्याहो. मंगे सत्गुरुया नाव घिऊन तो विशार काडून टाकव्याही. हयेस तिया साललता.

थोड्यास वेरान आतमनशान नवीन जीवाया रडव्याहा आवाज आयलो. पार्वती काकी खूश झाली. कुनीतरू बाईन बाहेर येऊन हांगितला, ''पार्वती बाय, तुला नातनी झाली. पोरी झाली.''

अवडा आयकून पार्वती काकीया डोऱ्यान पाणी आयला. घायघाय रडव्या लागली ती.”देवा तून माही शिंता दूर केली. तून माना वंश दिलो रा देवा. तूस बोठा हाय. तुया घर बोठा हाय.”

थोड्या वेरान सबनजीन आतमनी गेला. पालण्यान निजलेल्या बारक्या जीवाला बगून पार्वती काकी रड्याला लागली.

“बाय केव रडता? पोरी झाली त्याहाठी का?”विठीन विशारला.

“त्याहाठी नय बाय. माना पोरी काय पोर काय सबन हरकास. देवान माना नाता देव्याला सुरवात केली. त्याहाठी रडता मी. ये सुखाया रडना हाय. 'पयली बेटी मिंजे धनाही पेटी' इ माही धनाही पेटी हाय. पुडा काय नाता होतीनस. सबन हांगीत होता. पंढरीला पोरा होव्याही नय. आथा बगा मेल्यांदो, पंढरीला पोरा झाली. देव बनव्याला जावू नाका. जो जो सोता देव बन्याला जाता त्याही वाट लागता. कीर्तनान काय आईकितान आपुन.”

पार्वती काकी रड्याला लागली. तिगी ओवा तिखनी बगीत रेल्या.

पार्वती काकीला सोयर लागला. पण सत्गुरुया नाव घेव्याला ती थांबली नय. नाव घेत रेली.....

(ही कादंबरी वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ८०८७८१०१८० या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात.

पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे.

माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www. esahity. com

esahity@gmail. com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.